CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | सोमवार, २० जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ७५ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### अंबानींच्या रिलायन्सचा नफा ७.४ टक्क्यांनी वाढला

**मुंबई :** अब्जाधीश उद्योजक मुकेश अंबानी यांची कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने डिसेंबर तिमाहीचे निकाल जाहीर केले आहेत. चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत देशातील सर्वांत मोठी कंपनी रिलायन्सचा नफा ७.४ टक्क्यांनी वाढून १८,५४० कोटी रुपये झाला आहे. कंपनीच्या किरकोळ व्यवसायातील वाढ आणि दूरसंचार क्षेत्रातील वाढत्या कमाईमुळे कंपनीचा नफा वाढला आहे. शेअर बाजाराला दिलेल्या निवेदनात म्हटले की, चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या ऑक्टोबर-डिसेंबर तिमाहीत त्यांचा नफा १८,५४० कोटी रुपये म्हणजेच प्रतिशेअर १३.७० रुपये होता. गेल्या आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत कंपनीला १७,२६५ कोटी रुपये म्हणजेच प्रतिशेअर १२.७६ रुपये नफा झाला होता.

# महाकुंभ प्रत्येक भारतीयाचा गौरव

### पंतप्रधान मोदी यांचे गौरवोद्गार

**◆ नवी दिल्ली, १९ जानेवारी**

प्रयागराज येथे सुरू असलेल्या महाकुंभाची लोकप्रियता जागतिक स्तरावर प्रचंड वाढली आहे. हा महाकुंभ प्रत्येक भारतीयाचा गौरव आहे. यावेळच्या महाकुंभात विविध धर्मांतील तरुण मोठ्या संख्येत सहभागी होत असल्याचे चित्र दररोज पाहायला मिळत आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी काढले.

प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी पंतप्रधान मोदी आकाशवाणीवर प्रसारित होणाऱ्या 'मन की बात' कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधतात. यावेळी शेवटच्या रविवारी प्रजासत्ताक दिन असल्याने मोदी यांनी आज या कार्यक्रमातून जनतेशी संवाद साधला. यावेळी मोदी यांनी अयोध्येतील रामलला प्राणप्रतिष्ठेच्या वर्षपूर्तीचाही उल्लेख केला. राम मंदिराच्या लोकार्पणामुळे देशाच्या सांस्कृतिक विवेकाची पुनर्स्थापना झाली आहे, असे मोदी यांनी सांगितले.

**निष्पक्ष निवडणुकांमुळे लोकशाही मजबूत**

मोदी यांनी या कार्यक्रमातून केंद्रीय निवडणूक आयोगाचेही कौतुक केले. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आयोगाने केवळ लोकशाहीला मजबूतच केले नाही, तर निष्पक्ष निवडणुका घेण्याबाबतची आपली वचनबद्धताही सिद्ध केली, असे मोदी म्हणाले. विशेष म्हणजे, २५ जानेवारी हा निवडणूक आयोगाचा स्थापना दिन असल्यानेही या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त आहे. ◀(वृत्तसंस्था)

## भारतीय महिलांचा सुवर्ण विजय



प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या नवी दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमच्या चकचकीत प्रकाशात आणि जल्लोषात भारतीय महिलांनी खो-खोच्या पहिल्या विश्वचषकाचे विजेतेपद पटकावून इतिहास घडवला! अंतिम सामन्यात भारतीय संघाने नेपाळवर ७८-४० असा ३८ गुणांनी विजय साकारला. भारताच्या महिला संघाने खो-खोच्या पहिल्या विश्वचषकात दबदबा कायम ठेवत पहिले विश्वविजेतेपद पटकावले. महिला संघाने उत्कृष्ट संघभावना आणि अचूक रणनीतीच्या जोरावर नेपाळला हरवून सुवर्ण कामगिरी केली. हा विजय प्रत्येक भारतीय महिलेच्या स्वप्नांचा विजय आहे. या विश्वचषकासाठी प्रत्येक खेळाडूने १०० टक्के योगदान दिले आणि आज त्या सर्व मेहनतीचे फळ मिळाले. 'महिलांच्या प्रगतीचा आणि देशाच्या गौरवाचा क्षण आहे' अशी प्रतिक्रिया भारतीय महिला संघाची कर्णधार प्रियांका इंगळेने व्यक्त केली. (वृत्त पान ६ वर) ▶

## खो-खोमध्ये भारत जगज्जेता

**नवी दिल्ली, १९ जानेवारी -**

इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमच्या चकचकीत प्रकाशात आणि जल्लोषाच्या गजरात भारतीय पुरुष आणि महिला संघांनी खो-खोच्या पहिल्या विश्वचषकाचे विजेतेपद पटकावून इतिहास घडवला. नेपाळला अंतिम सामन्यात पराभूत करत भारतीय संघांनी संपूर्ण देशाला अभिमानाचा क्षण मिळवून दिला व भारतीय पुरुष व महिला संघांनी प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या स्टेडियमवर भारताचे नाव विश्वचषकावर सुवर्णअक्षरात कोरले. भारतीय खो-खो संघांनी एक अनोखा आणि गौरवास्पद इतिहास रचला आहे. भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी खो-खोच्या पहिल्या विश्वचषकात संपूर्ण स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवत पहिले विश्वविजेतेपद पटकावले.

(सविस्तर वृत्त पान ६ वर...)

# सैफवर हल्ला करणारा बांगलादेशी

### पाच दिवसांची पोलिस कोठडी

**◆ मुंबई, १९ जानेवारी**

अभिनेता सैफ अलीवर हल्ला करणारा आरोपी बांगलादेशी असून, त्याला मुंबई पोलिसांनी अटक केली. मोहम्मद शहजाद असे त्याचे नाव असून, न्यायालयाने त्याला पाच दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या मोहम्मद शहजादला शनिवारी रात्री पोलिसांनी अटक केली. पोलिसांनी पत्रपरिषदेत सांगितले की, आरोपीचे नाव मोहम्मद शरीफुल इस्लाम सज्जाद आहे, जो आतापर्यंत विजय दास या नावाने राहत होता. पोलिसांनी सर्वप्रथम सैफच्या इमारतीत आणि इमारतीभोवती त्या रात्री कोणते मोबाईल फोन सक्रिय होते, याचा तपास केला. यानंतर पोलिसांनी कोणता मोबाईल या भागातून गेला, याचा माग काढला. दादर स्टेशनजवळील एका मोबाईल दुकानातून हेडफोन खरेदी करणाऱ्या व्यक्तीचे मोबाईल लोकेशन पोलिसांनी ट्रॅक केले आणि त्याला अटक केली. ◀(वृत्तसंस्था)

# फडणवीस यांचे भव्य स्वागत

**◆ झ्युरिक, १९ जानेवारी**

दावोस येथे वर्ल्ड इकॉनॉमी फोरमसाठी गेलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे येथे बृहन महाराष्ट्र मंडळातर्फे रविवारी उत्साहात स्वागत करण्यात आले. फडणवीस यांनी वैश्विक मराठी परिवारातील आपल्या मराठी बांधवांशी मनमोकळा संवाद साधला. यावेळी पारंपरिक मराठी वाद्यांचा गजर करण्यात आला. लेझिम खेळून स्वागत करण्यात आले.



मराठी भाषिकांसोबत संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

फडणवीस म्हणाले की, स्वित्झर्लंडच्या बृहन महाराष्ट्र मंडळाच्या प्रेमाचे मोल नाही. मला या प्रेमातच राहायचे आहे. आपला महाराष्ट्र भारताचे पॉवर हाऊस असून, देश पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था झाल्यानंतर एक ते दोन वर्षांतच महाराष्ट्र पहिली उपराष्ट्रीय ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था होईल.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला देव, देश, धर्मासाठी लढायला शिकवले. आपल्या संस्कृतीचा, भाषेचा अभिमान बाळगायला शिकवले, ती शिकवण मराठी माणसाने स्वित्झर्लंडमध्येही जपली आणि पुढच्या पिढीलाही दिली, असे फडणवीस म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# आजपासून 'ट्रम्प'पर्व

### अमेरिकेत दिमाखदार सोहळ्याचे आयोजन

**◆ वॉशिंग्टन, १९ जानेवारी**



डोनाल्ड ट्रम्प सोमवारी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेणार आहेत. या सोहळ्यासाठी आजी-माजी अध्यक्ष, लोकप्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय शिष्टमंडळ आणि दोन लाख नागरिक उपस्थित राहण्याचा अंदाज आहे.

निवडणुकीतील विजयानंतर ट्रम्प यांच्या शपथविधीकडे सर्व जगाचे लक्ष लागले आहे. ट्रम्प यांनी आठ वर्षांपूर्वी पहिल्यांदा अध्यक्षपदाची शपथ घेतली होती. मात्र, २०२० च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला होता. ज्यो बायडेन यांच्या शपथविधी सोहळ्याला ट्रम्प अनुपस्थित राहिले होते.

पारंपरिकपणे 'कॅपिटॉल' इमारतीच्या बाहेर शपथविधी सोहळा होत असतो. मात्र, सोमवारी वॉशिंग्टनमधील तापमान उणे पाच ते उणे ११ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याचा तसेच थंडगार वारे वाहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे. त्यामुळे ट्रम्प यांचा शपथविधी सोहळा बंद सभागृहात होऊ शकतो. खराब हवामानामुळे नागरिकांना त्रास होऊ नये, अशी माझी इच्छा आहे. त्यामुळे कार्यक्रमस्थळ बदलण्याची विनंती केली, असे ट्रम्प यांनी जाहीर केले. ◀(वृत्तसंस्था)

# महाकुंभात सिलेंडरचा स्फोट; १९ तंबू खाक



कुंभमेळ्यातील तंबूंना लागलेली आग विझविताना अग्निशमन दलाचे जवान

### सुदैवाने जीवितहानी नाही

**◆ महाकुंभ नगर, १९ जानेवारी**

महाकुंभात रविवारी सिलेंडरच्या स्फोटामुळे मोठी आग लागली आणि सेक्टर १९ मधील १८ तंबू जळून खाक झाले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, असे सरकारने निवेदनात म्हटले आहे. आगीची माहिती मिळताच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घटनास्थळाला भेट दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संवाद साधत त्यांच्याकडून आगीबाबत माहिती घेतली.

१८ तंबू गिळंकृत करणाऱ्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी १५ बंबांचा वापर करण्यात आला, असे कुंभाचे मुख्य अग्निशमन अधिकारी प्रमोद शर्मा म्हणाले. लागलेली आग विझवण्यात आली आणि परिस्थिती नियंत्रणात आहे. महाकुंभाच्या सेक्टर १९ मध्ये दोन गॅस सिलेंडरचा स्फोट झाल्याने तंबूंना आग लागल्याचे त्यांनी सांगितले.

आगीची माहिती मिळताच वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन विभागाला आग विझवण्यात यश आले. आगीच्या घटनेने सर्वांना धक्का बसला. हा प्रकार अतिशय दुःखद आहे, असे महाकुंभाच्या 'एक्स' हॅण्डलवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# येणारा काळ राष्ट्रवादीचाच हवा : अजित पवार

**तभा वृत्तसेवा,**
**शिर्डी, दि. १९ जानेवारी-**

येणारा काळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा असला पाहिजे, हे आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे, असे सूचक विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी केले. योग्य नियोजन केले तर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला नक्कीच फायदा होईल. कार्यकर्त्यांनी पक्षाच्या वाढीसाठी झपाटून काम करण्यास सुरुवात केली पाहिजे, अशा सूचनाही अजित पवार यांनी शिर्डी येथील अधिवेशनात कार्यकर्त्यांना केल्या.



पक्षाच्या पुढील वाटचालीच्या पार्श्वभूमीवर शिर्डीत शिबीर आयोजित करण्यात आले. खरे तर सर्व नेत्यांनी सकाळी कामाला लवकर सुरुवात केली पाहिजे. सर्वांनी याची नोंद घेतली पाहिजे, असे अजित पवार म्हणाले. येणाऱ्या महापालिका आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकांच्या निमित्ताने जे उमेदवारीसाठी उत्सुक आहेत किंवा पक्षाच्या पदासाठी उत्सुक आहेत. त्यांनी कार्यकर्त्यांची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. उमेदवारांनी प्रत्येक विभागानुसार एक जबाबदार कार्यकर्ता निवडला पाहिजे, असेही ते म्हणाले. योग्य नियोजन केले तर येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आपल्याला नक्कीच फायदा होईल. कार्यकर्त्यांनी पक्षाच्या वाढीसाठी झपाटून काम करण्यास सुरुवात केली पाहिजे, असे आवाहन अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना केले. पक्षाचे संघटन वाढण्यासाठी तरुण आणि तरुणींना पक्षात काम करण्याची संधी दिली पाहिजे. येणारा काळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा काळ असला पाहिजे. माझी लाडकी बहीण योजना कोणत्याही परिस्थिती चालूच राहणार असल्याचे अजित पवारांनी सांगितले. यासाठी ३७०० कोटींचा चेक महिला आणि बालविकास खात्याला दिल्याचे त्यांनी सांगितले.







# एसटी बसची ट्रकला धडक

**◆ बीबी, १९ जानेवारी**

बीबी पोलिस स्टेशन हद्दीतील मेहकर-बीबी मार्गावर महारचिकणा गावाजवळील इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ एसटी बसने ट्रकला धडक दिल्याची घटना घडली. सुदैवाने यात कोणती प्राणहानी झाली नाही.

नागपूर-संभाजीनगर बस ही मेहकरहून संभाजीनगरकडे जात असताना महारचिकणा गावाजवळील इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ बसने ट्रकला मागून धडक दिल्याची घटना रविवारी सायंकाळी घडली. यामध्ये बसचे समोरील भागाचे नुकसान झाले. बसमध्ये ८१ प्रवासी होते. यात एका महिलेला गंभीर दुखापत झाली. इतर तीन प्रवाशांना किरकोळ दुखापत झाली. ◀(तभा वृत्तसेवा)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### गत विजेत्या भारतीय महिलांची विजयी सुरुवात

**क्वालालम्पूर** : येथे सुरू असलेल्या आयसीसी १९ वर्षांखालील महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी भारतीय महिला संघाने वेस्ट इंडीजवर ९ गड्यांनी विजय मिळवत जेतेपदाच्या बचावाची शानदार सुरुवात केली. भारताच्या पारुनिका सिसोदिया, जोशिता व्हीजे व आयुषी शुक्लाने आपापसात मिळून सात बळी टिपले व भारताचा विजय साकारला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय गोलंदाजांनी प्रभावी मारा करत वेस्ट इंडीजच्या संपूर्ण संघाला १३.२ षटकांत अवघ्या ४४ धावांत गुंडाळले. भारताने ४.२ षटकांत १ बाद ४७ धावा काढून आपला विजय साकारला. सामनावीर म्हणून निवडण्यात आलेली भारताची वेगवान गोलंदाज व्हीजे जोशिताने दोन षटकांत ५ धावांत २ बळी टिपले. आयुषी शुक्लाने ६ धावांत २ बळी,तर पारुनिका सिसोदियाने ७ धावांत ३ बळी टिपलेत. विजयासाठी धावांचा पाठलाग करताना सलामीवीर गोंगाडी त्रिशा (४) लवकरच बाद झाली, परंतु त्यानंतर जी. कमलिनी (१६) व सानिका चलकेने (१८) नाबाद खेळी करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केला.

### इंटर मियामीच्या विजयात मेस्सीचा शानदार गोल

**लास वेगास** : रविवारी एलेजिअंट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या हंगामपूर्वच्या पहिल्या सामन्यात इंटर मियामी सीएफने पेनॉल्टीवर क्लब अमेरिकेवर ३-२ ने शानदार विजय नोंदवला. लियोनेल मेस्सीने २०२५ हंगामपूर्वमधील आपला पहिला गोल केला. मेस्सी, लुईस सुआरेझ आणि जॉर्डी अल्बा या माजी एफसी बार्सिलोनाच्या त्रिकुटाने ३४ व्या मिनिटाला मियामीला बरोबरी मिळवून दिली. सामना निकाली काढण्यासाठी पेनॉल्टी शूटआउटचा अवलंब करण्यात आला. यात अलीकडेच करारबद्ध झालेल्या मियामी गोलरक्षक रोको रिओस नोव्होने दोन बचाव केले व १७ वर्षीय स्थानिक सॅण्टी मोरालेसने निर्णायक पेनॉल्टीवर गोल केला. हेरन्सने इंटर मियामीला शूटआउटमध्ये ३-२ असा विजय मिळवून दिला. पाच सामन्यांच्या प्रीसीझन दौऱ्यात इंटर मियामीचा पुढील सामना पेरूमधील युनिव्हर्सिटारियो डी डेपोर्टेसशी होणार आहे.

### बंगाल टायगर्सविरुद्ध विजयी सुरुवात करण्याचे सूरमाचे लक्ष्य

**राऊकेला** : हॉकी इंडिया लीग (एचआयएल) स्पर्धेत येथे सोमवारी बंगाल टायगर्स आणि सूरमा हॉकी क्लब या पुरुष संघाचा सामना होणार असून, त्यानंतर २२ जानेवारी रोजी दिल्ली एसजी पायपर्स विरुद्ध सामना होणार आहे. या दोन सामन्यांसह सूरमा हॉकी क्लबने लीगच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात योग्य दिशेने करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. दुसऱ्या टप्प्यात, सूरमा हॉकी क्लबला दिल्ली एसजी पायपर्स, बंगाल टायगर्स आणि वेदांत कलिंगा लान्सर्ससह 'अ' गटामध्ये स्थान देण्यात आले आहे. आतापर्यंत सहा सामने खेळल्यानंतर सूरमा हॉकी क्लबने एक विजय, दोन पेनॉल्टी शूटआउट बोनस गुण आणि एक बरोबरी मिळवून आठ गुणांसह गुणतालिकेत सहावे स्थान मिळवले आहे. दरम्यान, बंगाल टायगर्स चौथ्या स्थानावर आहे, त्यांनी शेवटच्या सामन्यात यूपी रुद्रसविरुद्ध ५-३ असा विजय मिळवला आहे.

### ॲन से यंग, ॲक्सेलसेन इंडिया ओपन एकेरीचे विजेते



**नवी दिल्ली** : पॅरिस ऑलिम्पिक विजेता डेन्मार्कचा व्हिक्टर ॲक्सेलसेन आणि दक्षिण कोरियाची ॲन से यंगने रविवारी येथील खाशाबा जाधव इनडोअर हॉलमध्ये इंडिया ओपन २०२५ बॅडमिंटन स्पर्धेत शानदार विजय मिळवत अनुक्रमे पुरुष आणि महिला एकेरीचे जेतेपद पटकावले. ॲक्सेलसनने हाँगकाँगच्या ली चेउक यिउचा २१-१६, २१-८ असा पराभव करून आपला तिसरा इंडिया ओपन पुरुष एकेरीचा किताब जिंकला तर ॲन से यंगने महिला एकेरीच्या अंतिम फेरीत थायलंडच्या पोर्नपावी चोचुवोंगचा २१-१२, २१-९ असा सहज पराभव केला. अरिसा इगाराशी व अयाका साकुरामोटो या बिगरमानांकित जपानी जोडीने महिला दुहेरीच्या अंतिम सामन्यात दक्षिण कोरियाच्या किम हे जांग आणि काँग ही यंगवर २१-१५, २१-१३ असा विजय मिळविला. चीनच्या दुसऱ्या मानांकित जियांग झेन बँग आणि वेई या झिन या जोडीने मिश्र दुहेरीच्या अंतिम फेरीत थॉम गिक्वेल आणि डेल्फिन डेलरू या बिगरमानांकित फ्रेंच जोडीचा २१-१८, २१-१७ असा पराभव केला. पुरुष दुहेरीत मलेशियाच्या गोह से फेई आणि नूर इज्जुद्दीनने दक्षिण कोरियाच्या किम वॉन हो आणि सेओ जे यांचा २१-१५, १३-२१, २१-१६ असा पराभव करून विजेतेपद पटकावले.

# भारतीय महिला संघाने नेपाळला हरवून विश्वविजेतेपद पटकावले!

**पहिली खो-खो विश्वचषक २०२५ स्पर्धा**

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमच्या चकचकीत प्रकाशात आणि जल्लोषाच्या गजरात भारतीय महिलानी खो-खोच्या पहिल्या विश्वचषकाचे विजेतेपद पटकावून इतिहास घडवला! नेपाळला अंतिम सामन्यात पराभूत करत भारतीय संघाने संपूर्ण देशाला अभिमानाचा क्षण मिळवून दिला. भारतीय महिला संघाने प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या स्टेडियमवर महिलांच्या अंतिम सामन्यात भारताने नेपाळवर ७८-४० असा ३८ गुणांनी विजय साकारला.

अंतिम सामन्यांमध्ये भारतीय संघाने आपल्या चपळ खेळाने प्रेक्षकांना थक्क केले. उत्कृष्ट संघभावना आणि अचूक रणनीतीच्या जोरावर नेपाळला हरवून सुवर्ण कामगिरी केली.

भारतीय संघाचा विजय ही त्यांच्या अथक मेहनतीचे फलित होते. जलद चपळाई, अचूकता आणि जिद्दीने मैदानावर भारतीय खेळाडूंनी एकतर्फी वर्चस्व सिद्ध केले. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाने आणि कर्णधारांच्या नेतृत्वाने संघाने प्रत्येक क्षणाला सामर्थ्यपूर्ण प्रतिसाद दिला. खो-खो या पारंपरिक भारतीय खेळाने जागतिक पातळीवर आपले अस्तित्व दाखवले आहे. हा विजय केवळ संघाचा नव्हे, तर भारतीय क्रीडा संस्कृतीचा मोठा विजय आहे. घराघरात टीव्ही स्क्रीनसमोर तासन्तास खो-खोच्या सामन्यांचा आनंद घेतलेल्या चाहत्यांनी जल्लोष केला.



नेपाळविरुद्धच्या अंतिम सामन्यात गडी बाद करण्याच्या प्रयत्नांत भारतीय महिला खो-खो खेळाडू

अंतिम सामन्यात पहिल्या टर्नमध्ये भारतीय संघाने आक्रमण करताना नेपाळची पहिली तुकडी ५० सेकंदात, दुसरी तुकडी १.४८ मि. तर तिसरी तुकडी १.२० मि. बाद केली व चौथी तुकडी १ मि. पाचवी तुकडी ४५ सेकंदात तर उरलेले दोन खेळाडू ३४ सेकंदाच्या आत बाद करत भारताच्या खेळाडूंनी ३४ गुण मिळवले. या वेळी कर्णधार प्रियांका इंगळे, रेश्मा राठोड यांनी चमकदार खेळी केली.

दुसऱ्या टर्नमध्ये भारताला एक ड्रीम रन मिळाला. दुसरी तुकडी १.३९ मि. बाद करण्यात नेपाळला यश मिळाले. भारताने मध्यंतराला ३५-२४ अशी ११ गुणांची आघाडी घेतली होती.

तिसऱ्या टर्नमध्ये भारताने आक्रमणात नेपाळची पहिली तुकडी १.४२ मि. बाद करून जोरदार प्रतिउत्तर दिले. भारताने ७३-२४ अशी गुणांची नोंद केली. चौथ्या टर्न मध्ये नेपाळने आक्रमण केले, पण ते आक्रमण परतवून लावताना भारताच्या पहिल्या तुकडीने ५.१४ मि. वेळ देत नेपाळला सामन्यात पुन्हा परतण्याची संधीच न देण्याची किमिया साधली व हा सामना भारताने ७८-४० असा ३८ गुणांनी जिंकला.

(तभा वृत्तसेवा)

### कर्णधार प्रियांका इंगळेची प्रेरणादायी प्रतिक्रिया

"हा विजय केवळ आमच्या संघाचा नव्हे, तर प्रत्येक भारतीय महिलेच्या स्वप्नांचा विजय आहे. या विश्वचषकासाठी आम्ही महिनोंमहिने कष्ट घेतले, प्रत्येक खेळाडूने आपले १०० टक्के योगदान दिले, आणि आज त्या सर्व मेहनतीचं फळ मिळाले आहे. महिला कर्णधारानेही या विजयाला "महिलांच्या प्रगतीचा आणि देशाच्या गौरवाचा क्षण असल्याचे" म्हटले.

नेपाळसारख्या पहाडी प्रतिस्पर्ध्याविरुद्ध खेळताना दबाव मोठा होता, पण आम्ही एक संघ म्हणून उभे राहिलो आणि प्रत्येक क्षणी एकमेकांना पाठिंबा दिला.आज आम्ही इतिहास रचला, पण ही केवळ सुरुवात आहे. भारतीय महिलांचा खेळ प्रत्येक आंतरराष्ट्रीय मंचावर चमकणार, याची खात्री आहे. हा विजय प्रत्येक भारतीयासाठी समर्पित आहे"

# पुढील लक्ष्य राष्ट्रकुल, आशियाड गेम्सचे

### भारतीय खो-खो संघातील पुण्याच्या सुयश गरगटेचे मनोगत

**अजितकुमार संगवे**

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

भारतीय व आंतरराष्ट्रीय खो-खो महासंघाचे राष्ट्रकुल, आशियाड क्रीडा व ऑलिम्पिक स्पर्धेत खो-खोचा समावेश करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. त्यात यश आल्यास माझे पुढील लक्ष्य भारतीय संघात निवडीचे आहे, असे मनोगत भारतीय खो-खोपटू सुयश विश्वास गरगटे याने व्यक्त केले.



नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर सुरू असलेल्या पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेत सुयश भारतीय संघाकडून कामगिरी करत आहे. महाराष्ट्राच्या खो-खो क्षेत्रात पुण्यातील सुयशची उत्कृष्ट खेळाडू म्हणून ख्याती आहे. त्याची खेळातली सुरुवात, मेहनत, यशस्वी प्रवास आणि सध्याचे स्थान हे नवोदित खेळाडूसाठी प्रेरणादायी आहे.

खो-खोकडे कसे वळलो हे सांगताना सुयश म्हणतो, २००७ मध्ये नवमहाराष्ट्र संघ पुणे यांच्याकडून खो-खो खेळायला सुरुवात केली. सुरुवातीला शाळेत असताना लंगडी खेळत होतो. त्यानंतर खो-खोमध्ये रस निर्माण झाला. अर्जुन पुरस्कार विजेते श्रीरंग इनामदार व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते शिरीन गोडबोले यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा जीवन अनेक सुवर्णक्षणांनी भरलेले आहे.

२०१३ मध्ये राजस्थान येथे झालेल्या १८ वर्षाखालील राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले. त्यानंतर मागे वळून पाहिले नाही. २०१६ मध्ये नागपूर येथे झालेल्या वरिष्ठ गट राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रौप्य, गुवाहाटी येथे झालेल्या चौथी एशियनमध्ये सुवर्ण, ३६ व ३७ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पटकाविले. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सात स्पर्धेत सहभागासह पदके मिळविली. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा स्पर्धेत एकलव्य व राज्य अजिंक्यपद स्पर्धेत राजे संभाजी पुरस्काराने सन्मानित. याच कामगिरीवर २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा माझा आनंदाचा व अविस्मरणीय क्षण आहे, असे सुयश म्हणाला. सुयशने केवळ खेळातच नाही तर शिक्षण क्षेत्रातही आपले कर्तृत्व सिद्ध केले. बीएससी कॉम्प्युटर सायन्स आणि एम.ए. इकॉनॉमिक्स मध्ये शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या तो मुंबई चर्चगेट येथील आयकर विभागात कार्यरत आहेत. महाराष्ट्र शासनानेही त्यास वर्ग दोनची स्पोर्ट्स एक्झिक्युटिव्ह ऑफिसर पदाची नियुक्ती दिली आहे.

# टेस्फे, चेपकेमोई मुंबई मॅरेथॉनचे विजेते

### भारतीयांमध्ये अनिश थापा, निर्माबेन ठाकोर अव्वल



रविवारी मुंबईत टाटा मुंबई मॅरेथॉन दरम्यान वांद्रे-वरळी सागरी मार्गावर धावणारे सहभागी

◆ **मुंबई, १९ जानेवारी**

रविवारी येथे झालेल्या टाटा मुंबई मॅरेथॉनमध्ये इरिट्रियाच्या बेरहान टेस्फे व केनियाच्या जॉइस चेपकेमोई टेलेने अनुक्रमे पुरुष व महिला गटात एलिट विजेतेपद पटकावले.

भारतीयांमध्ये अनिश थापाने (२ तास १७ मिनिट २३ सेकंद) पुरुषांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला, तर निर्माबेन ठाकोरने (२ तास ५० मिनिट ०६ सेकंद) महिलांमध्ये आपला किताब कायम ठेवला. हजारो मुंबईकरांनी जागतिक ॲथ्लेटिक्स गोल्ड लेबल रोड रेसमध्ये भाग घेतला. इरिट्रिया या लहान आफ्रिकन देशाच्या टेस्फेने २ तास ११ मिनिटे आणि ४४ सेकंदात ४२.१९५ कि. मी. अंतर पूर्ण करून आपले पहिले आंतरराष्ट्रीय पूर्ण मॅराथॉनचे जेतेपद जिंकले. टेस्फेचा देशबांधव मेरहावी केसेटेने २ तास ११ मिनिट ५० सेकंदासह दुसरे स्थान, तर इथिओपियाच्या टेस्फेय डेमेके (२:११:५६) तिसरे स्थान मिळविले. महिला विभागात जॉयस टेलीने २ तास २४ मिनिट ५६ सेकंदात महिला वर्गाचा मुकुट जिंकला. बहरीनच्या शिताये एशेटेने (२:२५:२९ सेकंद) दुसरे स्थान, तर इथिओपियाच्या मेडिना डेमे आर्मिनोने (२:२७:५८ सेकंद) तिसरे स्थान मिळविले. (वृत्तसंस्था)

# पाकिस्तानचा वेस्ट इंडीजवर १२७ धावांनी विजय

### साजीद, नोमान, अबरारने टिपलेत २० बळी

**मुल्तान, १९ जानेवारी**

पाकिस्तान आणि पाहुण्या वेस्ट इंडीजदरम्यानच्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात दोन्ही संघांच्या गोलंदाजांनी वर्चस्व गाजविले, मात्र यात पाकिस्तानचे गोलंदाज सरस ठरले. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी चहापानाला अर्धा तास शिल्लक असताना पाकिस्तानने वेस्ट इंडीजवर १२७ धावांनी विजय मिळवला.

फिरकीपटू साजीद नोमान व अबरार अहमदने सर्व २० बळी टिपत पाकिस्तानला दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी मिळवून दिली. नऊ बळी टिपणारा साजीद सामनावीर ठरला.



पाकिस्तानने पहिल्या डावात २३० धावा उभारल्या व प्रत्युत्तरात वेस्ट इंडीज संघ १३७ धावांतच गारद झाला. पहिल्या डावांत ९३ धावांची आघाडी मिळविणाऱ्या पाकिस्तानचा दुसरा डाव १५७ धावांत आटोपला व त्यांनी वेस्ट इंडीजसमोर विजयासाठी २५१ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले, परंतु वेस्ट इंडीजचा संपूर्ण संघ दुसऱ्या डावांत ३६.३ षटकांत १२३ धावांतच गारद झाला.

सकाळच्या सत्रात वेस्ट इंडीजच्या जोमेल वॉरिकनने ३२ धावांत ७ बळी घेतले, पण तोपर्यंत पाकिस्तानने पुरेशी आघाडी घेतली होती. वेस्ट इंडीजला झटपट गुंडाळताना साजिद खानने ५० धावांत ५ बळी व अबरार अहमदने २७ धावांत ४ बळी टिपले. पहिल्या डावात साजिदने ६५ धावांत ४ बळी टिपले. (वृत्तसंस्था)

### गैरवर्तनबद्दल मेदवेदेवला दंड

**मेलबर्न** : वर्षाच्या पहिल्या ग्रॅण्ड स्लॅममध्ये खेळाडुंच्या गैरवर्तनाबद्दल रशियाच्या डॅनिल मेदवेदेवला त्याच्या ऑस्ट्रेलियन ओपन बक्षीस रकमेचा मोठा भाग दंड म्हणून ठोठावण्यात आला आहे. २८ वर्षीय मेदवेदेवने मंगळवारी थायलंडच्या वाईल्डकार्डधारी कासिडित समरेजविरुद्धच्या पहिल्या फेरीतील विजयादरम्यान मेदवेदेवने पाच वेळा आपली रॅकेट नेटमध्ये घुसवली. गुरुवारी उशिरा अमेरिकन लर्नर टिएनकडून दुसऱ्या फेरीत पाच सेटमध्ये झालेल्या पराभवादरम्यान मेदवेदेवला दंड ठोठावण्यात आला. त्यानंतर तो सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत उपस्थित राहू शकला नाही.

# बोपण्णा-झांग शुई उपांत्यपूर्व फेरीत



झांग शुई व रोहन बोपण्णा

◆ **मेलबर्न, १९ जानेवारी**

अनुभवी भारतीय टेनिसपटू रोहन बोपण्णा व त्याची चीनची जोडीदार झांग शुईला रविवारी येथे दुसऱ्या फेरीच्या सामन्यात प्रतिस्पर्धी जोडीकडून पुढे चाल मिळाल्यामुळे त्यांनी ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेच्या मिश्र दुहेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

बोपण्णा व शुई या जोडीचा सामना अमेरिकेच्या टेलर टाउनसेंड व ह्यूगो नायस या जोडीशी होणार होता, परंतु बोपण्णा व शुई कोर्टवर न उतरताच अंतिम आठ फेरीत पोहोचली. आता त्यांचा पुढील सामना टिमिया बाबोस (हंगेरी)-मार्सेलो अरेव्हालो (एल. साल्वाडोर) आणि ऑलिव्हिया गाडेकी आणि जॉन पीअर्स या ऑस्ट्रेलियन जोडीदरम्यानच्या सामन्यातील विजेत्याशी होईल.□या इंडो-चीनी जोडीने यापूर्वी पहिल्या सामन्यात फ्रान्सच्या क्रिस्टीना लादेनोविक व क्रोएशियाच्या इव्हान डोडिक यांचा ६-४, ६-४ असा पराभव केला होता. (वृत्तसंस्था)

# गुकेशचा अनिश गिरीवर पहिला विजय

**टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ**

◆ **विज्क आन झी, १९ जानेवारी**

येथे सुरू असलेल्या टाटा स्टील मास्टर्स बुद्धिबळ स्पर्धेत पहिल्या फेरीत विश्वविजेता डी. गुकेशने हॉलंडच्या अनिश गिरीवर विजय नोंदवला.

शुक्रवारी सर्वोच्च क्रीडा पुरस्कार 'खेलरत्न' सन्मान स्वीकारल्यांतर डी. गुकेश ॲमस्टरडॅमला रवाना झाला. गुकेश स्पर्धेची पहिली फेरी सुरु होण्याच्या एक तास आधी येथे पोहोचला. या प्रवासामुळे गुकेशची पहिल्या फेरीच्या लढतीच्या प्रारंभी दमछाक झाली असावी, परंतु ऐन मोक्याच्या क्षणी त्याला सूर गवसला. गुकेशने अशा चाली शोधल्या ज्या गिरीला काही कठीण पर्याय देऊ शकल्या. सरतेशेवटी नेदरलॅण्डच्या गिरीला पराभव मान्य करावा लागला. तीन निर्णायक गेमसह ही एक पहिली फेरी होती.

आपल्या पांढऱ्या मोहऱ्यांचा पुरेपूर फायदा पी. हरिकृष्णने चौथा विश्वमानांकित देशबांधव अर्जुन एरिगायसीच्या बचावफळीला भेदून काढले.

लिओन ल्यूक मेंडोन्काने अनेक चुका केल्यामुळे त्याच्या आवाक्यातील विजय हातातून निसटला, त्याला जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरकडून पराभव पत्करावा लागला.

आर. प्रज्ञानंदने अब्दुसत्तोरोव्हविरुद्ध कडक प्रतिकार केला आणि अखेर बरोबरी साधली.

पहिल्या फेरीतील इतर



डी. गुकेश



आर. वैशाली

सामनेही बरोबरीत संपले. गतविजेत्या चीनच्या वेई यीने अव्वल मानांकित अमेरिकेच्या फॅबियानो कारुआनासोबत बरोबरी साधली. हॉलंडच्या मॅक्स वॉर्मरडॅमने सर्बियाच्या ॲलेक्सी सरनासोबत समान गुण वाटून घेतले, तर नेदरलॅण्डच्या जॉर्डन व्हॅन फॉरेस्टने स्लोव्हेनियाच्या व्लादिमीर फेडोसेव्हसोबत बरोबरी साधली.

**वैशालीची विजयी सुरुवात नागपूरच्या दिव्याचा पराभव**

चॅलेंजर्स विभागात आर. वैशालीने जगातील सर्वात तरुण आंतरराष्ट्रीय मास्टर अर्जेंटिनाच्या ११ वर्षीय ओरो फॉस्टिनोविरुद्ध विजयी सुरुवात केली, परंतु नागपूरच्या दिव्या देशमुखला उच्च मानांकित उझबेकिस्तानच्या नोदिरबेक याकुबोएव्हकडून पराभव पत्करावा लागला. (वृत्तसंस्था)

# जडेजा दिल्लीविरुद्ध सौराष्ट्राकडून रणजी करंडक सामन्यात खेळणार

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

भारताचा अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजा रविवारी राजकोटमध्ये सौराष्ट्र संघाच्या सराव सत्रात उपस्थित राहिल्यानंतर २३ जानेवारीपासून दिल्लीविरुद्ध रणजी करंडक साखळी सामन्यात सौराष्ट्र संघाकडून खेळणार आहे.

जडेजा शेवटचा सौराष्ट्राकडून जानेवारी २०२३ मध्ये खेळला होता. ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर बीसीसीआयने दुखापतीमुळे खेळाडू उपलब्ध नसल्यास स्थानिक क्रिकेटमध्ये उपस्थित राहणे अनिवार्य केले आहे.

जडेजा आज सरावासाठी आला आहे. तो पुढचा सामना खेळेल, असे सौराष्ट्र क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष जयदेव शाह यांनी रविवारी वृत्तसंस्थेला सांगितले. ऑस्ट्रेलियामध्ये वाईट फॉर्मशी झुंजणाऱ्या भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने जम्मू-काश्मीरविरुद्धच्या पुढील रणजी करंडक सामन्यासाठी आपण उपलब्ध असल्याची पुष्टी केली. ऋषभ पंत, शुभमन गिल व यशस्वी जयस्वाल हे देखील आपापल्या संघातून खेळणार आहे.



पंत सौराष्ट्राविरुद्ध दिल्लीच्या अंतिम एकादशमध्ये असेल, तर भारताचा स्टार खेळाडू विराट कोहली दुखापतीमुळे या सामन्यात भाग घेणार नाही.

शनिवारी चॅम्पियन्स चषकासाठी भारतीय संघात जडेजाची निवड करण्यात आली. गत वर्षी बार्बाडोसमध्ये झालेल्या टी-२० विश्वचषक विजयानंतर जडेजाने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली. (वृत्तसंस्था)

# अल्काराझ, सबालेन्का, गॉफ उपांत्यपूर्व फेरीत

### ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस

◆ **मेलबर्न, १९ जानेवारी**

येथे सुरू असलेल्या वर्षातील पहिल्या ग्रॅण्ड स्लॅम- ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेत रविवारी पुरुष गटात स्पेनचा कार्लोस अल्काराझ, द्वितीय विश्वमानांकित जर्मनीचा ॲलेक्झांडर इव्हेरेव्ह व महिला विभागात बेलारूसची आर्यना सबालेन्का, अमेरिकेची कोको गॉफने आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय नोंदवत स्पर्धेची उपांत्यपूर्व फेरी गाठली.

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या आर्यना सबालेन्काने किशोरवयीन मिरा ॲण्ड्रीव्हाला ६-१, ६-२ असे पराभूत करून सलग तिसऱ्या जेतेपदाच्या दिशेने वाटचाल सुरू ठेवली.



विजयाचा आनंद साजरा करताना आर्यना सबालेन्का



बेन्सिकविरुद्ध खेळताना कोको गॉफ

१४ व्या मानांकित सबालेन्काने रॉड लेव्हर अरेना येथे चौथ्या फेरीचा सामना जिंकत आपली विजयी मालिका १८ सामन्यांपर्यंत वाढवली. १७ वर्षीय मिरा ॲण्ड्रीवाविरुद्धचे सामने नेहमीच कठीण असतात. ती खूप तरुण आहे व खूप उत्तम टेनिस खेळते, असे २६ वर्षीय सबालेन्का म्हणाली. सबालेन्काचा पुढील सामना डोना वेकिक किंवा ॲनास्तासिया पावल्युचेन्कोवा यांच्याशी होईल.

कोको गॉफने एका सेट पिछाडीवर पडल्यानंतरही बेलिंडा बेन्सिकचा ५-७, ६-२, ६-१ असा पराभव करत उपांत्यपूर्व फेरी गाठली. या विजयाबरोबरच कोकोने आपली विजयी मालिका नऊ सामन्यांपर्यंत वाढवली.

जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या ॲलेक्झांडर इव्हेरेव्हने युगो हम्बर्टवर ६-१, २-६, ६-३, ६-२ असा विजय नोंदवला. आता त्याचा उपांत्यपूर्व सामना अमेरिकन टॉमी पॉलसोबत होईल.

१४ वा मानांकित हम्बर्ट एक अविश्वसनीयपणे कठीण खेळाडू आहे, असे इव्हेरेव्ह म्हणाला. कार्लोस अल्काराझने ऑस्ट्रेलियन ओपनची उपांत्यपूर्व फेरी गाठली. त्याचा प्रतिस्पर्धी ब्रिटनचा जॅक ड्रेपर ७-५, ६-१ असा पिछाडीवर असताना जखमी अवस्थेत निवृत्त झाला, त्यामुळे अल्काराझला पुढील फेरीत सहज प्रवेश मिळाला. (वृत्तसंस्था)

# तीन तासांच्या विलंबानंतर युद्धबंदी लागू

◆ **दीर-अल-बलाह, १९ जानेवारी**

जगाचे लक्ष वेधलेल्या इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धबंदी करार रविवारी सुमारे तीन तासांच्या विलंबानंतर लागू झाला. कराराच्या बिलंबासाठी इस्रायलने हमासला जबाबदार ठरवले आहे.

स्थानिक वेळेनुसार सकाळी सव्वाअकरा वाजता युद्धबंदी करार लागू झाला. दरम्यान, हमासने ओलिसांची नावे देण्यास विलंब केलेल्या वेळेत गाझात इस्रायलने केलेल्या हल्ल्यात आठ जणांचा मृत्यू झाला.

इस्रायल आणि हमास यांच्यातील सहा आठवड्यांच्या युद्धबंदीचा पहिला टप्पा रविवारी सकाळी ८.३० वाजता लागू होणार होता. करार अंमलात येण्यापूर्वी इस्रायलने स्पष्ट केले होते की, हमास ओलिसांची नावे सुपूर्द करीत नाही, तोपर्यंत युद्धबंदी सुरू होणार नाही. तांत्रिक कारणांमुळे नावे सादर करण्यास विलंब झाल्याचे हमासने म्हटले आहे. तीन तासांनंतर हमासने तीन ओलिसांची नावे इस्रायलला सोपवली. त्यात तीन महिला आहेत.

हमासकडून नावे मिळण्यास विलंब होत असल्याने इस्रायलने गाझा पट्टीत हवाई हल्ले केले. यात आठ जणांचा मृत्यू झाला. दक्षिण गाझा शहरातील खान युनुस येथील नासेर रुग्णालयाने हल्ल्यातील मृतांची पुष्टी केली. इस्रायलने म्हटले की, हमासने सुटका करायच्या असलेल्या ओलिसांची नावे उघड न करून युद्धविराम सुरू होण्यास विलंब केला. युद्धबंदी सुरू झाल्यानंतर सुमारे दोन तासांनी हमासने नावे जाहीर केली.



विलंबाच्या 'त्या' तीन तासांमध्ये इस्रायलने गाझावर अनेक हवाई हल्ले केले. यात आठ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे

या करारांतर्गत हमास पहिल्या टप्प्यात ३३ बंधकांना सोडेल आणि त्या बदल्यात इस्रायल ७०० पॅलेस्टिनी कैद्यांना मुक्त करेल. या करारामुळे दोन्ही पक्ष त्यांच्या सर्वात प्राणघातक आणि विनाशकारी संघर्षाच्या समाप्तीच्या दिशेने एक पाऊल जवळ येत आहेत. ◄(वृत्तसंस्था)

# अंतराळ क्षेत्राला हवी पीएलआय योजना, कर सवलती

**अपेक्षा अर्थसंकल्पाकडून**

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

केंद्र सरकारने अंतराळ आधारित सेवांवर अधिक खर्च करावा, स्टार्ट-अप्सच्या वाढीला चालना देण्यासाठी कर कमी करावे आणि केंद्रीय अर्थसंकल्पात अंतराळ उत्पादन-संबंधित प्रोत्साहन योजना अर्थात् पीएलआय सुरू करावी, अशी अपेक्षा अंतराळ क्षेत्राची अर्थसंकल्पाकडून आहे.

१ फेब्रुवारी रोजी सादर होणाऱ्या अर्थसंकल्पापूर्वी या क्षेत्राने केंद्र सरकारकडे अर्थसंकल्पातील तरतुदींसाठी काही मागण्या केल्या आहेत. भारतीय अंतराळ अर्थव्यवस्थेचे मूल्य ८.४ अब्ज डॉलर्स आहे आणि पुढील दशकात होणाऱ्या अनेक पटीच्या वाढीवर नजर ठेवून खाजगी क्षेत्राने उपग्रह आणि प्रक्षेपण प्रणाली बांधून आपला ठसा उमटवण्यास सुरुवात केली आहे.

कदाचित अंतराळ क्षेत्रासाठी उत्पादन संबंधित प्रोत्साहन योजना अर्थसंकल्पाच्या दृष्टिकोनातून उपयुक्त ठरू शकते. अंतराळ क्षेत्रासाठी खूप पायाभूत सुविधांचा विकास करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे कंपन्यांना स्थानिक उत्पादन सुरू करण्यास प्रोत्साहन दिले जाऊ शकते. असे झाल्यास उत्तम होईल, असे पिक्सेल स्पेसचे सहसंस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अवैस अहमद यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

भारतीय अंतराळ संस्थेचे महासंचालक लेफ्टनंट जनरल ए. के. भट्ट (निवृत्त) यांनी उद्योगांसाठी विशिष्ट कालावधीसाठी आयातीवर सवलती, जीएसटीत कपात आणि कर सवलत देण्याची मागणी केली आहे. ◄(वृत्तसंस्था)

# दोन मोठ्या आयटी कंपन्या करणार ३२ हजार फ्रेशर्सची भरती

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

देशातील दोन आघाडीच्या आयटी कंपन्यांनी कॅम्पसमधून सुमारे ३२ हजार नवोदितांची भरती करण्याची योजना आखली आहे. इन्फोसिस पुढील वर्षी २० हजार फ्रेशर्सची नियुक्ती करणार आहे, तर विप्रोने १० हजार ते १२ हजार फ्रेशर्सची नियुक्ती करण्याची योजना आखली आहे. शुक्रवारी तिसऱ्या तिमाहीचे निकाल जाहीर करताना विप्रोने ही माहिती दिली. आयटी क्षेत्रांत मागणी वाढत असल्याचे हे संकेत आहेत.

विप्रोचे अधिकारी सौरभ गोविल म्हणाले की, कंपनी दरवर्षी १० ते १२ हजार फ्रेशर्सची भरती करेल. यावर्षी कॅम्पसमधून १० हजार फ्रेशर्सची भरती केली जाईल. तिसऱ्या तिमाहीत कंपनीने कॅम्पसमधून सुमारे ७ हजार फ्रेशर्स भरती केली आहे.

पुढील तिमाहीत २,५०० ते ३ हजार फ्रेशर्सची भरती करण्याची योजना आहे. ते म्हणाले की, आम्ही जेवढे काम देऊ शकतो, तेवढ्याच ऑफर देत आहोत. नवीन भरतीसाठी



विप्रो कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात् एआयचा वापर करण्याची योजना आखत आहे.

चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या तिसऱ्या तिमाहीत विप्रोचा निव्वळ नफा वार्षिक आधारावर २४.४ टक्क्यांनी वाढून सुमारे ३,३५४ कोटी रुपये झाला आहे. विप्रोने शुक्रवारी शेअर बाजाराला दिलेल्या माहितीत म्हटले आहे की, कंपनीचा महसूल ०.५ टक्क्यांनी वाढून सुमारे २२,३१९ कोटी रुपये झाला आहे.

इन्फोसिस आणि विप्रोसारख्या भारतातील इतर मोठ्या आयटी कंपन्याही येत्या आर्थिक वर्षात फ्रेशर्सची भरती करणार आहेत. इन्फोसिसने २० हजारांवर फ्रेशर्सची भरती करण्याची घोषणा केली आहे, तर टीसीएसने देखील भरती वाढवण्याचे संकेत दिले आहेत. ◄(वृत्तसंस्था)

# अमेरिकेत टिकटॉक झाले बंद

◆ **ह्युस्टन, १९ जानेवारी**

लोकप्रिय व्हिडीओ शेअरिंग प्लॅटफॉर्मवर बंदी घालणारा कायदा लागू होण्याच्या काही तास आधी अमेरिकेत टिकटॉकचे ॲप बंद झाले.

अमेरिकेत टिकटॉकवर बंदी घालणारा कायदा लागू करण्यात आला आहे. दुर्दैवाने याचा अर्थ असा की, तुम्ही सध्या टिकटॉक वापरू शकत नाहीत, असा संदेश अमेरिकी वापरकर्त्यांना ॲप उघडताच दिसून आला. आम्ही भाग्यवान आहोत की, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पदभार स्वीकारल्यानंतर टिकटॉक पुन्हा सुरू करण्याच्या उपायावर काम करण्याचे संकेत दिले आहेत, असे संदेशात म्हटले आहे.

बायडेन प्रशासनाने टिकटॉक बंद करण्याच्या धमकीला 'स्टंट' म्हणून फेटाळले. टिकटॉकने स्पष्ट आश्वासनाशिवाय सेवा स्थगित करण्याशिवाय पर्याय नसल्याचे सांगितले. कर्मचाऱ्यांना पाठवलेल्या अंतर्गत ई-मेलमध्ये कंपनीने असे म्हटले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी २० जानेवारी रोजी पदभार स्वीकारल्यानंतर टिकटॉक पुन्हा सुरू करण्यासाठी उपाय शोधण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ◄(वृत्तसंस्था)

# गृह मंत्रालयाने यावर्षी ६७ संस्थांना दिले एफसीआरए प्रमाणपत्र

**महाराष्ट्रातील १० संस्थांनाही परदेशी निधीची परवानगी**

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

गृह मंत्रालयाने या वर्षी आतापर्यंत ६७ संस्थांना परकीय योगदान नियमन कायद्याअंतर्गत (एफसीआरए) प्रमाणपत्रे दिली. यापैकी १० संस्था महाराष्ट्रातील आहेत. मंत्रालयाच्या मते, या संस्था सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक आणि आर्थिक उपक्रमांमध्ये कार्यरत आहेत. याचा फायदा देशभरातील एका मोठ्या समुदायाला होत आहे.

गृह मंत्रालयाने एफसीआरए अंतर्गत परवानगी दिलेल्या संस्थांमध्ये मुंबईचे महाराष्ट्र लोकहित सेवा मंडळ, अंजेज चॅरिटेबल ट्रस्ट, प्रोत्साहित फाऊंडेशन, मंचिबा लालजीभाई चॅरिटेबल ट्रस्ट, अहान फाऊंडेशन, सातारा जिल्ह्यातील रिद्धी सिद्धी कृषी आणि ग्रामीण शिक्षा समाज संस्था जांभुळणी, नागपुरातील ग्राम सेवा संघ, कामगावमधील अल्लाह की दीन मल्टीपर्पज एज्युकेशन सोसायटी, अहमदनगरचे आपला गाव फाऊंडेशन आणि आश्रय संस्था यांचा समावेश आहे.

गेल्या वर्षी गृह मंत्रालयाने महाराष्ट्रातील अशा ५६ संस्थांना एफसीआरए प्रमाणपत्र दिले होते. यावर्षी महाराष्ट्रातील १० संस्थांसह देशातील ६७ संस्थांना एफसीआरए प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

एफसीआरए हा एक भारतीय कायदा आहे, जो व्यक्ती, कंपन्या आणि संस्थांद्वारे परदेशी निधीची स्वीकृती आणि वापर नियंत्रित करतो. परकीय निधीचा वापर योग्य आणि पारदर्शक पद्धतीने व्हावा आणि भारताच्या सार्वभौमत्वाला, अखंडतेला किंवा अंतर्गत सुरक्षेला कोणताही धोका पोहोचू नये, यासाठी एफसीआरए कायदा आहे. ◄(वृत्तसंस्था)

# मणिपूरच्या काकचिंगमध्ये बंडखोराला अटक

◆ **इम्फाळ, १९ जानेवारी**

युनायटेड पीपल्स पार्टी ऑफ कांग्लेईपाक या प्रतिबंधित संघटनेच्या बंडखोराला काकचिंग जिल्ह्यात पोलिसांनी अटक केली, असे अधिकाऱ्यांनी रविवारी सांगितले. काकचिंगमधील हियांग्लाम लाय पांगाम्बा परिसरातून या बंडखोराला अटक करण्यात आली. दरम्यान, थौबल जिल्ह्यात लिलाँग पोलिस ठाणे हद्दीतील उशोईपोक्पी परिसरातून सुरक्षा दलाने स्नायपर रायफल, देशी रायफल, कार्बाईन मॅग्झिन, तीन .३०३ रायफली, ग्रेनेड, डेटोनेटर, काडतुसे आणि इतर साहित्य शनिवारी जप्त केले. ◄(वृत्तसंस्था)




# ३० लाखांचे पॅकेज सोडून अभियंता बनले संन्यासी

**वडील होते अमेरिकन कमांडर, मुलगा महाकुंभात महामंडलेश्वर**

अमेरिकन सैन्यदलातील माजी वरिष्ठ अधिकाऱ्याचा मुलगा आणि आयटी व्यावसायिक असलेल्या टॉम नावाच्या व्यक्तीने भारतात आध्यात्मिक जीवन स्वीकारले आहे. आता व्यासानंद गिरी म्हणून ओळखले जाणारे ते प्रयागराज येथील निरंजनी आखाड्यात सहभागी झाले आहेत. रविवारी एका भव्य समारंभात त्यांना अधिकृतपणे महामंडलेश्वर म्हणून दीक्षा देण्यात आली.

पंचायती आखाड्याचे अध्यक्ष आणि आखाडा परिषदेचे प्रमुख महंत रवींद्र पुरी यांनी सांगितले की, टॉमचा प्रवास वयाच्या १५ व्या वर्षी अध्यात्मात रुची घेऊन सुरू झाला. आदी शंकराचार्यांच्या शिकवणीने प्रेरित होऊन आणि नंतर महर्षी महेश योगी यांच्या मार्गदर्शनाने त्यांनी अध्यात्माचा मार्ग स्वीकारला. संन्यासाचा मार्ग अवलंबण्यासाठी



आपले करियर आणि कौटुंबिक जीवनाचा त्यांनी त्याग केला. ३० लाखांची नोकरी सोडून त्यांनी संन्यासी जीवन जगण्याचा निर्णय घेतला. त्यांनी स्वतःला योग, ध्यान, हिंदू धर्म आणि सनातन धर्माचा अभ्यास करण्यासाठी समर्पित केले.

**ध्यान, योग, स्वयंशिस्तीवर प्रभुत्व**

आध्यात्मिक मार्गाशी आपली बांधिलकी सिद्ध केल्यानंतर टॉमला व्यासानंद गिरी हे नाव देण्यात आले आणि त्यांची महामंडलेश्वर म्हणून नियुक्ती करण्यात आली. महंत पुरी यांनी स्पष्ट केले की आखाड्याच्या क्रमातील हे महत्त्वपूर्ण स्थान अशा व्यक्तींसाठी राखीव आहे, ज्यांनी ध्यान, योग आणि स्वयंशिस्तीवर प्रभुत्व मिळवले आहे. हे सनातन धर्माचे रक्षण करण्याची इच्छा दर्शवते. ■

**हिंदू धर्मग्रंथांचे वाचन करून आध्यात्माकडे आकर्षित**

» पुरी यांनी टॉमचा महामंडलेश्वर व्यासानंद गिरी होण्यापर्यंतचा आध्यात्मिक प्रवास विशद करताना सांगितले, टॉम हे आयटी क्षेत्रात काम करायचे. हिंदू धर्मग्रंथांचे वाचन करून ते आध्यात्माकडे आकर्षित झाले. त्यानंतर हिंदू धर्म स्वीकारण्याचा निर्णय घेतला. त्यांनी हिंदू धर्म आणि सनातनी संस्कृतीवर खूप संशोधन केले. ■

# एका दिवशी सहा कोटींचे दान करतात शिव नाडर

भारतात अनेक धनाढ्य व्यावसायिक आहेत, ज्यांनी देशाला व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय अशा उंचीवर नेऊन ठेवले. मुकेश अंबानी, गौतम अदानी, कुमार मंगलम्, बिर्ला ही त्यातलीच काही नावे आहेत. आपल्या व्यवसायाचा अफाट डोलारा सांभाळत ही श्रीमंत मंडळी समाज कार्यालासुद्धा तितकेच महत्त्व देतात. आर्थिक मदतीचा हात पुढे करून हे व्यावसायिक मोठे दानधर्महीं करीत असतात.

मागील वर्षी सर्वाधिक दान करणाऱ्यांच्या यादीत अशाच एका मोठ्या व्यावसायिकाचे नाव समोर आले. एचसीएलचे अध्यक्ष शिव नाडर यांनी सर्वाधिक दान केल्याचे या यादीतून दिसून येते. ते दिवसाला सहा कोटी रुपयांचे दान करीत असल्याची माहिती समोर आली आहे.

**डिसेंबरमधील निकालानंतर आर्थिक घट**


भारतीय शेअर बाजारात मंगळवारी भारतातील एका अब्जाधीशाला ४६,४८५ कोटी रुपयांचा मोठा तोटा झाला. त्यांच्या कंपनीच्या शेअरची किंमत ९ टक्क्यांनी घसरल्यामुळे त्या कंपनीला इतका मोठा तोटा सहन करावा लागला. ज्या कंपनीला इतके मोठे नुकसान झाले त्या कंपनीचे सर्वेसर्वा आहेत शिव नाडर. दिग्गज आयटी कंपनी एचसीएल टेक्नॉलॉजीजचे ते मालक आहेत. कंपनीच्या डिसेंबर तिमाहीच्या निकालानंतर एचसीएल टेकच्या मार्केट कॅपमध्ये घट झाली. एचसीएलच्या निकालामुळे गुंतवणूकदारांमध्ये फारसा उत्साह दिसू शकला नाही आणि त्यातच शेअर्स विकण्यास सुरुवात झाली.

**दररोज दान करतात ५.९ कोटी**

एचसीएल ही कंपनी देशातील सर्वांत मोठ्या सॉफ्टवेअर सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांपैकी एक आहे तसेच या कंपनीचे मालक शिव नाडर हे सर्वाधिक दानधर्म करणारे व्यायसायिक आहेत. ॲडेलगिव-हुरून इंडिया फिलॅथ्रॉपीच्या २०२४ च्या यादीत ७९ वर्ष यशस्वी कारकीर्द असलेल्या या कंपनीने २,१५३ कोटी रुपये दान केल्याची माहिती आहे. ही यादी नोव्हेंबर २०२४ मध्ये प्रकाशित केली गेली. कौतुकाची बाब म्हणजे, शिव नाडर हे गेल्या पाच वर्षांत तिसऱ्यांदा देशातील सर्वांत मोठे देणगीदार ठरले आहेत. ■

**नाडर यांची संपत्ती ३ लाख ४० हजार ७९३ कोटी**

» बीएसईवर मंगळवारी एचसीएलचा शेअर ८.६३ टक्क्यांनी घसरून १ हजार ८१३.९५ वर थांबला. एचसीएलचे शेअर हा बीएसई सेन्सेक्स आणि एनएसईवर सर्वांत जास्त घसरणारा शेअर ठरला. ट्रेडिंग सेशनदरम्यान एका टप्प्यावर बीएसईवर ९.४१ टक्क्यांनी शेअर घसरून एक हजार ७९८.४० रुपयांवर आला. नंतर शेअर ८.५१ टक्क्यांनी घसरून १ हजार ८१९.९५ रुपये प्रती शेअर झाला. १४ जानेवारी रोजी बंद झालेल्या ट्रेडिंग सेशनमध्ये एचसीएलचे मार्केट कॅप ४ लाख ९२ हजार २४५ कोटी रुपयांवर घसरले. परंतु, एचसीएलच्या मार्केट कॅपमध्ये मोठी घट होऊनही फोर्ब्सनुसार, शिव नाडर यांची संपत्ती ३९.४ अब्ज अमेरिकन डॉलर्स आहे. ■



# मुंबई मॅरेथॉनमध्येही महाकुंभाचा अनुभव

**भगवे कपडे परिधान करून धावपटू सहभागी**

श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा विशाल सोहळा अनुभवण्यासाठी प्रयागराजमधील महाकुंभाला कोट्यवधी नागरिकांनी हजेरी लावली आहे. भारतीयांसह परदेशी नागरिकांची पावलेही महाकुंभाकडे वळली आहेत. अशातच, मुंबई मॅरेथॉनमध्येही महाकुंभाचा अनुभव अनेकांनी घेतला. धावपटू भगवे वस्त्र परिधान करून स्पर्धेत सहभागी झाल्याचे दिसून आहे.




शारीरिकरीत्या सुदृढ राहण्यासह मानसिक आरोग्य जपण्यासाठी आध्यात्मिकदृष्ट्या ध्यानधारणा करणे आवश्यक असल्याचा संदेश देण्यासाठी कांदिवली येथे राहणाऱ्या सुप्रिया गुरूंग यांनी 'चलो कुंभ चले' असे मुंबई मॅरेथॉनमधून आवाहन केले. जगभरातील धावपटूंना आकर्षित करणारी 'टाटा मुंबई मॅरेथॉन' ही स्पर्धा रविवारी आयोजित करण्यात आली. यावेळी ५.९ किलोमीटरच्या 'ड्रीम रन' या गटातून मुंबईकरांनी धावत विविध संदेश देण्याचाही प्रयत्न केला. 'ड्रीम रन' या गटातून धावताना कांदिवलीतील सुप्रिया यांनी 'चलो कुंभ चले' असा संदेश दिला तसेच महाकुंभात सहभागी होऊन स्नान व ध्यानधारणाद्वारे मानसिक आरोग्य जपण्याच्या दृष्टीने महत्त्वाची असणारी मनःशांती करावी, असे आवाहनही केले. यावेळी त्यांनी परिधान केलेला भगवा पोशाख आणि हाती घेतलेला फलक लक्षवेधी ठरला. यावेळी त्यांच्यासोबत हितेश परमार यांनी सुद्धा भगवा पोशाख परिधान करून 'चलो कुंभ चले' असे आवाहन केले. ■

**मन:शांतीसह मिळते सकारात्मक ऊर्जा**

» शारीरिक सुदृढ राहण्यावर भर देताना आध्यात्मिक मार्गाने ध्यानधारणा करून मानसिक आरोग्य जपणे तितकेच महत्त्वाचे आहे. सध्या महाकुंभात वैश्विक ऊर्जा निर्माण झाली आहे, त्यामुळे महाकुंभात सहभागी होऊन पवित्र गंगा, यमुना आणि पौराणिक सरस्वती नदीच्या संगमात स्नान करावे, त्याठिकाणी ध्यानधारणाही करावी. त्यामुळे मनाला निश्चितच शांतता व सकारात्मक ऊर्जा प्राप्त होईल, मी स्वतः महाकुंभात सहभागी होणार असल्याचे सुप्रिया गुरूंग यांनी सांगितले. ■

# साडेसहा कोटी भाविकांचे संगमात स्नान

उत्तरप्रदेश सरकारने महाकुंभासाठी केलेल्या नियोजनाची देशातच नव्हे, तर विदेशातही चर्चा आहे. सुविधा आणि सुरक्षेमुळे दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढत आहे. आठवडाभरात कुंभस्नान करणाऱ्यांची संख्या ६ कोटी ५० लाखांवर पोहोचली असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

महाकुंभावर संशोधन करण्यासाठी आलेले आयआयएम इंदूरचे प्राध्यापक शेखर शुक्ला यांनी वृत्तसंस्थेला सांगितले की, महाकुंभामुळे उत्तरप्रदेशच्या पर्यटन, संस्कृती आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळणार आहे. जगात पहिल्यांदाच एखाद्या धार्मिक तीर्थक्षेत्राला नवीन शहराचा दर्जा देण्यात आला. जर आपण १९७७ ते २०२५ या कालावधीत महाकुंभाला भेट देणाऱ्या भाविकांचा डेटा पाहिला, तर २०१३ पासून भाविकांची संख्या सतत वाढत आहे. प्रत्येक महाकुंभात शंभर टक्क्यांनी वाढ नोंदविण्यात आली आहे. २००१ मध्ये ७ कोटी भाविकांनी कुंभस्नान केले होते. ■

# खेड्यातील तरुण बनला अमेरिकेतील सर्वाधिक यशस्वी उद्योगपती

हिमाचल प्रदेशातील पानोह या छोट्याशा गावात राहणारा जय चौधरी आज अमेरिकेतील सर्वांत श्रीमंत भारतीयांमध्ये गणला जातो. एकेकाळी वीज आणि पाण्याशिवाय जगणाऱ्या जय चौधरीकडे आज ११.७ अब्ज डॉलर्स (सुमारे १,०१,३०० कोटी रुपये) संपत्ती आहे. इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकीची पदवी पूर्ण केल्यानंतर ते १९८० मध्ये अमेरिकेत गेले. तिथे त्यांनी सिनसिनाटी विद्यापीठातून अभियांत्रिकी आणि विपणन विषयात पदव्युत्तर पदवी मिळवली. ते एका सायबर सुरक्षा कंपनीचे संस्थापक आहेत.



जय चौधरी यांचे बालपण अत्यंत गरिबीत गेले. आठवीपर्यंत शिक्षण गावातच झाले. हिमालयाच्या कुशीत वसलेल्या त्यांच्या पानोह गावात वीज नव्हती. दहावीपर्यंत त्यांच्या गावात शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय नव्हती. छोट्या शेतकरी कुटुंबात जय तीन भावांमध्ये सर्वांत लहान होता. कठीण परिस्थितीतही त्यांनी हार मानली नाही. शिक्षणाचे महत्त्व त्यांना समजले.

जय चौधरी यांनी अमेरिकेत शिक्षण सुरू ठेवले आणि सिनसिनाटी विद्यापीठातून अभियांत्रिकी आणि विपणन विषयात पदव्युत्तर पदवी मिळवली. त्यांचा उद्योजकीय प्रवास १९९६ मध्ये सुरू झाला. त्यांनी आणि पत्नी ज्योती यांनी नोकरी सोडली. त्यांच्या पहिल्या सायबर सुरक्षा स्टार्टअप फर्म सिक्युरिटी आयटीमध्ये सुमारे ५,००,००० ची जीवन बचत गुंतवली. हे एक असे पाऊल होते, ज्याने तंत्रज्ञान उद्योग बदलला. स्केल ॲप हे जय चौधरींचे सर्वांत मोठे यश आहे. ही क्लाऊड सिक्युरिटी सोल्यूशन्समध्ये आघाडीची सायबर सुरक्षा फर्म आहे. २००८ मध्ये स्थापित स्केल ॲप मार्च २०१८ मध्ये सार्वजनिक झाला. या कंपनीने जय चौधरी यांना यशाच्या शिखरावर तर नेलेच, शिवाय त्यांना कोट्यवधींच्या संपत्तीचे मालक बनवले. फोर्ब्सच्या मते, जय चौधरीची एकूण संपत्ती ११.७ अब्ज डॉलर्स आहे.

**लाखो लोकांसाठी प्रेरणास्थान**

जय चौधरीची कहाणी अशा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, ज्यांना कठीण परिस्थितीतून आपली स्वप्ने पूर्ण करायची आहेत. परिश्रम, समर्पण आणि जिद्द याने कोणतेही पद मिळवता येते, हे त्यांचे जीवन सिद्ध करते. प्रतिकूल परिस्थितीतही हिंमत हारता कामा नये, हे त्यांचा प्रवास शिकवतो. शिक्षणाचे महत्त्व, जोखीम घेण्याचे धैर्य आणि समर्पण हे यशाचे गमक आहे. ■

# भारतात ऑल-न्यू बीएमडब्ल्यू एक्स ३ लाँच

ऑटो एक्स्पोच्या दुसऱ्या दिवशी भारतात ऑल-न्यू बीएमडब्ल्यू एक्स ३ लाँच करण्यात आली. बीएमडब्ल्यू ग्रुप प्लांट चेन्नई येथे स्थानिक पातळीवर उत्पादित करण्यात आलेली ही स्पोर्ट्स ॲक्टिव्हीटी वेईकल देशात पेट्रोल तसेच डिझेल पॉवरट्रेन्समध्ये उपलब्ध असेल. ही गाडी भारतभरातील डिलरशिप्समध्ये आणि कंपनीच्या संकेतस्थळावर बुक करता येऊ शकते. डिलिव्हरी एप्रिलपासून सुरू होईल. दोन दशकांहून अधिक काळापासून बीएमडब्ल्यू एक्स ३ ने जागतिक स्तरावर तिच्या श्रेणीत सर्वाधिक विक्री होणारी प्रीमियम मॉडेल म्हणून आपला दर्जा कायम राखला आहे. बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाचे अध्यक्ष विक्रम पावाह म्हणाले, ऑल-न्यू बीएमडब्ल्यू एक्स ३ च्या लाँचसह आधुनिकता आणि स्पोर्टिंग दर्जा अनपेक्षित उंचीवर पोहोचला आहे. या कार एक्स-शोरूम ७५,८०,००० रुपये आणि ७७,८०,००० रुपयांत उपलब्ध आहे. इन्वॉइसिंगच्या वेळी अस्तित्वात असलेली किंमत लागू होईल. ■



## अग्रलेख...

# वेळीच सतर्क व्हा, अन्यथा...

आजकाल कुणीही शेंबडा उठतो आणि हिंदुत्वाबाबत काहीबाही बोलतो. हा देश हिंदुबहुल आहे. असे असतानाही हिंदूंबद्दल अपशब्द बोलले जातात, हिंदूंच्या देवी-देवतांबद्दल अवमानजनक भाषा वापरली जाते. एवढे असूनही हिंदूंनी कधी आक्रमक, हिंसक भूमिका घेतली नाही; आणि यामुळेच की काय, हिंदुत्व हे कमजोर असल्याची वाचाळवीरांची भावना झाली असावी. सनातन धर्माबाबत अश्लाघ्य टीका होऊनही हिंदूंनी कधीही हिंदुत्व धोक्यात आल्याची आवई उठवली नाही. याउलट, अन्य समुदायाकडून वारंवार धोका असल्याची ओरड केली जाते. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि त्यांचा करंटा पुत्र लायकी नसतानाही सनातनवर टीका करतात तेव्हा त्यांना आव्हान द्यावेसे वाटते की, त्यांनी अन्य समुदायाबाबतही अशीच टीका करून दाखवावी. त्यांच्यात खरेच पुरुषार्थ असेल तर त्यांनी इतरांबाबत बोलून दाखवावेच. हिंदू आणि इतरांमध्ये फार अंतर आहे. इस्लामबाबत तुम्ही एकही चुकीचा शब्द काढलात तर तुमचे शीर धडावेगळे करण्याची धमकी मिळते आणि प्रत्यक्ष कृतीही केली जाते. गतकाळात अशा घटना घडल्या आहेत. 'सर तन से जुदा' हा नारा सगळ्यांनीच ऐकला आहे. देशातील न्यायव्यवस्थेने खरे तर याची स्वत:हून दखल घेत संबंधितांवर कारवाई करण्याचा आदेश पोलिस-प्रशासनाला द्यायला पाहिजे होता. एरवी अनेक बाबतीत स्वत:हून हस्तक्षेप करणाऱ्या न्यायव्यवस्थेने याबाबतीत निष्क्रियताच दाखविल्याचा कटू अनुभव आहे.

उदयनिधीसारख्या भामट्यांची सनातनवर टीका करण्याची हिंमत होतेच कशी? शेकडो तक्रारी करूनही यांच्यावर कारवाई का म्हणून केली जात नाही, हा सामान्य सनातनी माणसाला पडलेला प्रश्न आहे. एम. के. स्टॅलिन किंवा त्याचा दिवटा पुत्र उदयनिधी हे कायद्यापेक्षा मोठे आहेत का? हिंदुत्वाला यांचा विरोध, हिंदीलाही यांचा विरोध. कुठपर्यंत यांचे लाड करणार? कुठपर्यंत यांना मोकाट सोडणार? यांना वेळीच पकडून तुरुंगात डांबले पाहिजे. अन्यथा, सगळी पिलावळं हिंदू आणि हिंदुत्वाबाबत, पवित्र अशा सनातनबाबत अद्वातद्वा बोलत राहतील. असो. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. त्यावरही चर्चा व्हायलाच हवी. आपल्या हिंदुस्थानात स्वयंघोषित पुरोगाम्यांचा एक मोठा गट सक्रिय आहे, जो दहशतवाद आणि इस्लामचा बचाव करण्यासाठी हिंदुविरोधी अभियान चालवत असतो. सध्या संपूर्ण जग दहशतवादामुळे त्रस्त आहे आणि हा दहशतवाद कुणी जोपासला हे जगाला माहिती आहे. त्यामुळे नव्याने कुणाला काही समजावून सांगण्याची आवश्यकता नाही. भारतावर असंख्य आक्रमणे झालीत. आधी मुगलांनी केली आणि नंतर ख्रिश्चन असलेल्या ब्रिटिशांनी, फ्रेंचांनी केलीत. भारताची जी मूळ संस्कृती आहे, तिच्यावर आघात करण्याचेही प्रयत्न झालेत. पण, हिंदू संस्कृती आजही भक्कमपणे टिकून आहे. याची काही तर कारणं असतीलच ना! निश्चितच आहेत. आपण आपल्या संस्कृतीला भारतीय म्हणू शकतो, हिंदू म्हणू शकतो वा मग सनातन संस्कृती असेसुद्धा संबोधू शकतो. मुळात हिंदू संस्कृती ही सहनशील आहे. सहिष्णुता हा या संस्कृतीचा सगळ्यात मोठा आधार आहे, मजबूत असा पाया आहे. जेवढे धर्म आज भारतात आहेत, तेवढे जगातल्या अन्य कुठल्याही देशात नाहीत, हे लक्षात घेतले तर सगळे काही आपोआप स्पष्ट होते. मुस्लिम शासकांनी भारतावर केवळ आक्रमणेच केलीत असे नाही, तर शेकडो-हजारो मंदिरे तोडली, जबरदस्तीने धर्मांतर करवून लाखो हिंदूंना इस्लामचा स्वीकार करण्यास भाग पाडले. हिंदू स्त्रियांवर अत्याचार केलेत. असंख्य लोकांची हत्या केली. असे सगळे असतानाही हिंदूंना असहिष्णू ठरवायचे, हिंदूंचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्था-संघटनांना सांप्रदायिक ठरवायचे, हा एका मोठ्या कारस्थानाचा भाग आहे, हे स्पष्ट आहे. हिंदू समुदायाविरुद्ध जाणीवपूर्वक अपप्रचार करायचा आणि आपले अस्तित्व अधिक मजबूत करायचे, हा एक मोठा कट आहे. हा कट हाणून पाडण्याची योग्य वेळ आता आली आहे. जर हिंदू समुदाय आताच जागृत झाला नाही तर भविष्यात पश्चात्ताप करण्याचीही संधी मिळणार नाही, हेही कटाक्षाने लक्षात ठेवायला हवे.

हिंदू मुळात सहिष्णू आहे आणि कुणावरही आक्रमण करण्याची त्याची वृत्ती नाही. त्यामुळे त्याने जागृत व्हावे याचा अर्थ एवढाच घ्यावा की, उद्या संकट ओढवलेच तर प्रतिकार करण्याची क्षमता तेवढी विकसित करावी. बांगलादेशातील हिंदूंवर सध्या अनन्वित अत्याचार केले जात आहेत. ती बाब लक्षात घेता भारतातील हिंदूंनी स्वयंघोषित पुरोगामी, ढोंगी हिंदूंपासून सावध राहात स्वत:च्या आणि सनातन धर्माच्या संरक्षणासाठी बाह्या सरसावून सदैव सतर्क राहिले पाहिजे. काळानुरूप स्वत:मध्ये बदल घडवून आणण्यात हिंदू संस्कृती अग्रेसर राहिली आहे. त्याचवेळी इस्लामचे अनुकरण करणारे असंख्य लोक यात मागे पडले आहेत. पुढे जायचे असेल तर काळानुरूप बदल स्वीकारणे गरजेचे असते. हिंदू संस्कृती ही श्रेष्ठ आहे. जागतिक समुदायाने महिलांना अधिकार देण्यासाठी प्रयत्न सुरू केले असताना भारतीय संस्कृतीने महिलांना केवळ बरोबरीचे अधिकारच दिले असे नाही, तर योग्य तो सन्मान बहाल करून आघाडी घेतली होती. ही बाब हिंदू संस्कृतीचे, सनातन धर्माचे श्रेष्ठत्वच तर सिद्ध करते. स्त्रियांचा सन्मान करण्यात आल्याने आज भारतीय महिलांनी पादाक्रांत केले नाही असे एकही क्षेत्र सापडणार नाही. जगातल्या सर्व प्रगत देशांमध्ये आज भारतीय महिलांनी मानाचे स्थान मिळविले आहे. याचे सगळे श्रेय हे सहिष्णू, प्रगत, प्रगल्भ, संपन्न अशा सनातन भारतीय संस्कृतीलाच द्यावे लागेल. पण, आज काळ बदलला आहे. भारतात हिंदूंची संख्या कमी होताना दिसते आहे. मध्यंतरी सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी यासंदर्भात केलेले विधान अतिशय बोलके आहे. त्याला सकारात्मक प्रतिसाद देणे आपले कर्तव्य ठरते. हिंदूंच्या कमी होत जाणाऱ्या संख्येचा मुद्दा हा प्रत्येक हिंदूच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय असला पाहिजे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद यांसारख्या सांस्कृतिक राष्ट्रवाद जोपासणाऱ्या संघटना हिंदुहितासाठी अविरत परिश्रम घेत आहेतच; पण स्वहित सुरक्षित करण्याची जबाबदारी ही प्रत्येक हिंदूने तत्परतेने स्वीकारली तर वाकड्या नजरेने पाहण्याची कुणाचीही हिंमत होणार नाही. शेजारच्या अफगाणिस्तान, बांगलादेशात सध्या जे काही चालू आहे, ते लक्षात घेता हिंदूंनी अधिक सतर्क राहण्याची, स्वत:ची क्षमता वाढविण्याची आणि प्रतिकार करण्याची ताकद निर्माण करत एक मोठी शक्ती उभी करण्याची नितांत गरज आहे. भारत हे धर्मनिरपेक्ष, समाजवादी प्रजासत्ताक आहे. भारताच्या राज्यघटनेत दुरुस्ती करून हे शब्द समाविष्ट करण्यात आले होते. आणिबाणीच्या काळात दुरुस्त करण्यात आलेल्या प्रस्तावनेत याचा स्पष्ट उल्लेख आहे. असे असतानाही देशात धर्मनिरपेक्षता आणि इस्लाम असे दोन्ही घटक एकाच वेळी धोक्यात कसे काय येतात, हे एक कोडेच आहे.

जगात जवळपास ५७ देश इस्लामिक आहेत. कोणीही धर्मनिरपेक्ष नाही. तरीसुद्धा कुठेही इस्लाम धोक्यात नाही. भारतात जे अधिकार बहुसंख्य हिंदूंना आहेत, तेच इस्लामचे पालन करणाऱ्यांनाही आहेत. कुणालाही दुय्यम नागरिकत्व नाही. सरकारच्या सगळ्या योजनांचा लाभ इस्लामचे अनुकरण करणाऱ्यांना मिळतो, मतदानाचा अधिकारही हिंदूंच्या बरोबरीनेच आहे. कायद्याच्या भाषेत तर कुठेही भेदभाव केला जात नाही. त्यामुळे काहीही झाले की धर्मनिरपेक्षता आणि इस्लाम असे दोघेही धोक्यात का येतात, हे संबंधितांनी समजावून सांगितले पाहिजे. भारतात स्वत:ला जे पुरोगामी मानतात (कारण ते स्वयंघोषित आहेत) ते कायम बहुसंख्य हिंदूंच्या बाजूने नसतात. एखाद्या मुस्लिम बांधवाच्या बाबतीत एखादी घटना अनवधानाने घडली असताना ज्याप्रकारे हे स्वयंघोषित पुरोगामी अक्षरश: तुटून पडतात, हिंदू नेत्यांना लक्ष्य करतात, प्रसंगी हिंदू दहशतवाद हा कुठल्याही शब्दकोशात नसलेला शब्द प्रचलनात आणतात आणि दुसरीकडे जेव्हा हिंदूंवर अन्याय होतो, तेव्हा ही मंडळी वाळूत चोच खुपसून बसलेली असते. हे या देशाचेच नव्हे, तर हिंदूंचेही दुर्दैव आहे. कारण बहुतांश स्वयंघोषित पुरोगामी हे हिंदूच आहेत. इस्लामला मानणाऱ्या कुणाकडून एखादे दुष्कृत्य घडले तर त्याला पाठीशी घालण्यात हेच स्वयंघोषित पुढे असतात. हे आता थांबवण्याची आवश्यकता आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# एका राष्ट्रपतीचा शपथ सोहळा!

भारत-चीनला धमकी, पनामा कालवा ताब्यात घेण्याची भाषा, कॅनडा-ग्रीनलॅण्डचे अमेरिकेत विलीनीकरण करण्याचा प्रस्ताव आणि हमासला सज्जड दम...! राष्ट्रपतिपदाची शपथ घेण्यापूर्वीच डोनाल्ड ट्रम्प यांनी उच्चारलेल्या या विधानांनी अनेक देशांच्या उरात धडकी भरविली आहे. ट्रम्प यांचा आज शपथ सोहळा आहे. ट्रम्प यांच्या शपथ सोहळ्याकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले आहे. ट्रम्प हे फार लोकप्रिय वा कर्तृत्ववान आहेत म्हणून नाही तर राष्ट्रपतिपदी निवड झाल्यापासून त्यांनी जे धमकी-तंत्र सुरू केले आहे, त्याचे काय होणार, याच्या उत्सुकतेपोटी या सोहळ्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ट्रम्प यांच्या हत्येचे दोन प्रयत्न झाल्यामुळे व्हाईट हाऊसमध्ये होणाऱ्या या सोहळ्यासाठी अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था उभारण्यात येत आहे. अमेरिकेच्या आजवरच्या इतिहासातील हा सर्वाधिक सुरक्षेत झालेला शपथ सोहळा असेल. एक विशिष्ट शुल्क लावून सोहळ्यासाठी प्रवेश दिला जातो. यावेळी या सोहळ्यासाठी रेकॉर्ड रक्कम गोळा झाली असल्याचे समजते. बड्या बड्या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी या सोहळ्यासाठी फार मोठी रक्कम मोजली आहे. ट्रम्प यांनीही सोहळ्याच्या आयोजनात कोणतीही कसर बाकी न ठेवण्याचे ठरविले असून जगभरातील अनेक राष्ट्रप्रमुखांना त्यांनी यासाठी निमंत्रित केले आहे.

**नवी परंपरा** : राष्ट्रपतींच्या शपथ सोहळ्यास देश-विदेशांच्या प्रमुखांना आमंत्रित करण्याची कोणतीही परंपरा अमेरिकेत नाही. पण, परंपरा आणि ट्रम्प यांचा काय संबंध? त्यांनी तर लोकशाहीची प्रत्येक परंपरा जणू पायदळी तुडविण्याचा चंग बांधला आहे. मग ते आपल्या शपथ सोहळ्याची परंपरा कसे पाळणार होते? देश-विदेशातील राष्ट्रप्रमुखांना आमंत्रित करून त्यांनी एक नवी परंपरा स्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे मुख्य लक्ष्य चीनचे राष्ट्रपती शी जिन पिंग होते. ट्रम्प यांचा स्वभाव पाहता त्यांनी रशियाचे राष्ट्रपती पुतिन यांनाही निमंत्रित केले असते. अमेरिकेच्या आणि युक्रेनच्या सुदैवाने त्यांनी ते केलेले नाही. मात्र, चीनच्या राष्ट्रपतींना आमंत्रित करण्याचा मोह ते आवरू शकले नाहीत. चीन-अमेरिका यांच्यात 'आर्थिक युद्ध' सुरू असताना त्यांनी चिनी राष्ट्रपतींना बोलाविण्याचा निर्णय घेतला. चीनच्या राष्ट्रपतींनी स्वत: जाण्याऐवजी आपल्या एका मंत्र्यास पाठविण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक लहानसहान देशांच्या राष्ट्रपतींना ट्रम्प यांनी आमंत्रित केले असून काही देशांच्या राष्ट्रपतींनी त्यांच्या शपथ सोहळ्यास हजेरी लावण्याचा निर्णय घेतला आहे.



**पहिली वल्गना** : मी राष्ट्रपती झाल्याबरोबर काही तासांच्या आत रशिया-युक्रेन युद्ध संपविले जाईल, अशी वल्गना ट्रम्प यांनी केली होती. त्यांना अद्याप तर त्यात यश आलेले नाही. मात्र, हमास-इस्रायल यांच्यात समझोता घडवून आणण्यात त्यांना यश आले आहे. ही बाब ट्रम्प यांची कारकीर्द सुरू होण्याचा एक शुभ संकेत मानली जाईल. मावळत्या बायडेन प्रशासनाने यासाठी ट्रम्प व त्यांच्या चमूचे आभार मानले आहेत.

**पनामा कालवा** : पनामा कालवा आम्ही आमच्या हितासाठी बांधला होता. पण आज पनामा देश या कालव्यातून जाणाऱ्या अमेरिकन जहाजांना मोठे शुल्क आकारीत आहे. या कालव्याच्या संचालनावर चीनचा प्रभाव वाढत आहे. हे अमेरिकेच्या हिताविरुद्ध आहे. अटलांटिक व प्रशांत महासागर यांना जोडणारा ८२ किलोमीटरचा हा कालवा शतकापूर्वी अमेरिकेने बांधला होता. प्रारंभी यावर अमेरिकेचे नियंत्रण होते. १९९९ मध्ये अमेरिकेने याचे संपूर्ण नियंत्रण पनामा सरकारकडे सोपविले. नुकतेच दिवंगत झालेले अमेरिकन राष्ट्रपती जिमी कार्टर यांनी तो निर्णय घेतला होता. तेव्हापासून या कालव्याचे संचालन पनामा सरकार करीत आहे. आज या कालव्याचा सर्वाधिक वापर अमेरिकन जहाजे करीत आहेत तर दुसऱ्या क्रमांकावर चीन आहे; आणि हीच बाब ट्रम्प यांना मान्य नाही. तसा त्यांचा मुद्दा बरोबर आहे. अमेरिकेने अमेरिकेच्या हितासाठी कालवा बांधला आणि त्याचा वापर मात्र चिनी कंपन्या करीत आहेत, हे अमेरिकेला मान्य नाही. पनामा कालवा ताब्यात घेण्यासाठी लष्करी सामर्थ्य ते आर्थिक निर्बंध या साऱ्याचा वापर करण्याचे पर्याय ट्रम्प यांनी खुले ठेवले आहेत. पनामा सरकारने अमेरिकेचा हा दावा फेटाळून लावला आहे. अमेरिका प्रशासन आणि पनामा सरकार यांच्यात सुरू असलेल्या शीतयुद्धाचा फायदा चीन उठवील काय, असा एक प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. ट्रम्प या आघाडीवर फार टोकाचा निर्णय घेणार नाहीत, अशी एक आशा व्यक्त केली जात असली, तरी त्यांनी खरोखरीच पनामा कालव्याचे नियंत्रण आपल्या हाती घेण्यासाठी एखादी कारवाई सुरू केल्यास त्याची किंमत साऱ्या जगाला मोजावी लागणार आहे.

**ग्रीनलॅण्डची खरेदी?** : नवे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प यांचे आणखी एक स्वप्न म्हणजे डेन्मार्कचा स्वायत्त भाग असलेल्या ग्रीनलॅण्डची खरेदी करणे. राष्ट्रपतिपदाच्या आपल्या पहिल्या कार्यकाळातही ट्रम्प यांनी ग्रीनलॅण्ड खरेदी करण्याचा प्रयत्न केला होता. एक माजी राष्ट्रपती हॅरी ट्रुमन यांनी १९४६ मध्ये ग्रीनलॅण्ड खरेदी करण्याचा प्रस्ताव मांडला होता. अमेरिकेच्या हितांचे रक्षण करण्यासाठी ग्रीनलॅण्डवर अमेरिकेचा ताबा असावा, असे अमेरिकन नेत्यांना वाटत आले आहे. अमेरिका आपल्या सुरक्षेचे कारण देत असली, तरी या देशातील विपुल नैसर्गिक संपत्तीवर अमेरिकेचा डोळा असल्याचे मानले जाते आणि एक व्यापारी म्हणून अधिक प्रसिद्ध असलेल्या ट्रम्प यांच्यासाठी ग्रीनलॅण्ड खरेदी करणे हे एक उत्कट स्वप्न असू शकते.

**भूभागांची खरेदी** : दुसऱ्या देशाचा एखादा भूभाग खरेदी करणे ही बाब अमेरिकेसाठी नवी नाही. अमेरिकेने १८६७ मध्ये रशियाकडून अलास्का राज्य खरेदी केले होते. ओकाहोमा, अराकांस, आयोवा, मिसुरी, फ्लोरिडा ही राज्येही अमेरिकेने इतर देशांकडून खरेदी केली आहेत. मेक्सिकोकडून अरिझोना, कॅलिफोर्निया, नेवादा ही राज्ये १८४८ मध्ये विकत घेण्यात आली. १९१७ मध्ये डेन्मार्ककडून व्हर्जिन आयलॅण्ड खरेदी करण्यात आले. आता याच देशाच्या ग्रीनलॅण्डवर ट्रम्प यांची नजर आहे. त्यांनी कॅनडालाही अमेरिकेचे ५१ वे राज्य होण्याचा प्रस्ताव दिला आहे. कॅनडाने हा प्रस्ताव स्वीकारल्यास कॅनडा सुरक्षित होईल. रशिया-चीनकडून आज कॅनडाला जो धोका भेडसावीत आहे तो कायमचा संपुष्टात येईल, असेही ट्रम्प यांनी आपल्या प्रस्तावात म्हटले होते. पण, कॅनडाने तो फेटाळून लावला आहे. कॅनडाला ट्रम्प अमेरिकेत सामावून घेऊ शकणार नाहीत. मात्र, पनामा कालवा व ग्रीनलॅण्डबाबत त्यांची भूमिका किती गंभीर आहे, हे येणाऱ्या काळात दिसणार आहे.

**मस्क एक घटनाबाह्य सत्ताकेंद्र?** : नव्या राष्ट्रपतींच्या काळात एक उद्योगपती ॲलन मस्क यांची भूमिका काय राहणार, यावरही जागतिक नेत्यांचे लक्ष राहणार आहे. आजवर कोणत्याही अमेरिकन राष्ट्रपतीने एखाद्या उद्योगपतीस उघडपणे एवढे जवळ केलेले नाही, जे ट्रम्प यांनी केले आहे. ट्रम्प यांनी मस्क यांना एक लहानसे काम दिले आहे. पण, मस्क यांची सक्रियता पाहता ते ट्रम्प प्रशासनातील एक घटनाबाह्य सत्ताकेंद्र ठरतील, अशी चिन्हे आहेत. हे झाल्यास आधीच वादग्रस्त असलेल्या ट्रम्प यांचा हा कार्यकाळ अधिक वादाचा ठरण्याचीच शक्यता आहे.

## वेध

**अनिरुद्ध पांडे**

# 'आप' हीच आपत्ती...!

दिल्ली विधानसभेची निवडणूक लागली. एकूण ७० विधानसभा मतदारसंघांमध्ये ५ फेब्रुवारीला मतदान होणार असून ८ फेब्रुवारीला निकाल जाहीर होणार आहेत. तीन वेळा लागोपाठ मुख्यमंत्री झालेल्या अरविंद केजरीवाल यांना यावेळी मात्र मुख्यमंत्रिपदी आतिशी मार्लेना यांना बसवावे लागले आहे. १९५२ मध्ये ब्रह्मप्रकाश चौधरी आणि १९५५ मध्ये निहालसिंह गुरुमुख या दोन काँग्रेसी नेत्यांनी दिल्लीचे पहिले आणि दुसरे मुख्यमंत्रिपद भूषविले आहे. १९५६ ते १९९३ दिल्लीत विधानसभेऐवजी मेट्रोपॉलिटिन कौन्सिल आणि १९९३ पासून पुन्हा विधानसभा निर्माण करण्यात आली. १९९३ पासून मदनलाल खुराणा, साहिबसिंह वर्मा आणि सुषमा स्वराज या तीन भाजपा नेत्यांनी दिल्लीचे मुख्यमंत्रिपद भूषविले. त्यानंतर १९९८ ते २०१३ अशी सलग १५ वर्षे दिल्लीवर काँग्रेसी मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचे राज्य होते. पुढे २०१३ पासून आतापर्यंत, म्हणजे सप्टेंबर २०२४ पर्यंत अरविंद केजरीवाल आणि आता त्यांच्या आम आदमी पार्टीच्या (आप) आतिशी मार्लेना मुख्यमंत्री होत्या. २०२५ पूर्वीच्या २०१५ आणि २०२० च्या निवडणुकांमध्ये तर केजरीवालांच्या आम आदमी पार्टीने संपूर्ण भारतात विधानसभांच्या संदर्भात ऐतिहासिकच यश मिळविले होते. २०१५ मध्ये 'आप'ने ७० पैकी चक्क ६७ आमदार निवडून आणून अभूतपूर्व यश मिळविले होते तर २०२० मध्येही याचीच जवळपास पुनरावृत्ती करून ७० पैकी ६२ जागांवर आपचा झेंडा फडकवला होता. ३६ जागांची बहुमतासाठी गरज असताना आज ६२ आमदार आपच्या खिशात आहेत. त्या हिशेबाने दणदणीत नाही तरी साधे बहुमत मिळविणे 'आप'साठी फारसे कठीण नाही; पण यावेळी ते सोपे दिसत नाही.

अरविंद केजरीवाल यांनी राजकारणात उतरण्यापूर्वी आणि आम आदमी पार्टीची स्थापना करण्यापूर्वी नेहमीच राजकारणाला विरोध केला होता. अण्णा हजारेंसोबत भ्रष्टाचारविरोधी भूमिका ते हिरिरीने मांडत होते. त्यांची भ्रष्टाचारविरोधी भूमिका ते राजकारणात उतरल्यानंतरही कायम राहील, असे मानून सुरुवातीला दिल्लीकरांनी त्यांना डोक्यावर घेतले. पण प्रत्यक्षात तसा अनुभव काही आला नाही. येत्या विधानसभा निवडणुकीच्या गरमागरमीतच केजरीवालांनी दिल्लीतील मुख्यमंत्री बंगल्यावर केलेली जनतेच्या पैशांची उधळपट्टी उजेडात आली आहे. दिल्लीतील त्यांच्या कार्यालय आणि बंगला नूतनीकरणासाठी ३३ कोटी ६६ लाख रुपयांचा खर्च केल्याचा आक्षेप कॅगने नोंदविला आहे. नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (कॅग) या अधिकृत सरकारी यंत्रणेच्या या अहवालावर २० नोव्हेंबर २०२४ रोजी महालेखापरीक्षक गिरीशचंद्र मुर्मू यांनी सही केली आहे. या बंगल्यात बदल करताना मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नियंत्रणातील दिल्ली सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने काही अनियमितता केल्याचे या अहवालात नमूद आहे. या कार्यालय आणि बंगल्याच्या नूतनीकरणासाठी प्राथमिक खर्चाचा अंदाज केवळ ७ कोटी ९१ लाख रुपयांचा देण्यात आला होता. पण प्रत्यक्षात मात्र हा खर्च ३३ कोटी ६६ लाख रुपये म्हणजे चौपटीहून अधिक झाला आहे. कॅगचा २० नोव्हेंबर २०२४ चा हा अहवाल केजरीवालांच्या सोयीचा नसल्यामुळे तो दिल्ली विधानसभेसमोर ठेवलाच नाही. पण निवडणुकीपूर्वी तो दिल्लीकरांसमोर आणण्याचे कर्तव्य प्रसारमाध्यमांनी चोख बजावले आहे.

केजरीवालांच्या या मुख्यमंत्री बंगल्याचे नूतनीकरण करताना सल्लागारांची संशयास्पद निवड, अंदाजित खर्चात वारंवार बदल आणि मंजुरीपेक्षा चौपट खर्च हेही आक्षेप 'कॅग'ने नोंदले आहेत. पडद्यावर झालेला खर्च ९६ लाख रुपये, स्वयंपाकघरातील उपकरणांवर ३९ लाख, टीव्ही फर्निचरवर २०.३४ लाख, ट्रेडमिलसारखी व्यायामसाधने १८.५२ लाख, जमिनीच्या टाईल्स १४ लाख रुपयांच्या असे आक्षेपार्ह खर्च कॅगने नोंदविले आहेत. भ्रष्ट कारभाराच्या विरोधात गप्पा मारणाऱ्या आणि स्वत:ला 'तत्त्ववाला' म्हणवणाऱ्या अरविंद केजरीवाल यांनी या बंगल्यात ४.८० लाख रुपये 'दारूच्या मिनी बार'साठी 'सत्कारणी' लावले आहेत. या नूतनीकरणात झालेला बांधकाम खर्चही बाजारभावापेक्षा ३६ टक्के अवाजवी झाला असल्याचेही कॅगने नोंदविले आहे. आता दिल्ली विधानसभेची निवडणूक १५ दिवसांवर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही कॅगचा हा अहवाल 'आप'ही आपदा' अशा शब्दांत चव्हाट्यावर आणला आहे. ''आज एका मोठ्या वर्तमानपत्राने केजरीवालांच्या 'शिशमहल'च्या खर्चाबद्दल लिहिले आहे. हे जाणून तुम्हाला अधिक वेदना होतील की, जेव्हा लोक कोविडचा सामना करत होते, औषधे आणि ऑक्सिजनसाठी धावपळ करीत होते, तेव्हा 'आप' आणि केजरीवालांची ही उधळपट्टी सुरू होती. एवढेच नव्हे तर त्यावेळी त्यांचे सारे लक्ष हा शिशमहल उभारण्याकडे होते.'' अशा शब्दांत त्यांनी दिल्लीकरांचे लक्ष वेधले आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत आणि त्यापूर्वीही दिल्लीतील सातही खासदार दिल्लीकरांनी भाजपाचे निवडून दिले आहेत. आता लवकरच पाहूया विधानसभेत, दिल्लीकर या १० वर्षांपासूनच्या 'आपच्या आपत्ती' संदर्भात किती गंभीर होतात ते..!

९८८१७१७८२९

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# रस्ते अपघाताचे बळी

नुकतेच वडिलांचे एका रस्ते अपघातात निधन झाले. त्यांची तब्येत चांगली होती व ते अजून काही वर्षे जगू शकले असते. एका भरधाव ऑटोने त्यांना धडक मारली व त्यात त्यांचे दुर्दैवी निधन झाले. वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या ऑटोवाल्यांना आम्ही नेहमी विचारतो की, तुम्ही सिग्नल तोडला तर तुम्हाला पोलिस पकडत नाही का? यावर त्यांचे उत्तर असते, 'आमचे हप्ते बांधलेले आहेत.' भरधाव वाहने चालवणारे हे सर्व लोक यमदूतच आहेत. त्या दिवशी एक नामांकित डॉक्टर म्हणाले की, आपली सुरक्षा ही आपल्या हातात राहिलेली नाही. आपण कितीही व्यवस्थित चाललो किंवा कितीही व्यवस्थित चालवले तरी एखादा अव्यवस्थित माणूस आपल्याला जखमी करू शकतो किंवा यमसदनी पाठवू शकतो. ज्येष्ठ नागरिकांनी आणि पायी फिरणाऱ्या लोकांनी मुख्य रस्त्यावरून चालणे टाळलेच पाहिजे.

आपल्या देशामध्ये अनेक लोकांना अनेक गोष्टींचा माज आहे. कोणाला पैशाचा, कोणाला पदांचा, कोणाला माझी या नेत्याशी ओळख आहे, त्या नेत्याशी ओळख आहे याचा! 'हिट ॲण्ड रन' धडक मारा आणि पळून जा अशी वृत्ती सामान्यपणे वाहनचालकांमध्ये दिसते. सरकारने त्याच्या विरोधात कायदा केलेला आहे, परंतु त्याची अंमलबजावणी अजून झालेली नाही. या कायद्याची अंमलबजावणी सरकार करणार होते, परंतु देशातील ट्रकचालकांनी या विरोधात बेमुदत उपोषणाचा निर्णय घेतला आणि जनसामान्यांचे हाल होऊ नये म्हणून सरकारने ताबडतोब या कायद्याची अंमलबजावणी थांबविली.

भारतामध्ये दररोज १२६३ अपघात होतात. वर्षाला साधारणत: ४ लाख ६० हजारांपेक्षा अधिक अपघात होतात. अपघातामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या ही पावणेदोन लाखांपेक्षा अधिक आहे. भारताने रस्ते अपघातामध्ये चीन, जर्मनी, अमेरिका, कॅनडा, ब्रिटन यांना मागे सोडलेले आहे. भारतातल्या रस्त्यांची स्थिती दिवसेंदिवस अधिकच चांगली होत चाललेली आहे. समृद्धी महामार्गासारखे मोठे महामार्ग झालेले आहेत. चार पदरी, सहा पदरी रस्त्यांचे जाळे सर्वत्र विणले जात आहेत. महागड्या आणि अत्याधुनिक गाड्या देशांमध्ये



सर्वत्र येत आहेत. परंतु सर्वसामान्य माणसाच्या समजूतदारीचे काय? एका शोकसभेमध्ये एक वक्ता म्हणाला होता की, रस्त्याने वाहन चालविताना, रस्त्यावरून वाहन चालविणारे, पायी चालणारे हे सर्व माझे बंधू आहेत, यांना पण घरी जायचे आहे. यांच्या पण घरी यांची वाट पाहणारा यांचा परिवार आहे. अशा पद्धतीची भावना जर प्रत्येकाने आपल्या मनात ठेवली तर रस्ते अपघात कमी होऊ शकतील.

सगळ्यात धक्कादायक गोष्ट म्हणजे रस्ते अपघातामध्ये मृत्युमुखी पडणाऱ्या लोकांमध्ये २५ ते ३५ या वयोगटातील ६० टक्के लोक आहेत. म्हणजे कितीतरी संसार फुलण्यापूर्वीच नेस्तनाबूत होतात. कितीतरी कुटुंबातील कर्ता मुलगा, कर्ता पुरुष, कमावता पती कुठल्या तरी बेधुंद गाडी चालविणाऱ्या माथेफिरूमुळे हिरावला जातो. त्यांचे जीवन उद्ध्वस्त होते. ज्या ठिकाणी पथदिवे नाहीत, त्या ठिकाणी चौकाचौकात वाहतूक अवरुद्ध होत असते. लोक कर्कशपणे भोंगे वाजवीत असतात. प्रत्येकालाच लवकर जायचे असते.

जपानमध्ये वाहतुकीच्या बाबतीत 'पहिले आप' म्हणजे 'प्रथम तुम्ही जा' अशा पद्धतीची संस्कृती आहे. त्यामुळे दोन गाड्या काटकोनामध्ये आल्या तर जपानमध्ये दोन्ही गाड्या थांबतात व समोरच्याला संधी दिली जाते की त्यांनी जावे. ज्याला घाई असते तो निघून जातो, त्यानंतर दुसरा जातो. भारतामध्ये ही परिस्थिती कधी येईल? कितीतरी मोठे नेते, शास्त्रज्ञ, डॉक्टर, इंजिनीअर आजपर्यंत या रस्ते अपघातात मारले गेलेले आहे.

स्वच्छ भारताप्रमाणेच अपघातमुक्त भारतासाठी शाळांमधूनच आता याचे शिक्षण दिले गेले पाहिजे. कारण भारत दरवर्षी जवळपास एक लाख तरुण लोकांना फक्त रस्ते अपघातात गमावतो आहे. हे तरुण लोक देशाची संपत्ती आहे. देशासाठी, समाजासाठी यांच्याकडून खूप काम होऊ शकते, परंतु यांचे जीवन अर्ध्यावरच समाप्त केले जाते. काही दिवसांपूर्वी एका अपघातामध्ये एक वृद्धा जखमी झाली. लोकांनी त्या ऑटोचालकाला थांबवले व ते त्याला मार देऊ लागले. ऑटोचालक म्हणाला, ''मला मारू नका. मी या बाईला दवाखान्यात घेऊन जातो व हिचा जो काही खर्च असेल तो करतो. लोक शांत झाले.'' त्यांनी त्या वृद्धेला ऑटोमध्ये बसविले. ऑटोवाला म्हातारीला घेऊन पुढे गेला. पुढे जाऊन त्याने तिला एका ठिकाणी उतरवून दिले व तो चालला गेला. ती स्वत: दवाखान्यात जाऊ शकली नाही व त्यामुळे तिचा मृत्यू झाला. माणुसकीला काळिमा फासणाऱ्या अशा काही गोष्टी समाजामध्ये घडत असतात. आमच्या घराजवळ एक घर आहे, जे आज ओसाड आहे. तेथे पूर्वी एक कुटुंब राहत होते. ती बाई व तिचा मुलगा रस्त्याने जात असताना त्यांना एका ट्रकने धडक दिली. त्यात मुलगा मरण पावला. त्याचे लग्न होऊन केवळ दोन वर्षे झालेली होती व त्याची पत्नी ही तीन महिन्यांची गर्भवती होती. आज त्या अपघातात मरण पावलेल्या मुलाची आई आपल्या मुलींकडे राहते. त्याच्या बायकोला दुसरे लग्न करावे लागले. आज त्यांचे घर ओसाड आहे. अशी लाखो घरे ओसाड करणाऱ्या यमदूतांना शासन झाले पाहिजे. यासाठी सरकारने प्रयत्न करणे आवश्यक आहे. संपूर्ण समाजामध्येच रस्ते वाहतुकीबद्दल समज निर्माण करण्यासाठी शाळा, शैक्षणिक संस्था, समाजसेवी संस्था या सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### ज्येष्ठांना मान देणारे सखी मंडळ

नुकतेच सखी मंडळ, टेलिकॉम नगर यांनी नागपूरकरिता सायंटिफिक सभागृहामध्ये लघु नाट्य स्पर्धा आयोजित केली होती. या संस्थेशी पूर्वीपासून नाते असल्यामुळे जाण्याची ओढ होती. परंतु आम्ही ८५ ते ९३ वर्षांच्या सख्या वयोमानानुसार चालताना त्रास, कमी दिसणे, कमी ऐकू येणे त्यामुळे समोरच्या जागेची अपेक्षा होती. सध्याच्या परिस्थितीत ज्येष्ठ म्हणजे रिकामटेकडे तरीसुद्धा सभागृहामध्ये गेली आणि आश्चर्य सखी मंडळातील सख्यांनी प्रसन्न मुद्रेने आमचे स्वागत करून तिसरी रांग ज्येष्ठांसाठी आरक्षित होती. तेथे ज्येष्ठ नागरिक बसणार ही व्यवस्था बघून मन प्रसन्न झाले.

प्रत्येक गावात कीर्तन, प्रवचन, भाषणे होतात परंतु समोरच्या खुर्चीवर लहान मुले बसून दंगा करतात. त्यांना कार्यक्रमात रस नसतो. आजोबांना जागा द्या असे न सांगता मागे जागा आहे असे उद्धटपणे सांगतात. त्याचप्रमाणे समारंभात बफेमध्ये लहान मुलांना अगदी स्वतंत्रपणे वेगळी खुर्ची देऊन तासन्तास बसतात. आलेले पाहुणे मंडळी तेथेच गप्पा मारत असतात. तरुण मंडळी तासन्तास खुर्चीला चिकटून हास्यविनोद करतात. मला वाटतं ज्येष्ठ लोकांसाठी खुर्ची आवश्यक. जड प्लेट घेऊन त्यांना जेवण करणे शक्य नसते. तरुणांना उठविण्याची हिंमत नाी. त्यांच्याशी बोलणे म्हणजे, आ बैल तुझे मार; म्हणूनच वयस्कर लोक आशीर्वाद देऊन घरी येऊन पिठलं-भात खातात. ज्येष्ठांना कुटुंबाचा आधारस्तंभ, आधारवड, समाजाचा गुरू, मार्गदर्शक म्हणतात. पंतप्रधान मोदी ज्येष्ठांना राष्ट्रीय संपत्ती म्हणतात. त्याप्रमाणे ज्येष्ठांना सोयीचे व्हावे म्हणून प्रमुख पाहुणे, पत्रकाराप्रमाणे काही जागा आरक्षित ठेवाव्या, ही अपेक्षा.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

### आयुष्याचे सोने करा

भूत होऊन जगण्यापेक्षा माणूस म्हणून अजरामर व्हावे, अहंकार न बाळगता जिवंतपणी बोलून घ्या, मेल्यावर रडून काहीही उपयोग नसतो. नाती जवळची का लांबची हे न्याहाळण्यापेक्षा गोड बोलून आयुष्याचे सोने करावे. आयुष्य खूप छोटे आहे, चुका शोधून त्याचा गाभार्थ समजून घ्यावा. मनाविरुद्ध वागणाऱ्यांशीही जुळवून घेतले तरच समोरच्याला आपली कधीतरी आठवण येणारच हा सृष्टीचा नियम आहे. अंधारात बसून अश्रू ढाळण्यापेक्षा अभिप्रेत बोलून मनसोक्त रडावे तरच आयुष्याचे सोने होते. मीच शहाणा बाकी सारे मूर्ख या भ्रमात राहण्यापेक्षा शरीर प्रेतावस्थेत जाण्याआधी जुळते घ्यायचे असते कारण स्मशानभूमीत चांगलं बोलून टाळ्या मिळविण्यापेक्षा आपण जिवंतपणी कसे वागलो याचा विचार करणे म्हणजेच आयुष्याचे सोने घडते. जगात कोणी कुणाचे नाही हे समजण्याआधीच दुसऱ्याला दोष देणे बंद केले तरच गाय-वासराचे नाते समजते.

पोखरलेले मन कधीच सुखी नसते. तडतड बोलून नाते दुरावण्यापेक्षा छोट्या आयुष्याचे सोने करावे. १२० वर्षांची आयुष्यमानाची गती त्यात कर्मानुसार आपल्या वाटेला आलेली जी वर्षे तिचे जिभेवर साखर ठेवून स्वागत करावे. उद्याचा दिवस आपला आहे की नाही याचा अंदाज कोणत्याच इंटरनेटला माहीत नाही; मग कशासाठी अविचार, भांडणे, फाजील तत्त्वज्ञान, आरोप-प्रत्यारोप, सुखाचा आभास, रुसवा फुगवा म्हणूनच आयुष्य खूप छोटे आहे याचा विचार करावा कारण त्याचे सोने करणे आपल्याच हातात आहे.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### अमेरिकी काँग्रेस सदस्याची गीतेवर श्रद्धा, आमचे काय?

अमेरिकेच्या काँग्रेस या सर्वोच्च कायदे मंडळाचे भारतीय वंशाचे लोकप्रतिनिधी सुहास सुब्रमण्यम् यांनी भगवद्गीतेवर हात ठेवून शपथ घेतली असे नुकतेच वाचण्यात आले. जून/जुलै २०२४ मध्येही ब्रिटनमधील निवडणुकीनंतर मूळ भारतीय वंशाच्या खासदार शिवानी राजा यांनी भगवद्गीतेला साक्षी मानून शपथ घेतली होती, अशी बातमी तरुण भारतात वाचली. अशा घटना आम्हा भारतीयांसाठी निश्चितच अभिमानास्पद आहेत.. भगवद्गीता स्वयं भगवंताच्या मुखातून निघालेली अमृतवाणी असल्याने आमची गीतेवर विशेष श्रद्धा. भगवंताने मनुष्याला आपल्या कल्याणासाठी कर्माद्वारे जीवन जगण्याचे मार्गदर्शन केले आहे आणि सर्व साधुसंतांनी गीतेतीलच शिकवण सोप्या भाषेत जनसामान्यांपर्यंत नेली. श्रद्धावान किंवा अश्रद्ध असणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक प्रश्न. तरीही आपल्याच हिंदू धर्म संस्कृती, पौराणिक वाङ्मय, देवदेवता यावर चिखलफेक करणाऱ्या विकृत मानसिकतेची नेते मंडळीही आहेत. दुसरीकडे श्रद्धावान असणाऱ्या किती लोकप्रतिनिधींनी गीतेचे मनन, चिंतन केले आणि ती शिकवण प्रत्यक्ष आयुष्यात अंगीकारली हा खरे तर संशोधनाचाच विषय.

अमेरिकी संसद सदस्याचे गीतेवरील श्रद्धेचे वरील उदाहरण कमीत कमी सगळ्या श्रद्धावान भारतीय लोकप्रतिनिधींनी आत्मसात करून स्वच्छ राजकारण केले तर तो सुदिन ठरेल.

**राम राजे**/९४२१७७९९४५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## संक्षिप्त वृत्त



### नेताजी महाविद्यालयाची लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयास भेट

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**


श्रीराम ग्रामीण ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रद्यान महाविद्यालयाला नेताजी प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, मोहोळ येथील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक भेट दिली. या शैक्षणिक भेटीमध्ये नेताजी महाविद्यालयाचे १२ वीचे २०० विद्यार्थी सहभागी झाले होते. लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थांसाठी वेगवेगळ्या स्थरावर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सूत्रसंचालन विद्यार्थीनी प्राध्यापक वर्षा माने देशमुख यांनी केले. प्रास्ताविक लोकमंगल कृषी व कृषी संलग्नित महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. अमोल शिंदे यांनी केले. प्रा. सायली बडेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची ओढ निर्माण होण्यासाठी विज्ञानात रमने व त्यांच्या अविश्कारांकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. आपल्या दैनंदिन गोष्टींतून आपण विज्ञानाच्या जैवतंत्रज्ञान या शाखेतील विविध संकल्पना प्रत्यक्षात अनुभवल्या पाहिजेत, असे मनोगत व्यक्त केले. तसेच त्यांनी कृषी जैवतंत्रज्ञान शाखेचे महत्त्व, त्यामुळे कृषी क्षेत्राला झालेला उपयोग, कृषी जैवतंत्रज्ञानामधील विविध शाखा याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य सागर महाजन यांनी विद्यार्थ्यांना श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संस्थेच्या विविध महाविद्यालये व प्रकल्पांची माहिती तसेच १२ वी नंतर प्रवेश प्रक्रिया करताना येणाऱ्या अडचणी, प्रवेश प्रक्रियेसाठी फॉर्म कसा भरावा, याविषयी मार्गदर्शन केले. या भेटीदरम्यान विद्यार्थांनी महाविद्यालयातील विविध प्रयोगशाळांना भेटी दिल्या. . या नाविन्यपूर्ण शैक्षणिक भेटीसाठी त्यांनी लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन, सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे आभार मानले. याप्रसंगी नेताजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद गायकवाड, प्रा. जामगुंड सत्त्याप्पा चानाप्पा, प्रा. कोळेकर दत्तात्रय जनार्दन प्रा. शेळके समाधान बळीराम, प्रा. निस्ताने उपस्थित होते.



### शोएब चौधरी यांनी वाचविले जखमी पक्ष्याचे प्राण

**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

महावितरण औद्योगिक वसाहत कार्यालय अंतर्गत मंत्री चंडक विहार, होटगी रोड, आसरा चौक येथील समाजसेवक शोएब चौधरी यांच्या घरासमोरील विद्युत वाहिनीवर कबूतर पक्षी अडकून जीव वाचवण्यासाठी धडपड करत होते. याप्रसंगाचे गांभीर्य ओळखून चौधरी यांनी ताबडतोब महावितरण कार्यालयाशी संपर्क साधून माहिती दिली.माहिती मिळताच महावितरणचे कर्तव्यदक्ष शाखाधिकारी अजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली प्रधान तंत्रज्ञ धुळाप्पा टेळे, वरिष्ठ तंत्रज्ञ सुनिल काळे, निलकंठ कांबळे, बाह्यस्तोत्र तंत्रज्ञ नितीन कोळी यांनी काही क्षणातच घटनास्थळी पोहोचून कबूतर पक्षीचे प्राण वाचवण्यासाठी मनापासून प्रयत्न करून सदर पक्षीचे प्राण वाचवले. पक्षीचे प्राण वाचवण्यासाठी शोएब चौधरी, मुज्जफर चौधरी यांचे देखील योगदान लाभले. जखमी पक्ष्यावर प्रथमोपचार करून निसर्गरम्य वातावरणात सोडले. महावितरण कंपनीमध्ये सेवा देताना ग्राहकांचे विजेच्या तक्रारीचे निवारण करत असताना, एखाद्या मूक पक्षीचे देखील प्राण वाचविण्याचे सत्कार्य महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून घडल्याने स्थानिक नागरिकांकडून कर्मचाऱ्यांचे कौतुक केले जात आहे. कार्याची दखल घेत समाजसेवक शोएब चौधरी यांनी येणाऱ्या काळात महावितरणच्या कर्मचाऱ्यांचे निश्चितच सन्मान करून कौतुक करु व सत्कार्यात सदैव खंबीरपणे पाठिशी उभे राहू असे सांगून आभार मानले.



### एमआयडीसी संदर्भात शेतकऱ्यांनी भेट घेताच जरांगे-पाटलांनी लावला जिल्हाधिकाऱ्यांना फोन!

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे होणाऱ्या नियोजित एमआयडीसी संदर्भात शेतकऱ्यांच्या वाहीक बागायती जमिनी बळजबरीने घेत असल्याने तामलवाडी येथील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने शनिवार, दि. १८ रोजी आंतरवली सराटी येथे जाऊन भेट घेतली व शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. यावर मनोज जरांगे पाटील यांनी धाराशिवचे जिल्हाधिकारी यांना फोन करून याबाबत विचारणा केली. तामलवाडी येथील नियोजित एमआयडीसीसाठी उद्योजक व काही शेतकऱ्यांची पडीक जमीन सोडून जवळील अनेक शेतकऱ्यांच्या वाहीक व बागायती जमिनी घेण्याचा घाट एमआयडीसी अधिकाऱ्यांनी घातला आहे. इतकेच नाहीतर ई मोजणी प्रणालीच्या माध्यमातून मोजणीच्या परस्पर नोंदी घेतल्या व तलाठी सज्जा तामलवाडी यांच्या वतीने शनिवारी सुट्टी असताना नोटीस देण्यात येत असल्याने तामलवाडी येथील शेतकऱ्यांनी दि.१८ रोजी आंतरवली सराटी येथे जाऊन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन सर्व कागदपत्रे दाखवली व जमिनी वाचवण्याची मागणी केली. यावर मनोज जरांगे पाटील यांनी धाराशिव येथील जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास सांगितले. जरांगे यांच्याशी सकारात्मक चर्चा झाल्याने शेतकरी आता पुढील दिशा ठरवणार असल्याचे दिसून येत आहे.

# अवीट स्वर अन् सुरांच्या वर्षावात न्हाले सोलापूरकर

## नीती आर्टस् आयोजित 'सरो-स्वर' संगीत मैफिलीत रसिक दंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

राग चारुकेशी अन् भूपाली या अवीट स्वर आणि सुरांच्या वर्षावात सोलापूरकर शनिवारी न्हाले. निमित्त होते नीती आर्टस आयोजित 'सरो-स्वर' संगीत मैफिलीचे.

नीती आर्टस्तर्फे हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात ही संगीत मैफल रंगली. कार्यक्रमाचे उद्घाटन पंडित आनंद बदामीकर आणि संगीताचार्य डॉ. अश्विनी वळसंगकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. या प्रसंगी सरोद वादक अनुपम जोशी, गायक मुकुल कुलकर्णी, संयोजिका आणि नीती आर्टस्च्या श्रुती पोरवाल, समीर ठाणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात अनुपम जोशी




यांच्या सरोद वादनाने झाली. त्यांनी सुरुवातीस चारुकेशी रागात आलाप सादर केला. त्यानंतर महेशराज साळुंके यांच्या धामा जोरीच्या साथीने धृपद अंगाने जोड व झाला सादर केला. अनुपम जोशी यांनी सरोदवर वाजविलेल्या तार परणच्या बोलकारीने रसिक मंत्रमुग्ध झाले. विलंबित आणि द्रुत त्रितालात सादर केलेल्या मसितखानी गतेच्या छंदाला रसिकांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली. वाद्य संगीतावर लोक संगीत वाजविण्याची विलक्षण हातोटी अनुपम जोशी यांनी सरोदवर वाजविलेल्या अभंगमालेतून सोलापूरकर रसिकांनी या प्रसंगी अनुभवली. सरोदवर 'कानडा हो विठ्ठलू', 'अबीर गुलाल उधळीत रंग', 'खेळ मांडियेला', 'कानडा राजा पंढरीचा' हे अभंग ऐकताना सभागृह अक्षरशः सुरांवर डोलत होते.

### अनुपम जोशी यांच्या सरोद वादनाला रसिकांची उत्स्फूर्त दाद

सरोद या अनोख्या वाद्यातून अनुपम जोशी यांनी काढलेल्या सुरावटींना सोलापूरकर रसिकांनी मनमुराद दाद देत उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला. मुकुल कुलकर्णी यांनीही सोलापूरकरांना सुरेल मैफिलीची सांगीतिक भेट दिली. गायन मैफलीची सुरुवात त्यांनी भूपाली रागातील बंदिश ऐकवून केली. त्यानंतर विलंबित एकतालातील 'जब में जानी की बात' ही बंदिश त्यांनी सादर केली. तसेच त्याच रागातील 'मोरा मंदीलरा' ही बंदिश द्रुत त्रितालात ऐकविली. तसेच द्रुत त्रितालात गायलेला तराणा रसिकांना मनापासून भावला. रागेश्री बहार रागातील 'आयी बसंत कुजलिया करें पुकार' ही बंदिश प्रभावीपणे सादर करून त्यालाच जोडून द्रुत त्रितालात 'सघन घन' ही बंदिश ऐकवून रसिकांची दाद मिळविली. मुकुंल कुलकर्णी यांच्या अष्टांगप्रधान गायकीचा आनंदानुभव रसिकांनी घेतला. सोलापूरकरांना अत्युत्तम संगीत मेजवानी दिल्याने कार्यक्रमानंतर रसिकांनी नीती आर्टस्च्या श्रुती पोरवाल यांचे आभार मानले. कलाकारांना संवादिनीवर डॉ. प्रवीण कासलीकर, तबला आणि धामा-जोरीवर महेशराज साळुंके यांनी साथसंगत केली. तर गायन आणि तानपुऱ्यावर साथसंगत अक्षय वर्धावे आणि सुरेंद्र वैद्य यांनी केली. समीर ठाणे यांनी प्रास्ताविक तर प्रा. वैभव कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

# चित्रपट म्हणजे समाज प्रबोधनाचेही उत्तम माध्यम

## प्रा. विलास पाटील; रंगवर्धन अंतर्गत नाट्य परिषद सोलापूर शाखेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

चित्रपटाचे जग हे अत्यंत वेगळे आणि कल्पनारम्य असते. ज्यामधून रसिकांना स्वप्ने वाटण्याचे काम चित्रपट करत असतात. हे करत असताना चित्रपटांमध्ये नवनवीन संकल्पना उदयास आल्या पण जुन्या चित्रपटातील जी मूल्ये होती तीच शाश्वत होती. म्हणून चित्रपट म्हणजे केवळ मनोरंजनच नव्हे, तर ते समाज प्रबोधनाचंही उत्तम माध्यम आहे, असे मत प्रा. विलास पाटील यांनी मांडले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्या वतीने सुरू असलेल्या रंगवर्धन या उपक्रमांतर्गत पुणे येथे स्थायिक असलेले पण मूळचे सोलापूरचेच असलेले प्रा. विलास पाटील यांनी आजची चित्रपटसृष्टी आणि माझ्या चित्रपट कथा या




विषयावर बोलताना आपले मत व्यक्त केले. याप्रसंगी त्यांनी आपल्या कायद्याच्या वाटेवर ठेचकाळणारा न्याय या चित्रपटाची कथा रसिकांना ऐकवली. अत्यंत ओघवत्या आणि मंत्रमुग्ध करणाऱ्या शैलीत प्रा. पाटील यांनी ही कथा सादर केली. याप्रसंगी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद उपनगरीय शाखेचे अध्यक्ष व मध्यवर्ती शाखेचे कार्यकारणी सदस्य विजयकुमार साळुंके, नाट्य परिषद सोलापूर शाखेचे प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे, सह-कार्यवाह आणि नियामक मंडळ सदस्य सुमित फुलमामडी, ज्येष्ठ रंगकर्मी सुनील गुरव, शरदकुमार एकबोटे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा.जोतिबा काटे यांनी केले तर ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी आभार मानले. यावेळी कार्यकारणी सदस्य व्यंकटेश रंगम, सल्लागार मल्लिकार्जुन कावळे, अण्णासाहेब कोतली, ज्येष्ठ रंगकर्मी राजाराजेशचंद्र, परिषदेच्या ज्येष्ठ सदस्य डॉ.नसीम पठाण, शिल्पकार भगवान रामपुरे, हिरालाल धुळम, रघुनंदन भुतडा, प्रा. अर्जुन व्हटकर, अजित पाटील उपस्थित होते.

# बार्शीत दोघांना मारहाण; सहाजणांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१९ जानेवारी-**

गल्लीत जोरात गाडी चालवू नकोस, असे म्हणले म्हणून दोघांना सहाजणांकडून मारहाण केल्याचा प्रकार राणा कॉलनी, जुना फपाळवाडी रोड, बार्शी येथे दि. १६ जानेवारी रोजी रात्री ९ वाजता घडला.

याबाबत जखमी प्रमोद अंकुश कसबे याने दिलेल्या फिर्यादीवरुन शहर पोलिसांत सहाजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरमान पठाण, अरभाज पठाण पिल्या सुपेकर, सोन्या सुपेकर, सुरज धोत्रे, प्रणय कदम यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद झाला आहे. फिर्यादीचे मामाचा मुलगा सुरज काळे यांनी गल्लीत जोरात गाडी चालविण्या-या इसमास गाडी जोरात चालवु नको, असे म्हणला असता त्या ठिकाणी आरमान पठाण, अरबाज पठाण, पिल्या सुपेकर, सोन्या सुपेकर, सुरज धोत्रे, प्रणय कदम असे सर्वजण सुरज काळे यास लाथाबुक्याने मारहाण करीत होते. त्यावेळी फिर्यादी प्रमोद हा भांडण सोडविण्यासाठी गेला असता त्यावेळी प्रमोद यासही मारहाण करत एका लोखडी वस्तूने डोक्यात मारुन जखमी केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.



# संविधानामुळे महिलांच्या जीवनात क्रांतीकारक बदल

## प्रा. कांबळे; आदित्यनगर हौसिंग सोसायटीत रंगला संविधानाचा अमृतमहोत्सवी जागर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेल्या संविधानामुळेच गेल्या पाच हजार वर्षात न झालेला सामाजिक बदल भारतातील महिला आपल्या जीवनात अनुभवत आहेत. शिक्षण नाकारलेल्या महिला आज शिकताहेत, नोकरी करीत आहेत, स्वतःचा व्यवसाय करीत आहेत, अधिकारी, पंतप्रधान आणि राष्ट्रपती सुध्दा होत आहेत. भारतीय महिलांच्या आयुष्यात झालेले हे क्रांतीकारक बदल केवळ भारतीय संविधानांमुळे आले असल्याचे प्रतिपादन प्रा. एम.आर.कांबळे यांनी केले.

संविधानाच्या अमृतमहोत्सवानिमित्त जुळे सोलापूर परिसरात ७५ कार्यक्रम घेणार ! यावेळी बोलताना प्रा. एम. आर. कांबळे म्हणाले की, भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने संविधान अमृतमहोत्सव समिती, जुळे सोलापूर स्थापन करण्यात आली असून समितीच्या वतीन फक्त जुळे सोलापूर परिसरातील शाळा, कॉलेज, सोसायटींमध्ये संविधान जागराचे पंच्याहत्तर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

संविधान अमृतमहोत्सव समिती जुळे सोलापू व आदित्यनगर हौसिंग सोसायटीच्या वतीने सोसायटी सभागृहात संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या संविधान जागर अभियानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी भारत जाधव होते तर माजी नगरसेवक तथा मधुकर आठवले, प्रा. डॉ. महादेव देशमुख, माजी नगरसेवक सुबोध वाघमोडे, ज्येष्ठ अभ्यासक दत्ता थोरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. अध्यक्षीय मनोगत भारत जाधव यांनी केले.

प्रा. कांबळे पुढे म्हणाले, संविधानाने या देशाला खूप काही दिले आहे. आज देशात दिसत असलेले सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील ऐतिहासिक बदल ही संविधानाची देण आहे. या देशातील प्रत्येक भारतीयांच्या जीवनात संविधानाच्या मूल्यांमुळे आमूलाग्र परिवर्तन घडवून आणले असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी दत्ता थोरे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी प्रा. महादेव देशमुख यांनी प्रास्ताविक केले.

सूत्रसंचालन गौतम शिंदे यांनी केले तर नंदू पाटील यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. मारूती मस्के, चंद्रकांत फडतरे, महादेव सोनकांबळे, विनायक धेंडे, सुरेश शिंदे, आर.बी. ढावरे, मनिष सुरवसे, चंद्रशेखर गायकवाड आदींनी प्रयत्न केले.

### निर्मलाबाई रामपुरे

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**



दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील निर्मलाबाई चंद्रशेखर रामपुरे (वय ८२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे. श्री बृहन्मठ होटगी संस्थेचे संचालक शशिकांत रामपुरे यांच्या त्या मातोश्री होत.

**जाहीरनामा**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८३/२०२४
नि. नं. ६

**बार्शी येथील अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश साहेब यांचे न्यायालयात**

**अर्जदार-** चि. करण लक्ष्मण काळुखे **अ.पा. क. आई पूनम लक्ष्मण काळुखे**
रा. केम ता. करमाळा जि. सोलापूर

**विरूद्ध**

सामनेवाला- महाराष्ट्र शासन

ज्याअर्थी अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरहू अज्ञान चि. करण लक्ष्मण काळुखे या अज्ञानाची मालकी वहिवाटीची मिळकत डि. सोलापूर सब डि. व ता. माढा मधील मौजे ढवळस हद्दीतील शेतजमीन त्याचा गट नं. १६१ यापैकी यांचे एकुण क्षेत्र २ हे. 00 आर व पो. ख. 0 हे. १४ आर एवढे क्षेत्र विक्री करणेकामी ती मिळकत अज्ञानाचे नावे असल्याने त्याची परवानगी मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी याद्वारे सर्वांना सुचित करणेत येते की, सदरहू अर्जदार हे सदर मिळकतीचे मालक, हक्कदार नाही अथवा मिळकतीत कोणाचे हितसंबंध असतील त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर वरील मिळकतीचे बाबतीत कोणाची काही हरकत तक्रार असल्यास त्यांनी वरील अर्जाचे कामी नेमलेली तारीख ०७/०२/२०२५ रोजी अथवा ही जाहीर घोषणा प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत आपले हरकती तक्रार स्वतः अगर निर्देशित केलेले विधीज्ञामार्फत मे. कोर्टात ठिक सकाळी ११.00 वाजता हजर राहून लेखी स्वरूपात नोंदवाव्यात व पुराव्याचे कागद दाखल करावेत. जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार अज्ञान चि. करण लक्ष्मण काळुखे अ.पा.क. पूनम लक्ष्मण काळुखे हिस अज्ञानाची मिळकत विक्रीची परवानगी देण्यात येईल.

हा जाहीरनामा आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्यानिशी प्रसिद्ध केले असे.

तारीख : ०३/०१/२०२५

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, बार्शी**

# झेडपी अनुकंपा भरतीसाठी उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीसाठी कॅम्प

## कागदपत्र पडताळणीस संबंधित उमेदवारांनी हजर राहणे बंधनकारक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा परिषद अनुकंपा भरती अंतर्गत प्रतिक्षा यादीतील २६८ उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीसाठी ३१ जानेवारी रोजी सकाळी १०.३० पासून यशवंतराव चव्हाण सभागृहात कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. ही प्रक्रिया पार पडल्यानंतर प्रत्यक्षात भरती प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाच्या उप-मुख्यकार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी दिली.

दरम्यान, जिल्हा परिषदेतील एकूण रिक्त जागांच्या २० टक्के जागा अनुकंपातून भरण्यात येणार आहेत. यासाठी जिल्हा परिषद मुख्यालय, पंचायत समिती पातळीवरील विभागनिहाय रिक्त जागांच्या संकलनाचे काम सध्या सुरू आहे. कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर एक वर्षाच्या आत अनुकंपा नोकरीसाठी करण्यात आलेला अर्ज, सज्ञान झाल्यानंतर एका वर्षाच्या आत अनुकंपा नोकरीसाठी केलेला अर्ज, अनुकंपा विहित नमुना अर्ज, कुटुंबातील वारसाचे प्रमाणपत्र, अनुकंपा नोकरी देण्यासाठी कुटुंबातील अन्य वारसांचे संमतीपत्र, कुटुंबातील कोणताही सदस्य शासकीय सेवेत नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र, कर्मचाऱ्यांच्या पत्नीचा अनुकंपासाठी अर्ज असल्यास पुनर्विवाह न केल्याचे प्रतिज्ञापत्र, शैक्षणिक अर्हतेची सर्व प्रमाणपत्र, गुणपत्रक, जात वैधता प्रमाणपत्र, कर्मचाऱ्याच्या मृत्यू पश्चात कुटुंब निवृत्ती वेतन व मिळालेल्या इतर लाभांचे आदेश, मयत कर्मचाऱ्यास ३१ डिसेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य नसल्याचा पुरावा, दोनपेक्षा जास्त अपत्य असल्यास शेवटच्या अपत्याच्या जन्मतारखेचा दाखला आदी कागदपत्रांची यावेळी पडताळणी करण्यात येणार आहे.

### नियोजित वेळी हजर रहावे लागणार

मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या निर्देशानुसार अनुकंपा भरतीची प्रक्रिया सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने सुरू करण्यात आली आहे. ३१ जानेवारी रोजी अनुकंपा धारक उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेच्या मूळ कागदपत्रासह पडताळणीस उपस्थित राहणे बंधनकारक आहे. पडताळणीसाठी निश्चित केलेल्या नियोजित दिनांक, स्थळी उमेदवारांनी हजर राहणे बंधनकारक आहे.

**- स्मिता पाटील,**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

**ग्रामपंचायत खैरेवाडी ता. माढा. जि. सोलापूर**
**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत खैरेवाडी ता. माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येते आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदापत्रकिय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **अण्णाभाऊ साठे नगर पोहोच रस्ता करणे** | ३.०० लक्ष | - | २००/- | ३ महिने | खुला |

टीप :१) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि:- २०/०१/२०२५ ते २६/०१/२०२५ सकाळी १०.०० पासून सायं ६ वाजेपर्यंत
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दिनांक:- २०/०१/२०२५ ते २६/०१/२०२५ पर्यंत सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय खैरेवाडी ३) निविदा उघडणेचा दिनांक २७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता
४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५) निविदा मंजूर/ नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांना राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत खैरेवाडी. ता. माढा**

शिक्का

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत खैरेवाडी. ता. माढा**

**ग्रामपंचायत खैरेवाडी ता. माढा. जि. सोलापूर**
**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत खैरेवाडी ता. माढा यांचेकडून खालील काम करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येते आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदापत्रकिय रक्कम | बयाणा रक्कम | टेंडर फॉर्म फी | कामाची मुदत | ठेकेदार वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **वाघमोडे वस्ती ते वाकाव ते रेल्वे लाईन रस्ता मुरमीकरण करणे** | ४,९९,९६२/- | - | ३००/- | ३ महिने | खुला |

टीप :१) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि:- २०/०१/२०२५ ते २६/०१/२०२५ सकाळी १०.०० पासून सायं ६ वाजेपर्यंत
२) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दिनांक:- २०/०१/२०२५ ते २६/०१/२०२५ पर्यंत सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय खैरेवाडी ३) निविदा उघडणेचा दिनांक २७/०१/२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता
४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील.
५) निविदा मंजूर/ नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा. सरपंच यांना राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत खैरेवाडी. ता. माढा**

शिक्का

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत खैरेवाडी. ता. माढा**



## बाळेच्या चंडक प्रशालेत क्रीडा दिन उत्साहात

**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

बाळेच्या ज.रा. चंडक प्रशालेच्या प्रांगणात क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सचिन ठोकळ, सचिवा शिल्पाताई ठोकळ, क्रीडा अधिकारी गणेश पवार व डॉ. प्रथमेश जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत मेजर ध्यानचंद व ऑलम्पिक वीर खाशाबा जाधव व स्वातंत्र्यसेनानी स्वर्गीय तुळशीदास दादा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय खेळाडू श्रावणी सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली सर्व राज्य,राष्ट्रीय खेळाडूंनी प्रमुख पाहुण्यांच्या हाती मशाल दिली. मैदानाचे पूजन करून आकाशात फुगे सोडण्यात आले. त्यानंतर कबड्डी सामने झाले. याप्रसंगी मुख्याध्यापक मोहनराव घोडके, पर्यवेक्षक सतीश सुभेदार, क्रीडा शिक्षक दशरथ गुरव आदी उपस्थित होते. ज्येष्ठ क्रीडा शिक्षक मधुकर मुळे यांनी प्रस्तावना केले. सूत्रसंचालन एन डी दळवी यांनी केले. श्रीमती पवार यांनी आभार मानले.



## शहर ड्राप रोबॉल स्पर्धेत उमाबाई श्राविका विद्यालयाची कामगिरी

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

शालेय शहर ड्राप रोबॉल स्पर्धेत उमाबाई श्राविका विद्यालयाने १७ वर्षाखालील मुले व मुलींच्या गटात उल्लेखनीय कामगिरी केली. यासर्व खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. यशस्वी खेळाडूंना प्रशालेचे क्रीडा शिक्षक सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्राविका संस्थेचे विश्वस्त यतीन शहा अंजली शहा, डॉ रोहिणी शहा, अतुल शहा, अनिल जमगे, सीईओ देवई शहा, वरिष्ठ दिप्ती शहा, मुख्याध्यापक सुकुमार मोहोळे उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ यांनी अभिनंदन केले. शहर स्पर्धेत कामगिरी केलेले खेळाडू : १७ वर्ष मुले: सिंगल : तपन दास (व्दितीय). डबल : संभाजी शिंदे, आदित्य होनपारखे, आदित्य मुकुटकर राजवर्धन घोडके (प्रथम). ट्रीपल : अथर्व साठे, हर्षवर्धन घोडके, राजवर्धन घोडके, कृष्णा दराडे (व्दितीय). १७ वर्ष मुली : सिंगल : दिव्या कसबे (प्रथम) डबल: अनुष्का केत, प्रिया शिंदे (प्रथम) ट्रीपल. अनिश्का टोणपे, धनश्री होणपारखे, कृष्णाली पेंडकर (प्रथम).



## विधवांना सन्मान देत त्यांचे मनोबल वाढवावे : रेखा सोनकवडे

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

हळदी-कुंकूला आपल्या समाजात फक्त सुहासिनींना बोलवलं जातं. त्यांनाच तो मान दिला जातो. विधवांना कोणत्याही शुभ कार्यात साम ील करून घेतलं जात नाही. ही पद्धत फारच चुकीची आहे. विधवांनाही जगण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यांनाही मान सन्मान मिळाला पाहिजे. त्यांना तो देऊन त्यांचे मनोबल वाढवावे, असे आवाहन मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांनी केले. वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत हळदी-कुंकू व माता मेळावा पार पडला, यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी विधवामाता बसम्मा सलगरे होत्या. स्वागत मनिषा कुणाले व अर्चना गिरी यांनी केले. मुख्याध्यापिका रेखा सोनकवडे यांनी धुळव्वा खसगी, नागम्मा आळगे, बसम्मा सलगरे, पद्मश्री पंडित या विधवा माता-भगिनींना प्रथम हळदी-कुंकूचा मान दिला. जिल्हा परिषद शाळेतील हा भावनिक प्रसंग अनुभवत विधवा मातांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली. यावेळी शाळेच्या उपक्रमाबाबत कौतुक करत या कार्यक्रमामुळे आमच्यात हरवलेले चैतन्य पुन्हा मिळाल्याच्या भावना व्यक्त केल्या. अनुसया कलशेट्टी, रत्नाबाई रेऊरे, कविता फड, संगीता माळी, वर्षा धनगर, सारिका गवंडी, श्रीदेवी सलगरे, अनिता ढोपरे, मंगल गाडीवर, प्रभावती हुलगेरी, सीमा त्रिगुळे, सुनिता सोनकवडे, शोभा आगरखेड, मंगल मुनोळी, सुरेखा धडे, शारदा अष्टगी, निंगाराणी सलगरे, गीता आळगे, श्रीदेवी हेबळे, भाग्यश्री वडतिले, परवीन शेख, सोनाली चौगुले, बबिता चौगुले, सविता भरमदे, शरणाबाई चव्हाण, आळगे, ठोंबरे, अश्विनी पोमाजी उपस्थित होत्या. यावेळी संगीत खुर्ची, उखाणे स्पर्धा घेण्यात आल्या. प्रथम क्रमांक लक्ष्मी दुर्गे, द्वितीय अनुसया कलशेट्टी तर तृतीय मनिषा कुणाळे यांना मिळाला. सगळ्यांना कुंकवाचा करंडा भेट देण्यात आला.

## मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून अल्पवयीन मुलीस पळवून नेले

**मंगळवेढा, दि.१८ जानेवारी**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एका अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी की, यातील अल्पवयीन मुलगी ही दि. १५ रोजी सकाळी ६ वाजता तिला आई नसल्याने तिच्या वडिलाला शौचालयास जाते असे म्हणून ती घराबाहेर पडली. ती घरी आलीच नसल्याने तिच्या वडिलांनी आपली मुलगी का आली नाही म्हणून गावात व परिसरात तसेच नातेवाईकाकडे चौकशी केली असता ती मिळून आली नाही. म्हणून फिर्यादी तथा वडिलांची खात्री पटली की अज्ञात व्यक्तीने फुस लावून कायदेशीर रखवालीतून पळवून नेले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार हाके करीत आहेत.

# भारताचा दुहेरी सुवर्ण इतिहास; नेपाळला हरवून विश्वविजेतेपद

**नवी दिल्ली, १९ जानेवारी -**

इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमच्या चकचकीत प्रकाशात आणि जल्लोषाच्या गजरात भारतीय पुरुष आणि महिला संघांनी खो-खोच्या पहिल्या विश्वचषकाचे विजेतेपद पटकावून इतिहास घडवला.

नेपाळला अंतिम सामन्यात पराभूत करत भारतीय संघांनी संपूर्ण देशाला अभिमानाचा क्षण मिळवून दिला व भारतीय पुरुष व महिला संघांनी प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या स्टेडियमवर भारताचे नाव विश्वचषकावर सुवर्णअक्षरात कोरले. भारतीय खो-खो संघांनी एक अनोखा आणि गौरवास्पद इतिहास रचला आहे. भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी खो-खोच्या पहिल्या विश्वचषकात संपूर्ण स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवत पहिले विश्वविजेतेपद पटकावले. महिलाच्या साम न्यात भारताने नेपाळवर ७८-४० असा



३८ गुणांनी विजय साकारला. पुरुष अंतिम सामन्यात भारताने नेपाळला ५४-३६ असा १८ गुणांनी पराभूत केले.

### महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रत्येकी २.२५ कोटी रुपयांचे पारितोषिक

सर्व सुवर्णपदक विजेत्या खेळाडूंना महाराष्ट्र शासनाच्या वतीने प्रत्येकी २ कोटी २५ लक्ष रुपयांचे रोख पारितोषिक दिले जाणार आहे. तसेच थेट क्लास वन अधिकारी म्हणून नोकरी देखील राज्य शासनाच्या वतीने दिली जाणार आहे.

**- प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, सह सचिव भारतीय खो खो महासंघ.**



### हा विजय आमच्या मेहनतीचे प्रतीक

हा विजय आमच्या मेहनतीचे प्रतीक आहे. संपूर्ण भारतासाठी हा एक सुवर्ण क्षण आहे. आजचा दिवस केवळ माझ्या काराकीर्दीतालाच नाही, तर भारतीय खो-खोच्या इतिहासातील सुवर्ण दिवस आहे. हा विजय आम च्या संघाच्या अथक मेहनतीचा, प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाचा, आणि प्रत्येक भारतीयाच्या पाठिंब्याचा परिणाम आहे.

**-प्रतीक वाईकर, पुरुष कर्णधार**

भारताच्या पुरुष संघाने सुरवातीपासूनच आक्रमक खेळ करताना नेपाळला जरा सुध्दा डोकं वर काढायला दिले नाही. पहिल्या टर्न मध्ये भारताने तब्बल चार तुकड्या बाद करून नेपाळला जोरदार धक्का दिला व या आक्रमणाच्या टर्नमध्ये भारताने २६-० असे गुण वसूल केले.

दुसऱ्या टर्न मध्ये नेपाळच्या आक्रम णात भारताची पहिली तुकडी २.४४ मि. संरक्षण करू शकली तर दुसरी तुकडी १.५९ मिनिटात बाद झाली. तर तिसऱ्या तुकडीतील खेळाडूंनी २.०२ मि. वेळ देत बाद झाली तर चौथी तुकडी नाबाद राहिली त्यामुळे मध्यंतराला २६-१८ असा गुणफलक दिसत होता.

तिसऱ्या टर्न मध्ये आक्रमण करताना भारताने नेपाळची पहिली तुकडी १.४९ मि. बाद केली तर दुसरी तुकडी १.१० मि. तंबूत परतली. तर तिसरी तुकडी अवघ्या ४५ सेकंदात बाद केली. चौथ्या तुकडीला १.०७ मि. बाद केले. पाचव्या तुकडीतील दोन खेळाडू बाद झाले. यावेळी विश्वचषकाच्या अंतिम सामन्याचा गुणफलक ५४-१८ असे गुण दर्शवत



### सामन्याचे पुरस्कार:

सर्वोत्तम आक्रमक: सुयश गरगटे (भारत)
सर्वोत्तम संरक्षक : रोहित बर्मा (नेपाळ)
सामन्याचा सर्वोत्कृष्ट खेळाडू: मेहूल (भारत)

होता. चौथ्या व शेवटच्या टर्न मध्ये नेपाळने आक्रमणाला सुरवात केली व भारताची पहिली तुकडी दोन मिनिटात परतवण्यात नेपाळने यश मिळवले. तर दुसरी तुकडी २.१६ मि. बाद झाली तर तिसरी तुकडी २.०१ मि. बाद झाली तर चौथी तुकडी नाबाद राहिली व भारताने हा सामना ५४-३६ असा १८ गुणांनी जिंकत विश्वचषकाला कवटाळले. स्पर्धेचे बक्षीस वितरण केंद्रीय मंत्री मा. ना. किरण रिजजू , सुमित्रा महाजन (माजी लोकसभा अध्यक्षा) व विविध मान्यावरांच्या हस्ते पार पडला. त्यावेळी खो खो महासंघाचे अध्यक्ष सुधांशू मित्तल व महासचिव महेंद्र सिंग त्यागी उपस्थित होते.

## अरिहंत स्कूलची आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

अरिहंत इंग्लिश मिडीयम स्कूलच्या १७ व १९ वर्षांखालील क्रिकेट संघाने राष्ट्रीय स्पर्धेत चमकदार कामगिरी करत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्थान मिळविले. या संघाना एप्रिल २०२५ मध्ये नेपाळमध्ये होणाऱ्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. गोव्यातील पेडाम येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत अरिहंत स्कूलच्या २ संघाने सुवर्ण व एका संघाने रौप्य पदक पटकावले. स्कूलच्या खेळाडूंनी कर्नाटक, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, तेलंगणा, संघाना मागे टाकत प्रथम क्रमांक व सर्वात जास्त पदके



मिळवण्याचाही मान मिळविला. आकाश मिस्कीन यांच्या नेतृत्वाखाली संघांनी दमदार कामगिरी करत यश संपादन केले. सर्व यशस्वी खेळाडूंचे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. अजय पोन्नम , संस्थेच्या संचालिका सुलक्षणा पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख , पर्यवेक्षिका रजनी सग्गम, चन्नेश इंडी आदींनी अभिनंदन केले. कामगिरी केलेला संघ : १९ वर्षाखालील मुले सुवर्ण -: आर्यन याटकर, सोमेश चनमल, संतोष संगणगारी, भावेश अन्नम, विश्र्वराज डक्का, महेश टोणपे, पृथ्वीराज गोसावी, अथर्व बिराजदार, विघ्नेश बंदगी, श्रेयस सोलंकर, विश्वास पल्ली, श्रियस गालपेल्ली, श्रीनाथ अन्नम.रौप्य : अथर्व देशमुख, ईश्वरचंद माचेर्ला , वैभव पाटील, सुमितराज मेरगू, महेंद्र मादास, प्रेम भोसले. १७ वर्षा खालील मुली सुवर्ण पदक प्राप्त मुलींच्या संघातील सहभागी मुली-: श्रुती चन्ना, अक्षरा कांबळे, प्रियदर्शनी संगणगारी, हर्षदा पाटील, वैभवी जेटगी, अलेक्या भोसले.



## तलवारबाजी स्पर्धेत दमाणी प्रशाला विजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

ऑल स्टार फेन्सिंग क्लबच्या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या तलवारबाजी स्पर्धेत बी.एफ.दमाणी प्रशालेने विजेतेपद पटकविले. जिल्हा तलवारबाजी संघटना व ऑल स्टार फेंसिंग क्लबने याचे आयोजन केले होते. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातून १५० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता

पारितोषके राज्य तलवारबाजी संघटनेचे उपाध्यक्ष प्रकाश काटुळे यांच्या हस्ते देण्यात आली.

याप्रसंगी जिल्हा सचिव दीपक शिंदे, ऑल स्टार फेन्सिंग क्लबचे सचिव पवन भोसले उपस्थित होते. श्रुतिका चव्हाण यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

अंतिम निकाल : श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम स्कूल (द्वितीय), संगमेश्वर ज्युनियर कॉलेज (तृतीय), के.एल.ई. स्कूल, इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूल (उत्तेजनार्थ).



## कराटे स्पर्धेत रुद्र अकादमीने कमविली तब्बल १४ पदके

### पाच सुवर्ण, सहा रौप्य, तीन कांस्य पथकांची कमाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जानेवारी -**

कराटे इंडिया ऑर्गनायझेशन-किओ ची मान्यता असलेल्या इंडियन मार्शल आर्ट ॲक्डमी तर्फे आयोजित मुंबई ओपन कराटे चँपियनशीपमध्ये 'रुद्र अकादमी व ट्रेडिशनल अँड स्पोर्ट्स कराटे असोसिएशनच्या सर्व सहभागी चौदा कराटे ॲथलिटस् नी कुमिते प्रकारात ५ सुवर्ण, ६ रौप्य, ३ कास्य पदके पटकावून घवघवीत यश मिळवले.

विजेत्यांना आंतरराष्ट्रीय कराटेपटू भुवनेश्वरीने ऑनलाईन तसेच ए लेवल रेफ्री व प्रमुख प्रशिक्षक मिहिर संगीता सुरेश जाधव आणि आकाश झळकेनवरु यांनी ऑफलाईन प्रशिक्षण दिले असून विजेते स्पर्धक नवी पेठेतील शिवस्मारक व सात रस्ता मंत्री चंडक आयकॉन शाखेत नियमित सराव करतात.

सुवर्ण पदक विजेते:

आर्या यादव (संगमेश्वर कॉलेज) , अक्षिता कुलकर्णी (एम पी एस), संकेत धन्नाईक (ए.डी.जोशी), कार्तिका गंधमल (आय एम एस), आयेशा हकीम (आय एम एस). रौप्य पदक विजेते: अनुष्का पल्ली (एम पी एस),आदित्य पालिया (के एल ई), ओवी शिंदे (एसईएस पॉलिटेक्निक्स), सिद्धराज कुलकर्णी (संगमेश्वर पब्लिक स्कूल), अनुष्का लोकरे (एल एफ सी), महमदी हकीम (आय एम एस), कास्य पदक विजेते: अर्णव माने (एन के ऑर्कीड), अन्वी शिंदे (एल एफ सी),श्रेया वाघमारे (एल एफ सी).

# पुढील लक्ष्य कॉमनवेल्थ, एशियन गेम्सचे

### भारतीय खोखो संघातील पुण्याच्या सुयश गरगटे यांचे लक्ष्य

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**नवी दिल्ली, दि. १९ जानेवारी-**

भारतीय व आंतरराष्ट्रीय खो-खो म हासंघाचे कॉमनवेल्थ, एशियन गेम्स व ऑलिम्पिक स्पर्धेच्या समावेशाच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. त्यात यश आल्यास माझे पुढील लक्ष्य भारतीय संघात निवडीचे आहे, असे भारतीय खो खोपटू सुयश विश्वास गरगटे बोलत होता.

नवी दिल्ली येथील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर सुरू असलेल्या पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेत सुयश भारतीय संघाकडून कामगिरी करत आहे. महाराष्ट्राच्या खो-खो क्षेत्रात पुण्यातील सुयशची उत्कृष्ट खेळाडू म्हणून ख्याती आहे. त्याची खेळातली सुरुवात, मेहनत, यशस्वी प्रवास आणि सध्याचे स्थान हे नवोदित खेळाडूसाठी प्रेरणादायी आहे.

खो-खो कसे वळाला हे सांगताना सुयश म्हणतो, २००७ मध्ये नवमहाराष्ट्र संघ पुणे यांच्याकडून खो-खो खेळायला सुरुवात केली. सुरुवातीला शाळेत असताना लंगडी खेळत होतो. त्यानंतर खो-खोमध्ये रस निर्माण झाला. अर्जुन पुरस्कार विजेते श्रीरंग इनामदार व शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते शिरीन गोडबोले यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा जीवन अनेक सुवर्णक्षणांनी भरलेले आहे.

सुयशची मेहनत, चिकाटी आणि सातत्य हे उदयोन्मुख खेळाडूंना प्रेरणा देणारे आहेत. कामगिरी कशी बहरत गेली हे सांगताना सुयश म्हणतो, २०१३ मध्ये राजस्थान येथे झालेल्या १८ वर्षाखालील राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक मिळवले. त्यानंतर मागे वळून पाहिले नाही. २०१६ मध्ये नागपूर येथे झालेल्या वरिष्ठ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत रौप्य, गुवाहाटी येथे झालेल्या ४थी एशियन चॅम्पियनशिपमध्ये सुवर्ण, ३६ व ३७ व्या नॅशनल गेम्सम ध्ये सुवर्ण पटकाविले. अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सात स्पर्धेत सहभागासह पदके मिळविली. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा स्पर्धे

#### शैक्षणिक आणि व्यावसायिक यश

सुयशने केवळ खेळातच नाही तर शिक्षण क्षेत्रातही आपले कर्तृत्व सिद्ध केले. बीएससी कॉम्प्युटर सायन्स आणि एम.ए. इकॉनॉमिक्स मध्ये शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या ते मुंबई चर्चगेट येथील आयकर विभागात कार्यरत आहेत. महाराष्ट्र शासनानेही त्यास वर्ग दोनची स्पोर्ट्स एक्झिक्युटिव्ह ऑफिसर पदाची नियुक्ती दिली आहे.



त एकलव्य व राज्य अजिंक्यपद स्पर्धेत राजे संभाजी पुरस्काराने सन्मानित. याच कामगिरीवर २०२२-२३ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा माझा आनंदाचा व अविस्मरणीय क्षण आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जिल्हा

## संक्षिप्त वृत्त



### सातलिंग शटगार यांना कृतिशील मुख्याध्यापक पुरस्कार

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने समितीचे संस्थापक अध्यक्ष व माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते जिल्हाध्यक्ष गुरुनाथ वांगीकर, शहराध्यक्ष सरदार नदाफ हत्तुरे, मुख्याध्यापक वैजनाथ हत्तुरे, मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सरचिटणीस महेश सरवदे यांच्या उपस्थितीत सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज केगाव येथे स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र शाल देऊन सातलिंग शटगार यांचा सन्मान करण्यात आला. शटगार यांनी शैक्षणिक कामामध्ये एस. एस. सी बोर्डाचे सर्व काम हे आजपर्यंत करीत आले आहेत. निवड श्रेणी वरिष्ठ श्रेणी प्रशिक्षण यामध्ये जिल्हा समन्वयक म्हणून त्यांनी यशस्वी काम केलेले आहे. त्यांच्या शाळेचा निकाल सतत आजपर्यंत शंभर टक्के लागत आलेला आहे. शटगार यांनापुरस्कार मिळाल्याबद्दल सोलापूर जिल्ह्याचे खासदार प्रणिती शिंदे, माजी गृह राज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार विश्वनाथ चाकोते, धर्मराज काडादी, शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हा कार्याध्यक्ष ॲड.नंदकुमार पवार, वरिष्ठ उपाध्यक्ष सुरेश हसापुरे, संस्थेचे अध्यक्ष नागनाथ सुरवसे, संस्थेचे सचिव श्रीपाद सुरवसे, महिला काँग्रेस अध्यक्ष शाहीन शेख, प्रदेश महिला सरचिटणीस माजी महापौर अलका राठोड, सुशीला आबुटे यांनी अभिनंदन केले.




### राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सरस्वती विद्यालयाला द्वितीय क्रमांक

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

ब्रम्हदेवदादा माने पॉलटेक्निक कॉलेज, सोलापूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथील सरस्वती विद्यालयाने द्वितीय क्रम ांकाचे पारितोषिक पटकावले असून, शाळेचे विद्यार्थी व टीममधील शिक्षकांचे सर्वत्र होत आहे कौतुक. उत्तम शिक्षणाबरोबरच विविध प्रकारच्या खेळांमध्ये तसेच विविध प्रकारच्या विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवून विद्यार्थ्यांसह विद्यालयाची मान सतत उंचावण्यासाठी सरस्वती विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक व शिक्षक हे सतत प्रयत्नशील असतात. या प्रयत्नामुळेच ब्रम्हदेव माने पॉलटेक्निक कॉलेज, सोलापूर यांच्या वतीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सरस्वती विद्यालय येथील इयत्ता दहावीचे विद्यार्थी सचिन चंद्रकांत घोडके व सार्थक शरद शिंदे या विद्यार्थ्यांनी रस्त्यावरील प्रकाश उर्जेची बचत या प्रयोगाचे सादरीकरण केले होते. या प्रयोगाला राज्यस्तरीय द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले आहे.सरस्वती विद्यालयाने राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात कौतुकास्पद कामगिरी करुन द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावल्याने संस्थेचे सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच गावातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व ग्रामस्थांनी विद्यार्थी व टीमचे अभिनंदन केले.




### युवासेना शहर प्रमुख राठोड यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १९ जानेवारी-**

युवा सेना अक्कलकोट शहर प्रमुखपदी अजय भीमराव राठोड यांची निवड झाल्याबद्दल शिवसेना उपजिल्हा प्रमुख सुनील कटारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे माजी तालुका प्रमुख मनोज पवार, तालुका उपप्रमुख धनराज चव्हाण, अल्पसंख्याक तालुका प्रमुख आय्याजभाई जमादार, माजी उपशहर प्रमुख श्रीशैल पाटील, राहुल चव्हाण, ओम कार राठोड व शिवसैनिक उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### श्रावणी कदम



**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

सैफूल, स्वामी विवेकानंद नगर येथील श्रावणी उमेश कदम (वय १८) हिचे रविवारी मध्यरात्री एकच्या सुमारास अल्प आजाराने निधन झाले. तिच्या पश्चात आई, वडील, बहीण, भाऊ असा परिवार आहे. श्रमिक पत्रकार संघाचे उपाध्यक्ष उमेश कदम यांची ती कन्या होत.

### रामदास अडकी



**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

कुंभारी येथील नवीन विडी घरकुल येथील रहिवासी रामदास सिद्रामप्पा अडकी (वय ७८) यांचे रविवारी १९ जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर पद्मशाली स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले असून त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### दीपक चव्हाण



**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

शहरातील मुरारजी पेठ परिसरातील जुनी पोलीस लाईन येथील रहिवासी दीपक जालिंदर चव्हाण यांचे रविवारी सकाळी निधन झाले. मृत्यूसमयी ते ५२ वर्षांचे होते. त्यांच्यावर रविवारी सायंकाळी जुना पुना नाका येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात भाऊ, पत्नी, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे

# पंढरपुरात संत नामदेव महाराजांचे स्मारक साकारणार

## अध्यक्ष महेश ढवळे : जिल्हाधिकाऱ्यांसमवेत बैठक, विविध विषयांवर चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जानेवारी-**

समस्त शिंपी समाजासह वारकरी सांप्रदायाचे आराध्य दैवत , भागवत धर्माचे आद्य प्रचारक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचा स्मारकाचा मार्ग आता लवकरच मोकळा होणार असून याविषयी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याशी सविस्तर चर्चा झाली असल्याची माहिती अखिल भारतील नामदेव क्षत्रिय एकसंघ समाजाचे अध्यक्ष महेश ढवळे यांनी दिली .

> **स्मारक प्रेरणादायी ठरणार**
>
> लाखो संत नामदेव महाराजांच्या भक्तांसाठी हे स्मारक प्रेरणादायी व आशादायी होणार असून यासाठी आता सर्व समाजाने एकसंघ होऊन या स्मारकाला भव्य करण्याचं संकल्प करावा असे याप्रसंगी अध्यक्ष महेश ढवळे यांनी केला.

सोलापूरचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात अखिल भारतीय संत नामदेव क्षत्रिय एक संघाचे अध्यक्ष महेश ढवळे, पंढरपूर समाजाध्यक्ष गणेश उंडाळे, केशवराज संस्थेचे अध्यक्ष रुपेश खांडके, नामदास १६ वे वंशज हभप माधव महाराज नामदास, मुकुंद महाराज नामदास, एकनाथ महाराज नामदास, निवृत्ती महाराज नामदास, नंदकुमार कोसबतवार, मनोज भांडारकर पंढरपूरचे राजेश धोकटे व पश्चिम महाराष्ट्र युवा संपर्कप्रमुख प्रथमेश परांडकर व शिंपी समाज बांधव या ठिकाणी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी नामदास परिवाराच्या वतीने जुलै २०२५ मध्ये संत शिरोमणी नामदेव महाराजांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्याचे आमंत्रणही दिले व शासनाने हा कार्यक्रम भव्य प्रमाणात शासकीय स्तरावर साजरा करावा असेही त्यांना विनंती पत्र दिले. यावर सविस्तर चर्चा होऊन पंढरपूर येथे नियोजित संत नामदेव स्मारक जागेचे पाहणी पंढरपूर प्रशासनाचे अधिकारी यांनी केली. आता स्मारकाला कुठल्याही प्रकारचा अडथळा नसून लवकरच हे स्मारक पूर्ण व्हावे ही आशा व्यक्त केली.



# बीडच्या प्रकरणात बार्शी चर्चेत

### ज्योती मंगल जाधव यांच्या नावे शेंद्रीत ३५ एकर जमीन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जानेवारी-**

बार्शी तालुक्यातील शेंद्री या गावी सुमारे ३५ एकर जमीन ज्योती मंगल जाधव यांच्या नावे असल्याचे समोर आले आहे. या जाधव कोण आहेत? जमिनी कोणी घेतली, पैसे कोणी व कसे दिले? याचा तपास ईडीने करावा, अशी मागणी भ्रष्टाचार विरोधी कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केली आहे.

खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याच्या संबंधित बेनामी प्रॉपर्टीची चर्चा चालू असल्याने चौकशी केली असता शेंद्रीत जमीन असलेली व्यक्ती गावात कोणी नसल्याचे समोर आले. एकूणच बीडच्या प्रकरणात आता बार्शी चर्चेत आले आहे.

बीड जिल्ह्यातील खंडणी प्रकरणात गुन्हा दाखल झालेल्या वाल्मीक कराडचा संतोष देशमुख हत्याप्रकरणात सहभाग आहे का? याबाबतचा शोध तपास यंत्रणा घेत आहे. दरम्यान कराडचे अनेक कारनामे समोर येत आहेत. अंजली दमानिया यांनी तर वाल्मीक कराडशी निगडीत अनेक प्रकरणे चव्हाट्यावर आणली आहेत. बार्शी तालुक्यात वाल्मिक यांच्या स्नेहातील जाधव यांच्या नावे जमिनी घेतल्याचा आरोप झाला होता. कराड याच्या बेनामी संपत्तीची चर्चा आता चालू आहे. वाल्मीक यांची बेनामी संपत्ती बार्शी परिसरात आहे काय? याच्या चौकशीचे पोलिसांसह महसूल प्रशासनासमोर नवे आव्हान आहे. तसेच सदर जमिनीची देखभाल करणा-या मजुरांचे तीन महिन्यांपासून मजुरी दिली नसल्याचे सदर मजूर लोकांनी सांगितले. तसेच ते लातूर जिल्ह्यातील असून त्यांची सध्या तारांबळ चालू आहे. ज्योती जाधव यांना आम्ही पाहिले नाही व ओळखतही नाही, असे त्यांनी डिजीटल मिडियाशी बोलताना सांगितले.

# महाराणा प्रतापांच्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जानेवारी-**

वीर शिरोमणी महाराणा प्रतापांच्या ४२८ व्या पुण्यतिथीनिमित्त बार्शी तालुक्यातील घिसाडी समाजाकडून महाराजांना आदरांजली वाहण्यात आली.

महाराणा प्रतापांचा जन्म १५४० कुंभलगड (राजस्थान) या ठिकाणी झाला. परकीय आक्रमणापासून आपल्या लोकांचे संरक्षण करण्यासाठी व जाती-जातीमध्ये एकोपा ठेवण्याच्या दृष्टीने संपूर्ण आयुष्य मोगलांच्या विरोधात लढत राहिले. त्यांना गुलामी पसंत नव्हती. या विचाराने त्यांनी आपले राजमहलातील सुखाचा त्याग करुन गोरगरीब प्रजेसाठी लढत राहिले. अशा महापुरुषांचा १९ जानेवारी १५९७ रोजी मृत्यू झाला. व्यक्ती मरत असते पण अशा महापुरुषांची विचार धारणा कधीच मरत नसते ते प्रत्येक पिढीला मार्गदर्शन ठरत असतात. अशा महापुरुषांच्या पुण्यतिथीनिमित्त बार्शीतील घिसाडी समाज बांधवांकडून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कुणाल साळुंके, आनंद पवार, रमेश पवार, संतोष पवार, मनोज साळुंके, गणेश चव्हाण, राजेंद्र चव्हाण, सुनील पवार, बबलू साळुंके, किशोर चव्हाण, अजय पवार, प्रवीण साळुंके, गणेश साळुंके, अमर साळुंके, अमोल पवार, सुरज चव्हाण उपस्थित होते.



# दारु बिलाच्या वादातून तीन मित्रांकडून मारहाण; एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जानेवारी-**

शहरातील एका व्यक्तीला दारुच्या बिलाच्या वादातून तीन मित्रांनी मारहाण करुन गंभीर जखमी केल्याची घटना समोर आली आहे. किसनराव बाबुराव महाजन (वय ४४) रा. भोगेश्वरी चाळ, बार्शी, यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १५ जानेवारी रोजी

रात्री ११. ४५ च्या सुमारास, अजिम शमशुद्दीन शेख, गौस तांबोळी आणि गौसचा भाऊ (नाव माहित नाही) या तिघांनी त्यांना एस. के. पॅलेस हॉटेल, कुर्डुवाडी रोड येथे दारु पिण्यासाठी नेले होते.

दारु पिल्यानंतर, बील भरण्याच्या कारणावरुन वाद झाला. गौस तांबोळीने किसनराव यांना बील भरण्यास सांगितले, परंतु किसनराव यांनी पैसे नसल्याचे सांगितले. या कारणावरुन तिघांनी शिवीगाळ करत मारहाण केली. अजिम शेखने दगडाने त्यांच्या डोक्यावर मारुन जखमी केले. गौस तांबोळीने धारदार हत्याराने डाव्या हाताच्या दंडावर वार केला आणि गौसच्या भावाने लाथाबुक्यांनी मारहाण केली. जखमी झाल्यावर किसनराव महाजन यांनी उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात जाऊन उपचार घेतले आणि नंतर बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणाची नोंद करुन पुढील तपास सुरु केला आहे.

# डिजीटल मीडिया संपादक पत्रकार संघटनेची बार्शी तालुका कार्यकारिणी जाहीर

### तालुकाध्यक्षपदी शेळके, उपाध्यक्षपदी चौधरी, शिंदे तर सचिवपदी गणेश शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १९ जानेवारी-**

महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक राज्यामध्ये डिजीटल पत्रकारिता क्षेत्रामधील संपादक व पत्रकारांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी कार्य करणारी डिजीटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेची बार्शी तालुका कार्यकारिणी नुकतीच जाहीर झाली.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, ज्येष्ठ संपादक राजा माने यांच्या आदेशानुसार बार्शी तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात आली. बार्शी तालुका अध्यक्षपदी धिरज शेळके, ग्रामीण तालुका उपाध्यक्षपदी भैरवनाथ चौधरी, शहर उपाध्यक्षपदी अभिजीत शिंदे, सचिवपदी गणेश शिंदे, खजिनदारपदी किरण माने, संघटकपदी गोविंद भिसे, संपर्क प्रमुखपदी संतोष राजगुरु तर महिला आघाडी तालुका उपाध्यक्षपदी वैशाली ढगे यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच अजय पाटील यांची राज्य कार्यकारिणी सदस्यपदी, विजय कोरे यांची पश्चिम महाराष्ट्र सहसचिवपदी तर दिनेश मिटकरी यांची सोलापूर जिल्हा उपाध्यक्षपदी निवड नियुक्ती करण्यात आली.

यावेळी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, राज्य संघटक मुरलीधर चव्हाण, राज्य कोषाध्यक्ष अमित इंगोले, राज्य कार्यकारिणी सदस्य संतोष सूर्यवंशी यांच्या हस्ते सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी बार्शी कार्यकारिणी सदस्य अक्षय बारंगुळे, राहुल भालशंकर, दत्तात्रय गुरव, विश्वास वीर, प्रतिज्ञा वाळके आदी उपस्थित होते. याप्रसंगी राज्य कोषाध्यक्ष अमित इंगोले व राज्य कार्यकारिणी सदस्य संतोष सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले.



# आनंदी जीवनासाठी नामस्मरण करा : शुभांगी पटणे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१९ जानेवारी-**

जीवनात जवळपास ८० टक्के दुःखच असते. त्यासाठी आपण भक्ती, नामस्मरण, साधना करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण कुलदेवता आणि पूर्वजांचे त्रास निवारणासाठी श्री गुरुदेव दत्त हा नामजप करायला हवा. नामजप केल्याने आपली प्रपंच सुखमय होऊन आपल्या जीवनातील समस्यांवर मात करण्यासाठी बळही मिळते. त्यासाठी जीवनात आनंदी होण्यासाठी भक्ती, नामस्मरण साधनाच आवश्यक असल्याचे प्रतिपादन सांगोला येथील सनातन संस्थेच्या साधिका शुभांगी पाटणे यांनी व्यक्त केले.

अक्कलकोट येथे बायपास रोड येथील कालिका मंदिर येथे रविवार १९ जानेवारी रोजी आयोजित मार्गदर्शनात त्या बोलत होत्या. यावेळी मोठ्या प्रमाणात महिला आणि पुरुष उपस्थित होते. यावेळी शुभांगी पाटणे पुढे बोलताना म्हणाल्या की, जीवनामध्ये प्रत्येकालाच आनंद हवा असतो पण आज आपण पाहत आहोत की मनुष्याला जीवन जगताना अनेक समस्या भेडसावत असल्याने बहुतेक करून आपल्या जीवनामध्ये दुःखच पुष्कळ प्रमाणात आहे, म्हणूनच जीवन जगण्याचा आनंद घ्यायचा असेल तर जीवनामध्ये भक्ती,नामस्मरण साधनेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. असे शुभांगी पाटणे यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन समृद्धी ग्रामोपाध्याय यांनी केले.



# गटारीच्या खचलेल्या स्लॅबमध्ये गाडी अडकली

### स्लॅब त्वरित दुरुस्त करा; नागरिकांची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. १९ जानेवारी-**

महाळुंग (ता. माळशिरस) येथे प्राचीन व ऐतिहासिक यमाई देवीचे मंदिर आहे. देवीच्या दर्शनासाठी भाविकांची संख्या वाढते आहे. असेच एक भाविक आपल्या चारचाकी गाडीतून देवीच्या दर्शनासाठी आले असता गटारीवरील स्लॅबवरून गाडी नेताना स्लॅब खचला व गाडी अडकून पडली.

गटार मोठी असल्याने पूर्ण चाक अडकले गेले. बऱ्याच प्रयासानंतर गाडी बाहेर काढण्यास नागरिकांना यश आले. हे मंदिर पुरातन विभागाच्या अखत्यारित येते. सध्या मंदिराचे पुरातन विभागाकडून दुरुस्तीचे काम चालू आहे. मंदिर प्रसिद्ध असल्याने या ठिकाणी देवीची यात्रा, नवरात्रोत्सव हे उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरे होतात. यामध्ये व्यवसायिकांच्या सुवेधेसाठी पूर्वी या ठिकाणी संपूर्ण परिसर काँक्रिटचा केलेला आहे. तसेच गटारही केली आहे. गटार मोठी असल्याने व अनर्थ होऊ नये म्हणून संपूर्ण गटारीवर स्लॅब टाकून गटार बंदिस्त केलेली आहे. परंतु हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने अनेक ठिकाणी या गटारीवरील स्लॅब टाकलेला आहे. गटारीच्या अशा अवस्थेमुळे दुर्घटना घडू नयेत म्हणून नागरिकांनी नगरपंचायतीला रितसर अर्ज करून गटार दुरुस्तीची विनंती केली होती. परंतु दखल घेतली गेली नाही अशी ग्रामस्थांची तक्रार आहे. आता तरी नुकत्याच घडलेल्या गंभीर घटनेची दखल घेऊन संपूर्ण गटारीवरील स्लॅब मजबूत करावा अशी लेखी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. यामध्ये यमाई देवी प्रतिष्ठानचे संजयकुमार घोंघाणे, जगन्नाथ गणेशकर, सुधीर शामराव भोसले, विक्रांत विष्णू रेडे-पाटील, विनायक कुलकर्णी, भारत कोकीळ, सोमनाथ डांगे, शंकर माने, शबीब डांगे यांनी लेखी निवेदनाव्दारे मुख्याधिकाऱ्यांना मागणी केली आहे.



# वंचित बहिणींना लाभ मिळणार का?

## शासनाच्या निर्णयाकडे सगळ्यांचे लक्ष

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १९ जानेवारी-**

महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्त्वकांक्षी ठरलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेमुळे लाडक्या बहीणींनी महायुती सरकारला विधानसभा निवडणुकीत प्रचंड मोठी मतदानरुपी ताकद देत पुन्हा सत्तेत आणले. यात काही बहिणी लाभापासून वंचित आहेत. त्यांना लाभ मिळणार काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

कागदपत्रांअभावी अनेक लाडक्या बहिणी खरेतर या योजनेपासून वंचित आहेत. यामध्ये आधार कार्ड नसणे, बँकेत खाते नसणे, आधार कार्ड अपडेट नसणे, आधार कार्डला मोबाईल नंबर लिंक नसणे यासह अनेक कारणामुळे अनेक लाडक्या बहिणी या योजनेपासून वंचित आहेत. तसेच अनेक बहिणींनी फॉर्म भरून दिले. पण त्यांचा फॉर्म मंजूर झाला नाही. शासनाने नुकतेच निवडणुकीत १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याचे जाहीर केले आहे. तसेच हिवाळी अधिवेशनात लाडक्या बहिणींसाठी चौदा हजार कोटींची तरतूदही केली आहे. याचा लाभ अगोदर ज्या बहिणींनी घेतला आहे.

त्यांनाच होणार आहे. पण ज्या लाडक्या बहिणी या योजनेपासून वंचित आहेत, त्यांना शासन या योजनेत सहभागी करून घेणार की नाही असा सवाल वंचित असणाऱ्या बहिणी शासनाला विचारत आहेत.

## महत्त्वाचे

### नवीन बीएमडब्ल्यू एस १००० आरआर सादर



**नवी दिल्ली** : ऑटो एक्सपोमध्ये भारतात नवीन बीएमडब्ल्यू एस १००० आरआर सादर करण्यात आली. ही अत्यंत लोकप्रिय सुपर स्पोर्ट बाईक देशात कम्प्लिटली बिल्ट-अप युनिट म्हणून उपलब्ध असेल. बीएमडब्ल्यू मोटोर्राड डीलर नेटवर्कमध्ये बुकिंग्ज सुरू आहेत आणि डिलिव्हरी एप्रिलपासून सुरू होईल. बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाचे अध्यक्ष विक्रम पावाह म्हणाले, नवीन बीएमडब्ल्यू एस १००० आरआरने सुधारणा व यशासाठी अविरत प्रयत्न सुरू ठेवले आहेत, ज्यामुळे ती आघाडीच्या स्थानावर आहे. ही बाईक रोमांचपूर्ण राईडचा शोध घेणाऱ्या रेसिंग उत्साहींमध्ये लोकप्रिय आहे. ही बाईक २१,१०,००० रुपये या एक्स-शोरूम किमतीत उपलब्ध आहे. इन्वॉइसिंगच्या वेळी अस्तित्वात असलेली किंमत लागू होईल. ग्राहकांना त्यांच्या आवडीच्या बीएमडब्ल्यू मोटोर्राड मोटरसायकलसचे मालक बनण्याची सुविधा देण्यासाठी बीएमडब्ल्यू फायनान्शियल सर्व्हिसेस इंडिया स्थिर फायनान्शियल सोल्यूशन्स देईल.

### बसने तिघांना चिरडले; चालकाला अटक

**छ. संभाजीनगर** : महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यात रविवारी पहाटे राज्य परिवहन बसने तीन जणांना चिरडले. या प्रकरणी चालकाला अटक करण्यात आली आहे. बीड तालुक्यातील घोडका राजुरी गावाजवळ पोलिस भरतीसाठी प्रशिक्षण घेत असलेल्या तरुणांच्या गटाला सकाळी ६ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले. राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एमएसआरटीसी) बस बीडहून परभणीकडे जात असताना रस्त्याच्या कडेला प्रशिक्षण घेत असलेल्या तीन जणांना चिरडले. मृतांमध्ये सुबोध मोरे, विराट घोडके व ओम घोडके यांचा समावेश असून हे सर्व घोडका राजुरी गावातील रहिवासी होते. या तिघांचा जागीच मृत्यू झाला. त्यांचे मृतदेह पुढील औपचारिकतेसाठी बीडमधील जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. बसचालकाला अटक करण्यात आली आहे असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येत असल्याचेही अधिकाऱ्याने सांगितले.

### गंगा नदीत नौका उलटली; ३ जणांचा मृत्यू, ४ बेपत्ता

**कटिहार** : बिहारच्या कटिहार जिल्ह्यातील गंगा नदीत रविवारी नौका उलटून तीन जणांचा मृत्यू झाला, तर चार जण बेपत्ता झाले आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अमदाबाद परिसरातील गोलाघाटजवळ १७ जणांसह ही नौका उलटली. आतापर्यंत १० जणांना वाचवण्यात आले आहे. त्यापैकी बहुतेक जण पोहत किनाऱ्यावर पोहोचण्यात यशस्वी झाले आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. बेपत्ता झालेल्या चार जणांसाठी बचाव कार्य अजूनही सुरू आहे. घटनेचे कारण शोधण्यासाठी चौकशीचा आदेश देण्यात आला आहे, असे जिल्हा दंडाधिकारी मनेश कुमार मीणा यांनी वृत्तसंस्थेला सांगितले. मृत्यू झालेल्यांपैकी दोघांची ओळख पटली असून त्यांची नावे पवन कुमार व सुधीर मंडल अशी आहेत.

### 'त्या' कामगार छावणीत अनेक बांगलादेशींचे वास्तव्य : सोमय्या

**मुंबई** : अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या आरोपीला जेथून अटक करण्यात आली, त्या ठाण्यातील एका कामगार छावणीत वैध कागदपत्रे नसलेले अनेक बांगलादेशींचे वास्तव्य आहे, असा दावा भाजपाचे ज्येष्ठ नेते किरीट सोमय्या यांनी रविवारी केला. त्यांनी ठाणे पोलिस आयुक्तांना कावेसर कामगार छावणीत शोधमोहीम राबवण्याची विनंती केली. मी १२ कामगारांना भेटलो आणि त्यापैकी ९ बांगलादेशी मुस्लिम होते. ते पश्चिम बंगालमधील मालदा येथील आहेत, परंतु त्यांच्याकडे कोणतीही अधिकृत कागदपत्रे नाहीत, असे त्यांनी ट्विट केले. मुंबई पोलिसांनी रविवारी सांगितले की, त्यांनी १६ जानेवारी रोजी पहाटे सैफ अली खानच्या अपार्टमेंटमध्ये चोरीच्या प्रयत्नादरम्यान चाकूने वार केल्याच्या आरोपाखाली बांगलादेशी नागरिक शरीफुल इस्लाम शहजाद मोहम्मद रोहिल्ला अमीन फकीर याला अटक केली आहे.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अकोला | ३२.५ | १४.१ |
| अमरावती | ३०.४ | १५.१ |
| भंडारा | ३०.० | १४.४ |
| बुलडाणा | ३०.४ | १४.४ |
| चंद्रपूर | ३०.२ | -.- |
| गडचिरोली | ३०.० | १३.६ |
| गोंदिया | २९.४ | १२.० |
| नागपूर | २९.८ | १०.४ |
| वर्धा | ३०.८ | १२.४ |
| वाशीम | २९.८ | १८.६ |
| यवतमाळ | ३०.५ | १७.० |

# वाहन उद्योग जगात अव्वल होणार

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा विश्वास

◆ **नवी दिल्ली. १९ जानेवारी**

भारताचा वाहन उद्योग आगामी पाच वर्षांत जगात पहिल्या क्रमांकावर असेल. आतापर्यत या क्षेत्रातून ४.५ कोटी रोजगार निर्माण झाल्याची माहिती केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिली.



वाहन विक्रेत्यांची संघटना 'फाडा' या संस्थेच्या कार्यक्रमाला शनिवारी संबोधित करताना गडकरी म्हणाले, भारतीय वाहनांची मागणी जागतिक स्तरावर अधिक आहे. भारतीय वाहन उद्योगाचा आकार आता २२ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. मला विश्वास आहे की, पाच वर्षांत वाहन उद्योग जगात प्रथम क्रमांकावर येईल. सध्या अमेरिकेच्या वाहन उद्योगाचा आकार ७८ लाख कोटी आहे. चीन ४७ लाख कोटी आणि त्यानंतर तिसऱ्या स्थानी भारत आहे.

वाहन उद्योगाने आतापर्यंत ४.५ कोटी रोजगार निर्माण केले आहे, जे देशातील सर्वाधिक आहेत. वाहन उद्योग राज्य सरकार आणि भारत सरकारला जीएसटीच्या माध्यमातून इतर क्षेत्राच्या तुलनेत सर्वाधिक महसूल देत आहे. भारतात उत्पादित होणाऱ्या सर्व प्रकारच्या दुचाकी वाहनांपैकी ५० टक्के दुचाकी या निर्यात केल्या जातात. विदेशात भारतात निर्मिती होणाऱ्या वाहनांची मागणी वाढत असल्याचे गडकरी यांनी सांगितले. *(वृत्तसंस्था)*

# गोंदियात काँग्रेसला 'जोर का झटका'

## पटोलेंचे खंदे समर्थक नीलम हलमारे भाजपात



भाजपात प्रवेश घेणारे नीलम हलमारे व कार्यकर्त्यांचे स्वागत करताना आ. विनोद अग्रवाल

◆ **गोंदिया, १९ जानेवारी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला अपयश आले. विशेषतः प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा गृहजिल्हा असलेल्या भंडारा आणि गोंदियात केवळ एक जागा काँग्रेसला राखता आली. त्यानंतर जिल्ह्यातील काँग्रेसचे अनेक मोठे नेते पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चा झडत असताना, काँग्रेसला गोंदियात मोठा धक्का बसला आहे. नाना पटोले यांचे खंदे समर्थक नीलम हलमारे यांनी गोंदियाचे आमदार विनोद अग्रवाल यांच्या नेतृत्वात शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश केला.

छावा संग्राम परिषदेपासून हलमारे यांनी राजकारणाला सुरुवात केली. पक्ष सोडताना त्यांच्याकडे गोंदिया जिल्हा काँग्रेस महासचिवपदाची जबाबदारी होती. नीलम हलमारे यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश घेतला. येथील प्रीतम लॉनवर आमदार विनोद अग्रवाल यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

नाना पटोले यांच्यासोबत छावा संग्राम परिषदेपासून होतो. २० वर्षे त्यांच्यासोबत काम केले. मात्र, त्यांनी कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप हलमारे यांनी केला.

विशेष म्हणजे, यावेळी पटोले यांच्या छावा संग्रामच्या काळापासूनच्या सुमारे २५०-३०० तरुणांनी भाजपात प्रवेश केला. आमदार विनोद अग्रवाल यांनी पक्षाचा दुपट्टा घालून आणि पुष्पगुच्छ देऊन सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी आ. अग्रवाल यांनी सर्व कार्यकर्त्यांना पुढे नेण्यासाठी सदैव पाठीशी राहण्याची ग्वाही दिली. यावेळी फुलचूरच्या सरपंच मीलन रामटेककर, राजेश चतुर, दिनकर हलमारे, अशोक चन्ने, विक्की गोहरे, विजेंद्र बरोंडे, अनिल रहांगडाले, संजय मते, इर्शाद भाई, मुकेश लिल्हारे, देवेंद्र डोये, खुशाल नेवारे, सोनवणे महाराज यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व महिलांची उपस्थिती होती. *(तभा वृत्तसेवा)*

# भीषण आगीत गायीसह वासराचा कोळसा!

## आमगाव येथील दुर्घटना

◆ **गोंदिया, १९ जानेवारी**

आमगाव शहरातील तुकडोजी चौक येथील राधेश्याम कारंजेकर या शेतकऱ्याच्या घराजवळील गोठ्याला लागलेल्या भीषण आगीत एका गायीसह वासराचा जळून कोळसा झाला. या आगीत अन्य एक गाय गंभीररीत्या होरपळल्याची दुर्घटना १८ जानेवारी रोजी मध्यरात्री घडली.

शहराच्या मध्यभागी शेतकरी राधेश्याम कुरंजेकर यांचे घर आहे. शनिवारी मध्यरात्री गोठ्याला आग लागल्याचे शेजाऱ्यांना दिसले. गोठ्यात तणस असल्याने काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. त्यामुळे गोठ्यात बांधलेल्या दोन गायींपैकी एक गाय व वासरू जागीच ठार झाले. दुसरी गाय गंभीररीत्या होरपळली. नागरिकांनी



आगीत जळून राख झालेली तणस

आगीवर पाण्याचा मारा केला. परंतु, तोपर्यंत एका गायीसह वासराचा मृत्यू झाला होता.

घटना घडून गेल्यानंतर काही तासांनी अग्निशमन विभागाचे पथक दाखल झाले. या दुर्घटनेत राधेश्याम कारंजेकर यांचे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले असून, आमगाव पोलिसांनी नोंद केली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्याला शासनाने तत्काळ मदत करावी, अशी मागणी प्रा. सुभाष आकरे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक उत्तम नंदेश्वर व हुकूम बोहरे यांनी केली आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# रेल्वेच्या धडकेत वाघाचा मृत्यू

## बल्लारशाह-गोंदिया रेल्वे मार्गावर सिंदेवाहीजवळील घटना

◆ **नागभीड, १९ जानेवारी**

विदर्भातील वाघांच्या मृत्यूत चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाहीजवळ रविवारी झालेल्या घटनेची भर पडली. रेल्वेच्या धडकेत एका वाघाचा मृत्यू झाला आहे.

सिंदेवाही ते आलेवाही स्थानकादरम्यान रविवारी सकाळी रेल्वे रुळाजवळील झुडपात एक वाघ मृतावस्थेत आढळून आला. या मार्गावरून जाणाऱ्या रक्सौल एक्स्प्रेसची धडक बसल्याने या वाघाचा मृत्यू झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून, पुढील कार्यवाही केली. दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, बिलासपूर झोन अंतर्गत गोंदिया-नागभीड-चांदाफोर्ट-बल्लारशाह हा जास्तीत जास्त रेल्वे मार्ग जंगलव्यात आहे. त्यातही नागभीड-चांदाफोर्ट रेल्वे मार्ग घनदाट जंगलातून जात असून ताडोबा-



रेल्वेच्या धडकेत मृत्युमुखी पडलेला वाघ

अंधारी व्याघ्र प्रकल्प व घोडाझरी अभयारण्याला लागून आहे.

या रेल्वे मार्गावर अनेक ठिकाणी वाघ, हरीण, रानगवे, अस्वल यासारखे वन्यप्राणी अपघातात मृत्युमुखी पडले आहेत. त्यामुळे रेल्वे प्रशासनाकडून या मार्गावरील वन्यप्राण्यांच्या भ्रमंतीचे मार्ग शोधण्यासाठी सर्वेक्षण करण्यात आले होते. त्यानुसार काही ठिकाणी अंडरपास व बाजूला तार फेन्सिंग करण्यात यावे, असे सुचविले गेले असल्याची माहिती आहे. मात्र, रेल्वे प्रशासन व वन विभाग यांच्या समन्वयाअभावी या उपाययोजनांसंदर्भात अद्याप कोणताही तोडगा किंवा निर्णय होऊ शकलेला नाही. सोबतच या मार्गावरील अपेक्षित दुहेरीकरण रेल्वे मार्ग तयार करण्यासाठीचेही प्रयत्न झाले नाहीत. भविष्यात नागपूर-नागभीड ब्रॉडगेज रेल्वे मार्ग सुरू झाल्यानंतर बल्लारपूर मार्गासाठी या रेल्वे लाईनचा पर्यायी मार्ग म्हणून वापर होणार आहे. मात्र, राष्ट्रीय संपत्ती असलेल्या वन्यप्राण्यांच्या संरक्षणासाठी तातडीने उपाययोजना होणेही तेवढेच गरजेचे आहे, असे मत रेल्वे झोनचे झेडआरयुसीसी सदस्य संजय गजपुरे यांनी व्यक्त केले. *(तभा वृत्तसेवा)*

# गुरुकुलच्या ऱ्हासामुळे पर्यावरण धोक्यात : डॉ. राजेंद्रसिंग




मार्गदर्शन करताना डॉ. राजेंद्र सिंग. सोबत व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

◆ **हिंगणघाट, १९जानेवारी**

अतिशय प्राचीन सनातनी व्यवस्थेचा भाग असलेल्या गुरुकुल शिक्षण पद्धतीच्या ऱ्हासामुळे व मेकॅलोच्या शिक्षण पद्धतीचा अवलंब केल्याने आज पर्यावरणापुढे गंभीर संकट ठाकल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ व जलपुरुष डॉ. राजेंद्र सिंग यांनी केले.

वीज वितरण कंपनीच्या हेमंतवन या निसर्गरम्य परिसरात स्थानिक पर्यावरण संवर्धन संस्थेच्या वतीने रविवार १९ रोजी आयोजित विदर्भस्तरीय वृक्षसंमेलनाच्या उदघाट्नप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी पी. व्ही. टेक्स्टाईल्सचे महाप्रबंधक भूपेंद्र शहाणे तर व्यासपीठावर डॉ. उषाकिरण थुटे, गिरधर राठी, दिगंबर खांडरे यांची उपस्थिती होती.

डॉ. राजेंद्रसिंग म्हणाले, श्रद्धा, निष्ठा व भक्ती हेच भारतीयांचे जीवन आहे. परंतु, परकीयांच्या अंधानुकरणामुळे आम्ही परंपरागत जीवनपद्धतीचा त्याग केला. आज पर्यावरणाचे मोठे संकट जगासमोर निर्माण झाले आहे.

पर्यावरणाच्या हानीमुळे जग गंभीर संकटांना सामोरे जात असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. यावेळी भूपेंद्र शहाणे, उषाकिरण थुटे, गिरधर राठी यांनीही पर्यरणाबाबत चिंता व्यक्त केली. प्रथम सत्राचे सूत्रसंचालन अभिजित डाखोरे यांनी केले. सकाळी ८ वाजता ज्ञानदा या वसतिगृहावरून हेमंत वणा नदीपर्यंत वृक्षदिंडी काढण्यात आली. *(तभा वृत्तसेवा)*

# नक्षलप्रभावित भागांत सीआरपीएफकडून आरोग्य शिबिर

## रक्ताच्या नमुन्यांचा अहवाल गृहमंत्रालयाला पाठविणार

◆ **रायपूर, १९ जानेवारी**

छत्तीसगडच्या नक्षलप्रभावित भागांत सीआरपीएफ जवानांच्या पथकांकडून आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात येत आहेत. यातून आदिवासींच्या रक्ताचे नमुने घेऊन त्यांची तपासणी करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांचा विश्वास संपादन करण्यासह त्यांच्यातील आजाराची माहिती जाणून घेणे हा या मागचा उद्देश आहे.

राज्यातील सुकमा, बिजापूर, बस्तर आणि गरियाबंद जिल्ह्यातील दुर्गम भागात आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली जात आहेत. यात सीआरपीएफ पथकातील डॉक्टर आणि पॅरामेडिक्सच्या दोन पथकांचा समावेश आहे. सीआरपीएफच्या एका अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेला माहिती देताना सांगितले की, नक्षलप्रभावित भागांत सीआरपीएफचे ४० तळ असून, तेथे रक्त तपासणी शिबिर आयोजित करण्यात येत आहे. नागरिकांमधील आजाराची माहिती घेण्यासाठी रक्त तपासणी केली जात आहे.

या भागात तैनात असलेल्या प्रत्येक पथकाला ३० ते ४० स्थानिक नागरिकांच्या रक्ताचे नमुने घेण्याचे निर्देश देण्यात आले. नागरिकांच्या रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणे आणि त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात येत आहे. रक्ताच्या नमुन्यांचा अहवाल केंद्रीय गृहमंत्रालय आणि राज्य सरकारला देण्यात येणार आहे. *(वृत्तसंस्था)*

### मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद हद्दपार

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राज्याची राजधानी रायपूर येथे नक्षलप्रभावित भागाचा आढावा घेण्यासाठी बैठक घेतली होती. यावेळी त्यांनी मार्च २०२६ पर्यत देशातून नक्षलवाद संपुष्टात येणार असल्याची घोषणा केली होती. त्यासाठी या भागात विविध अभियान राबविण्यासह नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सीआरपीएफ व स्थानिक पोलिसांच्या वतीने वैद्यकीय तपासणीची विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

# ...अन् बिबट्याला केले जेरबंद

## कालव्याच्या पायलीत केले तिघांना जखमी

◆ **पवनी, १९ जानेवारी**

भंडारा जिल्ह्यातील अड्याळ वनपरिक्षेत्रांतर्गत केसलवाडा नियत क्षेत्रातील मौजा आसगाव येथील गोसे खुर्द प्रकल्पाच्या कालव्याच्या सायफन विहिरीच्या पायलीत ठाण मांडून असलेल्या बिबट्याने तीन जणांवर हल्ला करून त्यांना जखमी केले. दरम्यान, वन विभागाने बिबट्याला पकडून जंगलात सोडून दिले.

कालव्याच्या पायलीत बिबट असल्याचे गावकऱ्यांना माहीत झाल्यानंतर काही गावकऱ्यांनी त्याला हुसकावून लावण्याचा प्रयत्न केला. यावेळी बिबट्याने हल्ला करीत तीन जणांना जखमी केले. दरम्यान, वनाधिकारी, वन कर्मचारी, भंडारा येथील वन्यजीव बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. यावेळी तेथे ५०० ते ६०० लोकांचा जमाव होता. आधी गर्दी बाजूला करण्यात आली. त्यानंतर पायलीची एक बाजू प्लॉयवूड लावून बंद करण्यात आली व दुसऱ्या बाजूने पिंजरा ठेवण्यात आला. या पिंजऱ्यात बिबट शिरताच त्याला बंद करण्यात आले. जेरबंद केलेला बिबट मादी असून १२ ते १५ महिने वयाची असल्याचे समजते. दरम्यान, या बंद करण्यात आलेल्या बिबटाला नंतर भावखिडकीच्या जंगलात सोडण्यात आले.

ही कारवाई उपवनसंरक्षक राहुल गवई, सहायक वनसंरक्षक सचिन निलख यांच्या मार्गदर्शनात वनपरिक्षेत्राधिकारी विवेक येवतकर व सहकाऱ्यांनी पार पाडली. यावेळी मानद वन्यजीव रक्षक पंकज देशमुख, नामदेव मेश्राम, हरीश मुंडले यांच्यासह पवनी, लाखांदूर वनपरिक्षेत्रातील वनकर्मचारी होते. *(तभा वृत्तसेवा)*

# महिला मतदारांना आकर्षित करण्याची आप, काँग्रेस, भाजपात चढाओढ

**श्यामकांत जहागीरदार**

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आप, भाजपा आणि काँग्रेस या तिन्ही प्रमुख पक्षांचा जोर महिला मतदारांना आपल्याकडे ओढण्याचा आहे. या पक्षांच्या जाहीरनाम्यात महिलांवर आश्वासनांचा वर्षाव करण्यात आला.

मध्यप्रदेशातील निवडणूक भाजपाने 'लाडली बहना' योजनेच्या आधारावर जिंकली होती, नंतर महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीतही याच योजनेच्या धर्तीवर भाजपाने महिलांना दरमहा १५०० रुपये देणाऱ्या महिला सन्मान योजनेची घोषणा केली. भाजपाने नुसती घोषणाच केली नाही, तर योजनेची प्रभावी अंमलबजावणीही केली. विधानसभा निवडणुकीच्या मतदानाच्या आधी महिलांच्या खात्यात १५०० रुपयांचे दोन-तीन हप्तेही जमा झाले. सत्तेत आल्यानंतर ही राशी २१०० रुपये करण्याचे आश्वासनही भाजपाने दिले. महाराष्ट्रातील भाजपाच्या विजयात महिला सन्मान योजनेचा सिंहाचा वाटा होता.

दिल्ली विधानसभा निवडणूक




महिला सन्मान योजनेने सर्वच राजकीय पक्षांना निवडणुकीतील विजयाची गुरूकिल्ली सापडली. दिल्लीत आपने महिलांना ११०० रुपये देण्याची घोषणा केली होती. सत्तेत आल्यानंतर ही राशी २१०० रुपये करण्याचे आश्वासनही दिले होते. महिलांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेले गॅस सिलेंडर ☐५०० रुपयांत देण्याचे आश्वासनही आपने दिले. महिला सन्मान योजनेसाठी आपने महिलांकडून अर्जही भरून घ्यायला सुरुवात केली, पण केजरीवालांच्या नेतृत्वातील सरकारनेच वृत्तपत्रात जाहिराती देत केजरीवालांची ही योजना हाणून पाडली. केजरीवालांसाठी महत्त्वाच्या या योजनेचा गर्भपात करुन टाकला.

केजरीवालांच्या योजनेला शह देण्यासाठी काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यातून महिलांना दरमहा २५०० रुपये देण्याचे आश्वासन दिले. गॅस सिलेंडर ५०० रुपयांत तसेच महिलांना रेशनकिट देण्याचे आश्वासनही काँग्रेसच्या घोषणापत्रात आहे.

भाजपाच्या संकल्पपत्रात मात्र आप आणि काँग्रेसच्या तुलनेत महिलांना झुकते माप देण्यात आले. भाजपाने महिलांना दरमहा २५०० रुपये देण्यासोबत गर्भवती महिलांना २१ हजार रुपये तसेच पोषण आहाराच्या ६ किट देण्याचे आश्वासन दिले. याशिवाय ५०० रुपयांत गॅस सिलेंडर आणि दिवाळी आणि होळीला प्रत्येकी एक सिलेंडर मोफत देण्याचे आश्वासन दिले.

# सर्व मोफत योजना कायम ठेवण्याची भाजपाची ग्वाही

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

दिल्लीतील आप सरकार सध्या देत असलेल्या सर्व मोफत योजना कायम ठेवण्याचे आश्वासन भाजपाने दिले आहे. केजरीवाल २०० युनिटपर्यंत वीज मोफत देत असून, दिल्लीच्या जनतेला पाणीही मोफत मिळत आहे. महिलांना बसप्रवास मोफत आहे. भाजपाने या तीनही योजना कायम ठेवण्याचे आश्वासन दिले. काँग्रेसने २०० ऐवजी ३०० युनिट वीज मोफत देण्याचे वाढीव आश्वासन दिले.

दिल्लीतील जनतेसाठी आपने संजीवनी योजनेची घोषणा केली. ६० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना खाजगी आणि सरकारी रुग्णालयात मोफत उपचाराचे आश्वासन आपने दिले आहे. केंद्राच्या आयुष्मान योजनेला शह देणारी ही योजना आहे. दिल्लीत केजरीवाल सरकारने आयुष्मान योजना लागू होऊ दिली नाही. भाजपाने दिल्लीत सत्तेवर आल्यानंतर केंद्राची ५ लाखाच्या उपचारापर्यंतची आयुष्मान योजना लागू करण्याचे आश्वासन दिले. याशिवाय दिल्लीत भाजपाची सत्ता आल्यानंतर सरकार आणखी ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करून देईल, असे भाजपाने म्हटले. म्हणजे भाजपा सत्तेत आल्यानंतर दिल्लीच्या जनतेला १० लाखापर्यंत मोफत उपचाराची सुविधा मिळू शकेल.

काँग्रेसने मात्र आप आणि भाजपा या दोन्ही पक्षांना मागे टाकत २५ लाख रुपयांचा आरोग्यविमा देण्याची घोषणा केली. हा आरोग्य विमा कुटुंबासाठी आहे की प्रत्येक व्यक्तीसाठी ते स्पष्ट झाले नाही. त्यामुळे दिल्लीची जनता विशेषतः महिला मतदार कोणाच्या गळ्यात मतमाळा टाकणार, याकडे लक्ष लागणे स्वाभाविक आहे. *(तभा वृत्तसेवा)*

# कंगनाच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाने मोडला रेकॉर्ड

◆ **नवी दिल्ली, १९ जानेवारी**

खासदार व अभिनेत्री कंगना राणावतच्या 'इमर्जन्सी' चित्रपटाने दोन दिवसांत ७.३९ कोटींची कमाई केली. गेल्या ५ वर्षांत रिलीज झालेल्या सर्व चित्रपटांचे रेकॉर्ड त्याने मोडले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची भूमिका कंगनाने साकारली असून, हा राजकीय घडामोडींवर आधारित चित्रपट आहे.

हा चित्रपट १७ जानेवारीला प्रदर्शित झाला. पहिल्याच दिवशी ३.११ कोटी रुपयांची कमाई चित्रपटाने केली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी चित्रपटाच्या कमाईत ३९ टक्क्यांनी वाढ झाली. इंदिरा गांधी यांनी देशात घोषित केलेल्या आणिबाणीच्या २१ महिन्यांवर आधारित हा चित्रपट आहे. शीख समुदायाने आक्षेप घेतल्यामुळे पंजाब वगळता हा चित्रपट देशभरात प्रदर्शित झाला. मुंबईतील जुहू येथील एका चित्रपटगृहात चित्रपटाच्या प्रदर्शनावेळी आध्यात्मिक गुरू सद्गुरू यांची उपस्थिती होती. *(वृत्तसंस्था)*

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## बांधकाम कामगारांच्या प्रश्नांसाठी बुधवारपासून आमरण उपोषण

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ जानेवारी-
बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या विविध मागण्यांकडे लक्ष वधण्यासाठी महाराष्ट्र राज्य बांधकाम कामगार न्याय व हक्क संघर्ष समि तीच्या वतीने बुधवार, २२ जानेवारी २०२५ पासून सोलापुरातील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येणार आहे, अशा आशयाचे निवेदन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, बांधकाम मंत्री, कामगार मंत्री, कामगार आयुक्त, अप्पर कामगार आयुक्त यांच्याकडे देण्यात आले, असे समितीचे अध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी सांगितले.

कामगारांना नोंदणी करणे सुलभ होणेकामी उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर यांसह तीनही कार्यालये एकाच ठिकाणी करावीत. टोकनच्या नावाखाली आर्थिक लुबाडणूक करणाऱ्या सुविधा केंद्रचालकांवर कारवाई करण्यात यावी. भांडी वाटपच्या अनुषंगाने कामगार आयुक्त कार्यालयमार्पत टोकन दिले जावे, असेही या



निवेदनात म्हटले आहे. याप्रसंगी गणेश बोड्डू, सुहेल शेख, वैशाली बनसोडे, रेखा आडकी, अंगद जाधव यांच्यासह बांधकाम कामगार उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...

### माजी महापौर महेश कोठे यांना श्रद्धांजलीपर बुधवारी शोकसभा

सोलापूर, दि. १९ जानेवारी-
माजी महापौर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे ज्येष्ठ नेते महेश विष्णुपंत कोठे यांचे मंगळवार, १४ जानेवारी रोजी प्रयागराज येथे निधन झाले. बुधवार, १५ जानेवारी रोजी त्यांच्या पार्थिवावर सोलापुरातील पुणे नाका येथील स्म शानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी बुधवार, २२ जानेवारी रोजी सायंकाळी ५ वाजता जुना विडी घरकुल येथील संभाजीराव शिंदे प्रशाला येथे शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. विडी घरकुलचे भाग्यविधाते म्हणून कै. महेश कोठे हे ओळखले जायचे. त्यांनी सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ आणि सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघातून प्रत्येकी दोनवेळा असे एकूण चारवेळा विधानसभेची निवडणूक लढविली होती. सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदार संघातून एकदा काँग्रेस तर एकदा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट आणि सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघातून एकदा शिवसेना तर एकदा अपक्ष म्हणून रिंगणात उतरले होते.

### अज्ञात चोरट्याने पळवली रिक्षा

सोलापूर, दि. १९ जानेवारी-
मल्लिकार्जुन नगर येथे पार्क केलेली रिक्षा क्रमांक एमएच.१३.एएफ.२७७७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १८ जानेवारी रोजी घडली.याप्रकरणी अंबादास भगवान गवंडी (वय-५८,रा.मल्लिकार्जुन नगर,अक्कलकोट रोड) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत.

### हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी पळवली

सोलापूर, दि. १९ जानेवारी-
हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीसी.२३६९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १७ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसहा ते साडेसात वाजण्याच्या दरम्यान मराठा वस्ती येथे घडली.याप्रकरणी आदर्श चंद्रकांत बंडगर (वय-२४,रा. मराठा वस्ती,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शिवशरण हे करीत आहेत.

### किरकोळ कारणावरून दमदाटी करत मारहाण

सोलापूर, दि. १९ जानेवारी-
किरकोळ कारणावरून एकास शिवीगाळ करत दमदाटी करून मारहाण केल्याप्रकरणी एका जनाविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १८ जानेवारी रोजी रात्री साडेसात वाजण्याच्या सुमारास मंगळवार बाजार येथे घडली.याप्रकरणी गुरुदेवी काशिनाथ काळे (वय-३२,रा.मुकुंद नगर,न्यू बुधवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सागर दत्तात्रय वडतिले (रा.मराठा वस्ती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी काम करत असलेल्या रवी चायनीज दुकानात येऊन फिर्यादीच्या ओळखीच्या लोकांनी मी फुकट चायनीज खाऊन बिल न देता निघून जातो असे का सांगितले म्हणून फिर्यादी यांच्या मालकाच्या अंगावर येऊन त्यांना हाताने मारहाण करत शिवीगाळ करून दमदाटी केली आहे.असे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल रुपनर हे करीत आहेत.


### दुचाकीच्या धडकेत दोघे जखमी

सोलापूर, दि. १९ जानेवारी-
दुचाकीच्या धडकेत दोन जण जखमी झाल्याची घटना १७ जानेवारी रोजी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास पोटफाडी चौक येथील बीजेपी कार्यालयासमोर घडली.याप्रकरणी विनायक सुरेश कस्पावाले (वय-२३,रा.महाराणा प्रताप,झोपडपट्टी,कुमठा नाका) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दुचाकी क्रमांक एमएच.१३. ईआर.७३२६ या क्रमांकाच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी व त्याचा मित्र गणेश असे दोघे जण होम मैदान येथून गड्डा यात्रा पाण्याकरिता जात असताना वरील ठिकाणी आले असता, वरील दुचाकी क्रमांकाच्या चालकाने भरधाव वेगाने दुचाकी चालवून फिर्यादी यांच्या दोन्ही पायास गंभीर दुखापत केली. व फिर्यादी यांच्या मित्राच्या पायास किरकोळ जखम झाली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल इनामदार हे करीत आहेत.

# १०२ ग्रामपंचायतींमध्ये १३९ सदस्यांच्या जागा रिक्त

### निवडणूक शाखेने झेडपीकडून मागविला अहवाल

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ जानेवारी-
सोलापूर जिल्ह्यातील १०२ ग्रामपंचायतींमध्ये १३९ ग्रामपंचायत सदस्यांच्या जागा रिक्त आहेत. यासंदर्भात निवडणूक शाखेने 'झेडपी'कडून सविस्तर अहवाल मागविला आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील एक सरपंचपद रिक्त असून याची निवड थेट जनतेतून होणार आहेत. रिक्त असणाऱ्या सरपंच आणि सदस्यांच्या जागेसाठी पोटनिवडणूक घेण्याच्या दृष्टीने प्रशासनाकडून तयारी सुरु आहे.



दरम्यान, ग्रामपंचायत सदस्यांच्या १३९ रिक्त जागांपैकी १६ जागा या अनुसूचित जाती, २४ जागा अनुसूचित जमाती, २४ जागा

> सोलापूर जिल्ह्यातील १ हजार २४ ग्राम पंचायतींपैकी १०२ ग्रामपंचायतमधील १३९ ग्रामपंचायत सदस्यांची पदसंख्या रिक्त आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील एका सरपंचाची थेट जनतेतून निवड करण्यासाठी पोटनिवडणूक होणार आहे. यासाठी ग्रामपंचायत निवडणूक शाखा जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडून रिक्त पदाची माहिती मागविण्यात आली आहे.
>
> - इशाधिन शेळकंदे,
> उपमुख्यकार्यकारी अधिकारी,
> ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर

मागासवर्गीय प्रवर्ग तर ७४ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव आहेत. या १३९ ग्रामपंचायत सदस्यांबरोबरच दक्षिण सोलापूर तालुक्यातील एका सरपंचाची निवडणूक होणार आहे. रिक्त असणाऱ्या जागांसंदर्भात माहिती मागविले असली तरी ही पोटनिवडणूक केव्हा होणार? हे अद्याप स्पष्ट नाही. आता पुढील निर्णयाकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

#### तालुकानिहाय रिक्त ग्रामपंचायत सदस्य संख्या

अक्कलकोट-१६, बार्शी-१७, करमाळा-११, माढा-२१, माळशिरस-०६, मंगळवेढा-०४, मोहोळ-११, पंढरपूर-१७, सांगोला-१३, दक्षिण सोलापूर-२२, उत्तर सोलापूर-०१. एकूण-१३९.

## सोलापुरातील दहा विडी कारखाने काढण्यात आली अवसायानात

### जिल्हा उपनिबंधक कार्यालयाने दाखविला कायद्याचा बडगा

### प्रियदर्शनी, सोनिया, प्रणितीताई अशा नावाने होते कारखाने

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ जानेवारी-
सोलापुरातील दहा विडी कारखाने अवसायानात काढण्यात आली. त्यामुळे कष्टकरी महिला विडी कामगारांसमोर रोजीरोटीचा प्रश्न आवासून उभा आहे. सोलापूर शहर उपनिबंधक कार्यालयाने संबंधित कारखान्यांना कायदयाचा बडगा दाखवत ही कारवाई केली. विशेष म्हणजे प्रियदर्शनी, सोनिया, प्रणितीताई यांसारख्या राजकीय मंडळींच्या नावाने ही कारखाने सुरु करण्यात आली होती. दरम्यान, अवसायानात निघालेल्या या कारखान्यांकडील कामगारांची मजुरी व इतर रक्कम देणे बाकी आहे.

सहकार तत्वावर सुरु करण्यात आलेल्या श्री प्रियदर्शनी विडी उत्पादक संस्था, सोनिया विडी उत्पादक संस्था, प्रणितीताई विडी उत्पादक संस्था, पद्मावती विडी उत्पादक संस्था, श्री बालाजी विडी उत्पादक संस्था, श्री स्वामी समर्थ विडी उत्पादक संस्था, ओम भवानी विडी उत्पादक संस्था, श्री सिध्देश्वर विडी उत्पादक संस्था, शंकर विडी उत्पादक संस्था, पी.जी. विडी उत्पादक संस्था अशा एकूण दहा विडी कारखाने अवसायानात काढण्यात आली.

अवसायानात निघालेल्या श्री प्रियदर्शनी, सोनिया, प्रणितीताई, पद्मावती, श्री बालाजी, श्री स्वामी समर्थ, ओम भवानी, श्री सिध्देश्वर, शंकर, पी. जी. या दहा कारखान्यांकडील विडी कामगार महिलांची थकीत मजुरीसह भविष्य निर्वाह निधी, हक्क रजा आणि इतर देणी काम गारांना लवकरात लवकर देण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र कामगार सेनेने विष्णू कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली शहर उपनिबंधककार्यालयकडे निवेदनाद्वारे केली.

यावेळी रेखा आडकी, राधिका मिठ्ठा, लक्ष्मीबाई इप्पा, सविता दासरी, माधवी गौडा, पद्मा सामल, अनिता सुंचू, गस्नाथ कोळी आदी उपस्थित होते.



## तापमानावर एनटीपीसीचा परिणाम नाही

### विकास मंच सदस्यांचा प्रकल्प भेटीनंतर दावा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ जानेवारी-
एनटीपीसी प्रकल्पामध्ये अत्याधुनिक आणि जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या चिम णीमधून प्राणघातक रसायन हवेत सोडले जात नाही; फक्त पाण्याची वाफ बाहेर पडतो. यामुळे सोलापूरच्या पर्यावरणीय तापमानावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही; असा दावा सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी एनटीपीसी सोलापूर प्रकल्पाला भेट दिल्यानंतर केला आहे.

याबाबत दिलेल्या माहितीमध्ये मंच सदस्यांनी नमूद केले आहे की, एन.टी. पी.सी. सोलापूर प्रकल्पातून तयार होणारी वीज पाच राज्यांत पॉवर ग्रीडच्या माध्यमातून वितरीत होते; ज्याचा अर्धा वाटा महाराष्ट्र राज्य आणि अर्धा इतर राज्यांना पुरवठा होतो. एनटीपीसी सोलापूर प्रकल्प राष्ट्रीय धरोहर असून, महत्त्वाचा वीज निर्मिती प्रकल्प आहे जो स्थानिक समुदायांना ऊर्जा पुरवतो. या प्रकल्पाने पर्यावरण संवर्धनाच्या वचनबद्धतेनुसार दरवर्षी ५०,००० झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. आजपर्यंत पाच लाखांहून अधिक झाडे लावली गेली असून त्यातील ८० टक्के झाडे जगली आहेत, हा उल्लेखनीय यशाचा दाखला आहे.

दौऱ्यादरम्यान एनटीपीसी सोलापूर प्रकल्पाचे मुख्य महाव्यवस्थापक तपन कुमार बंडोपाध्याय, नवीन कुमार अरोडा (महाप्रबंधक अनुरक्षण), बिपुल कुमार मुखोपाध्याय (महाप्रबंधक, ऑपरेशन्स), मनोरंजन सारंगी (महाप्रबंधक एचआर), कविता गोयल (डीजीएम एचआर), विजयकुमार कोनापेड्डी (एचआर) आणि लबीब अख्तर (एचआर) यासह विभाग प्रमुखांनी सदस्यांचे स्वागत केले. सोलापूर विकास मंचच्या केतन शहा, विजय कुंदन जाधव, मनोज क्षीरसागर, अमृता अकलुजकर, महेश हणमे, प्रशांत भोसले, अक्षय फडके, प्रसन्न नझारे, राहुल होनकळस, अॅड. दत्तात्रय अंबुरे आदी सदस्यांची उपस्थिती होती. सोलापूर विकास मंचाच्या या दौऱ्यामुळे औद्योगिक क्षेत्रात सोलापूरच्या तरुणांना नवीन प्रेरणा मिळण्यास मदत होईल, अशी आशा आहे.

> **विमानतळाला अडचण नाही**
>
> प्रकल्पाच्या चिमणीबाबत सोलापूर विमानतळाच्या विकासासाठी कोणतीही अडचण नाही, कारण सर्व परवानग्या डीजीसीए व एएआयकडून घेतल्या असल्याची माहिती प्राप्त झाली. सोलापूर विकास मंचने या औद्योगिक दौऱ्यादरम्यान एनटीपीसीच्या कार्यपद्धतीबाबत सखोल माहिती मिळवली, टर्बाईन आणि नियंत्रण कक्षाची पाहणी देखील मंचच्या सदस्यांनी केली. या दौऱ्याचे आयोजन तरुणाईला प्रेरणा आणि सोलापूरकरांच्या मनातील शंकांचे निरसन करण्यासाठी आले होते. मंचाने यापूर्वीही प्रिसिजन कॅमशाफ्ट लिमि टेडला भेट दिली असून, भविष्यातही विविध उद्योगांना भेटी देऊन त्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला जाणार आहे.

## लघु पाटबंधारे अंतर्गत १८६ कामे प्रगतीपथावर

### जलयुक्त शिवार योजनेचा शेतकऱ्यांना होतोय फायदा

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१९ जानेवारी-
जलयुक्त शिवार योजने अंतर्गत सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेने केलेल्या २९ जलयुक्त शिवार योजनेच्या कामामुळे जवळपास ७३ हेक्टर जमिन सिंचनाखाली आली आहे. या जलयुक्त शिवारच्या कामामुळे जवळपास २८९ सहस्त्र घनमीटर पाणी साठा झाला असून यामुळे शेतकऱ्यांच्या सिंचन विहीरीला फायदा झाला आहे.

सोलापूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या जलयुक्त शिवार योजने अंतर्गत २०२ कामे मंजूर झाले आहेत. त्यापैकी १८६ कामे निविदा प्रक्रियेमध्ये आहेत. तर १६ कामे बाकी राहिले असून, २९ कामे पूर्ण झाले आहेत. सध्या गतवर्षी झालेल्या पावसामुळे अनेक तलावात पाणी साठा असून हा पाणी साठा कमी झाल्यानंतर उर्वरीत कामे होणार आहेत. या जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत पाझर तलाव दुरुस्ती, नाला खोलीकरण, सिमेंट बंधारे दुरुस्ती आदी कामे केली जात आहेत. जिल्ह्यातील अनेक गावातील जुने सिमेंट बंधारे फारसे पाणी साठवण करू शकत नव्हते. मात्र जलयुक्त शिवार योजनेमुळे झालेल्या तलाव दुरुस्तीच्या कामामुळे पाणी साठा वाढला आहे.

या वाढलेल्या पाणी साठ्याचा फायदा त्या गावातील विहीर आणि बोअरला झाला आहे. त्यामुळे उर्वरीत जलयुक्त शिवार योजनेचे काम पूर्ण झाल्यानंतर आणखी पाणी साठा वाढण्यास मदत होणार आहे.

> जलयुक्त शिवार योजनेमुळे ज्या गावात कामे झाले आहेत त्या गावातील पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. यामुळे तेथील विर्धन विहिर, बोअरला फायदा झाला आहे. उर्वरीत कामेही प्रगतीपथावर असून तेही कामे झाल्यानंतर पाण्याची पातळी आणखी वाढू शकते.
>
> -संजय पारसे,
> कार्यकारी अभियंता

## उत्तर तालुक्याचे प्रश्न मार्गी लावण्याची आ. खरेंकडे मागणी

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि. १९ जानेवारी-
मार्डी-नान्नज रस्त्याचे काम मंजूर आहे पण वन खात्याने हस्तक्षेप केल्यामुळे ते होऊ शकत नाही. मार्डी गावाला २४ तास वीज मिळण्यासाठी भगिरथ योजनेचे काम सुरु झाले मात्र त्याठी वन खात्याचा अडसर असल्यामुळे काम थांबले आहे. या दोन्ही कामांसह उत्तर सोलापूर तालुक्यातील रखडलेले विकासाचे प्रश्न सोडविण्याची मागणी उत्तर सोलापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) चे तालुका अध्यक्ष प्रल्हाद काशिद यांनी आमदार राजू खरे यांच्याकडे मांडली. दरम्यान, यामुळे आमदार खरे यांनी बुधवारी तालुका प्रश्नांवर सर्व विभाग प्रमुखांची आढावा बैठक बोलावली आहे.

मार्डीसह उत्तर सोलापूर तालुक्यातील बहुतांशी गावांमध्ये गेली कित्येक वर्षांपासून रानडुकरांचा सुळसुळाट आहे. शेतातील उभे पिके उद्ध्वस्त होत आहेत. त्यामुळे तालुक्यातील रानडुकरांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी सुनील मुडके यांच्यासह शेतक-यांनी केली. तर बिबीदारफळ येथे ट्रान्सफार्मर द्यावेत, अशी मागणी स्वप्नील कदम यांनी केली.




विधानसभा निवडणुकीनंतर प्रथमच आ. खरे हे तालुका अध्यक्ष प्रल्हाद काशिद यांचाकडे सदिच्छ भेट देण्यासाठी आले होते. त्यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे, ज्येष्ठ नेते विठ्ठलभाऊ काशिद, शिवसेना तालुका प्रमुख संजय पौळ, वडाळा गावचे सरपंच जितेंद्र साठे,गावडी दारफळचे सरपंच भारत माळी,नागेश पवार, जितेंद्र शिलवंत, शशिकांत मार्तंडे, संभाजी पाटील, प्रशांत काशिद, मनोज साठे, दिपक अंधारे, भाऊ लामकाने, रतिकांत पाटील, दत्तात्रय पवार, ऋषि वानकर, राजेंद्र हिप्परगी, रमेश सुतार, बालाजी गरड, विनोद पांढरे, सुभाष शिंदे उपस्थित होते. तालुका अध्यक्ष काशिद यावेळी म्हणाले, जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते काका साठे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ तालुक्यासह उत्तर सोलापूर तालुक्यातील २४ गावांनी आ. खरे यांना विजयी करण्यासाठी चांगली साथ दिली. आता पाच वर्षे तालुक्यातील विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही आ. खरे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करू. तालुक्यातील विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी आढावा बैठक घेणे गरजेचे असल्याचे नमूद करताच लगेच आ. खरे यांनी बुधवारी पुणे येथील नियोजित दौरा रद्द करून सर्व विभागाच्या अधिका- यांची आढावा बैठक आयोजित करण्याचे निश्चित केले.

## सुवर्ण झळाळी ८० तर चांदीची चकाकी ९४ हजारांवर

### भविष्यात सोन्या-चांदीचे दर आणखी वाढण्याचे चिन्ह

तभा वृत्तसेवा,
सोलापूर, दि.१९ जानेवारी-
सोन्याहून पिवळे काय हा प्रश्न सर्वांना पडतो? म्हणूनच सोने सोनेचे ठरते. त्याचे मूल्य अबाधित राहते. असा प्रत्येय सध्या दिसून येत आहे. सोलापूर बाजारपेठेत सोन्याच्या दरात दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे दिसत आहे. भविष्यात सोन्याचे दर आणखीन वाढतील असा अंदाज देखील आता व्यापारी वर्गातून वर्तवला जात आहे. त्यामुळे आत्ताच सोने खरेदीसाठी ग्राहकांची कल सराफ बाजारात दिसत असल्याचे ट्रेंड आहे.

दरम्यान, गत डिसेंबर महिन्यात सोन्याचे दर हे ७५ ते ७६ हजार रुपये प्रति तोळा (१० ग्रॅम ) इतके स्थिर होते. मात्र नव्या वर्षात सोन्याचे दर वाढलेले आहेत. सध्या सोन्याचा दर हा ७९ हजार ८०० वर आला आहे. भविष्यातील लग्नसराई लक्षात घेता सोने खरेदीकडे आत्तापासूनच ग्राहकांचा कल वाढत आहे. सोने महाग होण्यापूर्वी आत्ताच खरेदी केलेले बरे, असा ट्रेंड सध्या सोलापूर सराफ बाजारपेठेत दिसत आहे. यापूर्वी सोने खरेदीसाठी ग्राहकांना साडेतीन शुभ मुहूर्त यांची वाट पहावी लागत असे. मात्र सध्याच्या घडीला सोने खरेदीसाठी कोणताही



मुहूर्त बघितला न जाता, सोने खरेदी केली जात आहे. जेव्हा केव्हा सोन्याचे दर कमी होतील तेव्हा ग्राहक गुंतवणूक म्हणून सोने खरेदीसाठी प्राधान्यक्रम देत आहेत. सध्या २४ आणि २२ कॅरेट सोने खरेदीसाठी ग्राहकांचा पुढाकार दिसून येत आहे. त्याच पद्धतीने, आकर्षक नक्षीदार दागिने खरेदी करण्यासाठी महिलांचा ओढा दिसत आहे.

> **सोने खरेदीकडे कल**
>
> सोन्याच्या दरामध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. मागील वर्षी ७५ हजार सोन्याचा दर आज चार हजाराने वाढवून ७९ हजार ५०० रुपये प्रति तोळा इतका झाला आहे. त्यामुळे यापूर्वीच सोने खरेदी करून ठेवले आहे. सोन्याची गुंतवणूक ही सुरक्षित गुंतवणूक मानली जात आहे.
>
> -शांता तरडे, ग्राहक

> **सोन्याचे दर आणखी वाढण्याची शक्यता**
>
> आंतरराष्ट्रीय स्तरावरील बाजारपेठेत सोन्याची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. युद्धजन्य परिस्थिती व शेअर मार्केटमध्ये देखील अस्थिरता कायम आहे. त्यामुळे सोन्याकडे सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहिले जाते. यासाठी सोन्याला प्राधान्यक्रम दिल्याने सोन्याच्या दरात वाढ होत आहे. तसेच भविष्यातील लग्नसराई पाहता सोन्याच्या दरात आणखीन वाढ होईल अशी शक्यता आहे. सद्य परिस्थितीत सोन्याचे दर २४ कॅरेट - ७९,८०० , २२ कॅरेट - ७३,५३० आणि २० कॅरेट - ६८,३७० प्रती तोळा तर चांदी - ९३,८०० रुपये प्रति किलो इतकी विक्री केली जाते आहे.
>
> - अविनाश पंडित,
> सराफ व्यापारी

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १००८

**परि आतां ऐसी चाड जीवीं । जे तुजसीं गोठी करावी ।**
**जवळीक हे भोगावी । अलिंगावयासी ।।**

भगवंतांनी अर्जुनाला विश्वरुप दाखवून स्वत:चा खरा परिचय करुन दिला. आजपर्यंत भगवंताशी अर्जुन बऱ्याचवेळा मर्यादा सोडून वागला होता. कारण त्याला भगवंताचा खरा परिचय झाला नव्हता. विश्वरुपदर्शनानंतर अर्जुन स्वत:च्या चुका आठवून खजिल झाला. तो भगवंताची पुन्हा-पुन्हा क्षमायाचना करीत आहे. ही क्षमायाचना करतांना तो लडिवाळपणाही दाखवित आहे. श्रीकृष्णावर अधिकार गाजविण्याचा त्याला अधिकारच होता. खरेच अर्जुनाकडून बरेच काही घेण्यासारखे आहे. माऊलीही अर्जुनाचे असे वर्तन पाहून त्याचे अधून-मधून कौतुक करीत असतात. भगवंतांनी जे गुह्यज्ञान आपल्या आई-वडिलांना,बांधवांना, इतर भक्तांना सांगितले नाही, ते सर्व ज्ञान त्यांनी अर्जुनाला मुक्तपणे सांगितले. विश्वरुपाचा लाभही इतर कोणालाही मिळाला नाही; पण अर्जुनाने हा लाभ मिळविला, मला गुह्यज्ञान सांगा किंवा विश्वरुप दाखवा असे न म्हणताही, त्याची इच्छा जाणून घेऊन भगवंतांनी स्वत:च या कामी पुढाकार घेतला.



भगवंताला आपल्यासाठी खूप कष्ट पडले, याची जाण झाल्याने अर्जुन स्वत:ला भगवंतांचा ऋणीही समजत आहे. विश्वरुप दर्शन पाहून अर्जुन भयभीत व आनंदीही झाला आहे. या आनंदाच्या भरात तो भगवंताचे कौतुक करता-करता, शब्द अपुरे पडल्याने फक्त नमस्ते - नमस्ते म्हणत आहे. विश्वरुप पाहून अर्जुनाला प्रेमाचे भरतेही आले आहे. तो प्रेमात भगवंताला अलिंगन देऊ इच्छित आहे. तो म्हणतो आहे,परि आतां ऐसी चाड जीवीं । जे तुजसीं गोठी करावी । जवळीक हे भोगावी । अलिंगावयासी ।।. अर्थात, हे भगवंता मी आता इतका आनंदी झालो आहे की, या आनंदाच्या भरात तुझ्याशी खूप गोष्टी कराव्या वाटत आहेत, त्याचबरोबर तुला आलिंगन द्यावे असे वाटत आहे.

आनंदाच्या भरात आपणही समोरच्याला कडाडून मिठी मारत असतो. या ऱ्हदयाचे त्या ऱ्हदयात घालण्याचा प्रयत्न आपण आलिंगनातून करतो. अलिंगन देणे म्हणजे स्वत:ला विसरुन समोरच्याशी एकरुप होणे होय. प्रेमाचा खरा अर्थ हाच आहे. आनंदाच्या भरात भगवंता मला तुझ्या पाया पडू दे, तू मला आशिर्वाद दे, असे अर्जुन म्हणत नाही. कारण पाया पडणे म्हणजे एकरुप होणे नव्हे, याची जाण त्याला आहे. म्हणून तो अलिंगनाची व मनमोकळया गप्पागोष्टी करण्याची भाषा वापरत आहे. प्रेमात, आनंदात जेव्हा आपण अलिंगन देतो तेव्हा मनातील सर्व आनंद उसळून येतो. आई-बाप आपल्या मुलांना किंवा मुले आपल्या आई-वडिलांना, बहिण-भाऊ एकमेकांना, किंवा मित्र मित्रांना अलिंगन देतात तेव्हा त्यांच्या आनंदात भर पडत असते. पाया पडून किंवा पाठ थोपटून घेऊन मन पूर्णत: मोकळे होत नसते पण अलिंगन दिल्याने मात्र, मन मोकळे होत असते. अलिंगन देण्यासाठी एकमेकांवर विश्वास, एकमेकांबद्दल ओढ, आपुलकी वाढावी, एकमेकात नि:स्वार्थ प्रेमाची भावना वाढावी अशी अपेक्षा या प्रसंगी करणे संयुक्तिक होईल असे वाटते. आपण माऊलींच्या ओवींच्या सहवासात असल्याने आपल्या प्रेमळ, लडिवाळ वर्तनात निश्चितच वाढ होईल यात शंका नाही. श्रीकृष्ण-अर्जुनाच्या अलिंगनाचा अनुभव संजयाप्रमाणे आपणालाही मन:पुर्वक घेता यावा अशी माऊली कृपा व्हावी ही सदिच्छा.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : सोमवार** | **दिनविशेष -** |
| **दि. २० जानेवारी २०२५** | **भालचंद्र महाराज पुण्यतिथी** |
| **विक्रम संवत् २०८०-८१** | **चांगला दिवस** |
| **शके - १९४६** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - पौष** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **कृ. षष्ठी - (०९.५८)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - शिशिर** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - हस्त (२०.२८)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - सुकर्मा (२६.५१)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - विष्टि (२३.१७)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**वृषभ :** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह :** व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या :** कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. काम काजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ :** आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक :** अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु :** योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर :** फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# झेडपीच्या शाळांमध्ये संविधानाचा जागर

## विद्यार्थ्यांसह पालकांना होणार हक्क, कर्तव्य व मूलभूत अधिकाराची जाणीव; जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

संविधानाच्या अमृत महोत्सवामुळे सन २०२४-२५ या वर्षापासून घर घर संविधान कार्यक्रम राबविला जाणार आहे. त्यासाठी झेडपीच्या २ हजार ९०७ शाळेत संविधानाचा जागर होणार आहे. यासाठी प्राथमिक शिक्षण विभागाकडून युध्दपातळीवर कामकाज सुरू आहे.

दरम्यान, २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाचे स्वीकृत करण्यात आले. २६ जानेवारी १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी करणे सुरू झाले. संविधानाचे महत्व, संविधानातील समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडविण्याचा व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजनैतिक न्याय, विचार असे संविधानात दिले आहे. तरी संविधान हे जीवंत दस्तऐवज असून जे देशाच्या विकासात आणि नागरिकांच्या जीवनाच्या गुणवत्तेत महत्वपूर्ण भूमिका बजावते. त्यासाठी वर्षभर या घर घर संविधानाचा उपक्रम झेडपीच्या शाळेने राबविणार आहे.

हा उपक्रम २६ नोव्हेंबर २०२४ ते २६ नोव्हेंबर २०२५ पर्यंत आहे. त्यासाठी पहिल्या महिन्यात प्रास्ताविकेचे वाचन करणे, भिंतीवर संविधानाची प्रास्तावना रेखाटणे, संविधनासमोर सेल्फी काढणे, शाळेत प्रतिष्ठीत व्यक्तीला बोलवून संविधानाचे महत्व, नागरिकांचे हक्क आणि कर्तव्य, संविधानावर व्याख्याने आयोजित करणे, संविधानाबाबत वाद विवाद चर्चा, राज्यघटना कशी तयारी झाली. याबाबत सविस्तर जागर करण्यात येणार आहे.

### घर घर संविधान उपक्रमातून जनजागृती

संविधानाच्या अमृत महोत्सावानिमित्त जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये घर घर संविधान उपक्रम राबविणार आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेला सूचना दिल्या आहेत. या माध्यमातून घर घर संविधानामुळे जनजागृतीसाठी मोठी मदत मिळणार आहे.

**-कादर शेख,**
**शिक्षणाधिकारी प्राथमिक**

संविधानाचा जागर करण्यासाठी शासनाने झेडपीच्या प्राथमिक २ हजार ८९६ व झेडपी हायस्कूलच्या ११ अशा २ हजार ९०७ शाळेत जागर केला जाणार आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेसाठी दीड हजार रूपयाची तरतूद करण्यात आली आहे.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलक:- (२६) हिंदुस्थान

डॉक्टरजी म्हणतात हिंदुस्थानचा पंचप्राण म्हणजे त्याची हिंदू संस्कृती. दुर्दैवानी प्रत्यही परधर्मीयांकडून हिंदू समाजावर विध्वंसक हल्ले होत असतात. असे हल्ले करणारे राष्ट्राचे घटक होऊ शकत नाही. आपल्या देशाचे नाव हिंदुस्थान आहे. हिंदीस्थान नाही. हिंदुस्थान हा हिंदूंचा आहे. इथे हिंदू संस्कृती नांदते आहे. ही काही धर्मशाळा नाही. या ठिकाणी कोणीही यावे आणि आपला बिछाना पसरावा. ज्यांचा इतिहास- परंपरा समाज धर्म संस्कृती- विचारसरणी व हितसंबंध एक आहेत; त्यांचेच राष्ट्र होत असते. अनेक लोक हिंदुस्थानचा विध्वंस करण्यासाठी येथे आले आहेत. ते आपल्याला नामोहरम करण्यासाठी टपले व खपले. त्यांना मित्र समजण्याची घोडचूक करू नये. कितीही मोठ्या पुढाऱ्याने हे टपले / खपले आपलेच आहेत असे सांगितले; तरी त्याच्या पाठीमागून अंधश्रद्धेने जाऊ नका.

**- क्रमश:**

# राज्यपालांच्या हस्ते विद्यापीठाच्या सायबर क्लबला उत्कृष्ट पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

पुणे येथे पार पडलेल्या क्विक हिल फाउंडेशनच्यावतीने आयोजित 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' समारंभात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या सायबर क्लबला 'बेस्ट क्लब ओव्हरऑल' हा प्रतिष्ठीत पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच एमसीएची विद्यार्थीनी सुप्रिया शिंदे यांना बेस्ट मिडिया डायरेक्टर हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



या पुरस्कार वितरण सोहळ्यास कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, संगणकशास्त्र संकुलाचे संचालक डॉ. राजीवकुमार मेंते व विद्यापीठाच्या सायबर क्लबचे प्रमुख अधिकारी मालती जाधव, सायली शेळके, सुप्रिया शिंदे, शकुंतला बेळ्ळे उपस्थित होते क्विक हिल फॉउंडेशनचे अध्यक्ष अनुपमा काटकर, तसेच क्विक हिल टेक्नॉलॉजिज् लिमिटेडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलाश काटकर, संयुक्त व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय काटकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल सालवी उपस्थित होते.

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रम अंतर्गत संगणकशास्त्र संकुलाच्या २२ विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील ९५ शाळा व महाविद्यालयातील ३४ हजार ५०० विद्यार्थ्यांना १४४ सादरीकरणाद्वारे सायबर सुरक्षेबद्दल जागरुक केले. या २२ विद्यार्थ्यांना क्विक हिल फाउंडेशनकडून विद्यावेतनही देण्यात आले. विद्यार्थ्यांनी याविषयी पथनाट्य सादर करुन त्याद्वारे नान्नज ग्रामपंचायत व माऊल कॉलेज, वडाळा येथे सुद्धा सायबर सुरक्षिततेबाबत साक्षरता निर्माण केली. या सर्व विद्यार्थ्यांनी सायबर साक्षरतेचे काम संकुलाचे संचालक डॉ. राजीवकुमार मेंते यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

क्विक हिल फाउंडेशनद्वारे कांचन निकंबे, सई अवताडे, रत्नप्रभा चंदनशिवे, ऋतुजा वाघमोडे, प्रवीण कोळी, सिध्दारामय्या स्वामी, मोहीनी दुधाळ, राहुल शिंदे, स्वप्नाली जाधव, वैष्णवी पाटील, रिध्दी खोकले, प्राजक्ता सरवदे यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वर्षीचा शैक्षणिक वर्षातील सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा उपक्रम राबविण्याकरिता कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर, प्र-कुलगुरु डॉ. लक्ष्मीकांत दामा व कुलसचिव योगिनी घारे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्विक हिल फाउंडेशनच्या अजय शिर्के, सुगंधा दानी, गायत्री केसकर, संकुलातील विभाग प्रमुख डॉ. अशोक शिंदे, डॉ. श्रीराम राऊत यांचे सहकार्य मिळाले.



## बसव सेंटरच्यावतीने तीळगूळ समारंभ

सोलापूर, दि. १९ जानेवारी-

बसव सेंटर संस्थेच्यावतीने तिळगूळ समारंभ उत्साहात पार पडले. पौर्णिमा तोटद यांच्या बसववचनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रारंभी म. बसवेश्वरांच्या प्रतिमेची पूजा संस्थाध्यक्ष राजेंद्र मायनाळ, उपाध्यक्ष निलकंठप्पा कोनापूरे यांनी करुन पुष्पहार अर्पण केले. सचिव प्रा. मल्लिनाथ पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत करून मागील वर्षात झालेल्या उपक्रमाची माहिती दिली. कार्याध्यक्ष बाबासाहेब कुलकर्णी यांनी म. बसवेश्वरांचे जीवन चरित्र स्पष्ट करून म्हणाले विश्वगुरु म.बसवेश्वरांनी बाराव्या शतकात सामाजिक धार्मिक साहित्यिक आध्यात्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले. त्यांचे विचार आधुनिक काळात ही जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करतात. राजेंद्र मायनाळ यांनी संस्थेच्या माध्यमातून विविध उपक्रम आयोजित करण्यात येतात असे सांगून म्हणाले यंदा बसवेश्वर जयंती महोत्सवात वचनगीत स्पर्धा निबंध स्पर्धा तसेच इतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत असलेल्यांना मानद पदवी देऊन गौरविण्यात येणार असल्याचे सांगितले. पौणिमा तोटद, ताराबाई कोनापूरे, मंगलाताई कोनापूरे, शांतादेवी दुलंगे यांचा लिलावतीतायी मडकी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. निलकंठप्पा कोनापूरे यांनी ही आपले विचार व्यक्त केले. सुभाष कुलकर्णी यांनी आभार मानले. सामुहिक मंगलारतीने कार्यक्रमाची सांगता झाली. समारंभास गौरीशंकर कोनापूरे, सचिन सोळसे उपस्थित होते.

## डिजिटल मीडिया संघटनेचे महाअधिवेशन कोकणात

### राजा माने : मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१९ जानेवारी-**

डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रचे तिसरे महाअधिवेशन सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी येथील सुसज्ज अशा भोसले नॉलेज सिटी येथे होणार आहे.महासंमेलनाची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांनी दिली.



संघटनेचे राज्य उपाध्यक्ष सतीश सावंत, कोकण विभागाचे अध्यक्ष सागर चव्हाण, प.महाराष्ट्राचे अध्यक्ष विकास भोसले, सचिव महेश कुगावकर,सहसचिव केतन महामुनी,राज्य संघटक शामल खैरनार,राज्य सहसंघटक तेजस राऊत,राज्य समन्वयक इक्बाल शेख,राज्य कार्यकारिणी सदस्य दिपक नलावडे व अमोल पाटील यांची सावंतवाडी येथील ख्यातनाम संस्था भोसले नॉलेज सिटी चे संस्थापक अच्युत भोसले यांच्या समवेत बैठक झाली.या बैठकीत महासंमेलन नियोजन व व्यवस्थापन या विषयावर चर्चा झाली.पुस्तकांचे गाव भिलार -महाबळेश्वर येथे पहिले ऐतिहासिक अधिवेशन झाले होते.त्या नंतर दुसरे अधिवेशन कोल्हापूर -कणेरी मठ येथे झाले होते.आता तिसरे महाअधिवेशन कोकणात होत आहे.या महा अधिवेशनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी मुख्यमंत्री खा. नारायण राणे, उच्च वतंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे, माजी शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्यासह राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांना निमंत्रित करण्यात येत आहे.

## वंचित बहुजन माथाडी युनियनच्या जिल्हा सरचिटणीसपदी विजयकुमार लोंढे

**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**



वंचित बहुजन माथाडी ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनच्या सोलापूर जिल्हा सरचिटणीसपदी विजयकुमार लोंढे यांची निवड करण्यात आली आहे. युनियनचे संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुरेश मोहिते यांनी नुकतीच सोलापूर जिल्हा कार्यकारणी जाहीर केली आहे. सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी प्रा. सुरज अरखराव, जिल्हा सरचिटणीस पदी प्रा.विजयकुमार लोंढे, जिल्हा संघटकपदी प्रा.सुधाकर साबळे, कोषाध्यक्षपदी अविनाश वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे.

## शासकीय रेखाकला परीक्षेत आरोही येमूलचे यश

**सोलापूर, दि.१९ जानेवारी-**

शासकीय रेखाकला परीक्षेत इंडियन मॉडेल स्कूल प्रशालेतील आरोही श्रीनिवास येमूल (इयत्ता ७वी) ही महाराष्ट्र राज्य शासकीय रेखाकला परीक्षा २०२४ एलिमेंटरी-गुणवत्ता यादीत ७१ वी आलेली आहे. एलिमेंटरी परीक्षेस महाराष्ट्र, उत्तराखंड, छत्तीसगड,मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यातून ४ लाख ११ हजार २५६ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. याप्रसंगी इंडियन मॉडेल स्कूलचे संस्थापक अध्यक्ष ए.डी. जोशी, सचिव अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला, ममता बसवंती, रूही काझी यांनी आरोहिचे अभिनंदन केले. प्रशालेतील कला शिक्षक शैलेश कुलकर्णी व राधिकादेवनपल्ली यांचे मार्गदर्शन आरोहीला मिळाले.





## गणेश रामचंद्र चितळे प्रशालेला जिल्हास्तरीय कृतीशिल शाळा पुरस्कार

**सोलापूर, दि. १९ जानेवारी-**

सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संचलित गणेश रामचंद्र चितळे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, बरूरला महाराष्ट्र राज्य कृती समितीच्या वतीने जिल्हास्तरीय कृतीशील शाळा हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. याचबरोबर, याच शाळेचे प्राध्यापक सिद्धाराम पुजारी यांना आदर्श कृतिशील प्राध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. केगाव येथील सिंहगड इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित एका कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या शाळेच्या या उल्लेखनीय यशासाठी प्राचार्य शिवपुत्र कोळीआणि सर्व कर्मचारी यांचे मंडळाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार व सचिव यांनी अभिनंदन केले.

# राष्ट्रीय एकतेची पुनर्स्थापना अहिल्याबाईंनी केली

## राष्ट्रसेविका समितीच्या प्रमुख संचालिका व्ही. शांताक्का

## अहिल्यादेवी विशेषांकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. १९ जानेवारी-**

समाजातील कुप्रथांना दूर सारत पुण्यश्वोक अहिल्याबाईंनी लोकहिताचे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. भारतीय संस्कृतीच्या प्रतिकांचे संवर्धन करत राष्ट्रीय एकतेच्या पुनर्स्थापनेचे कार्य पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी केले, असे प्रतिपादन राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका व्ही. शांताक्का यांनी केले.

एकता मासिक व राष्ट्र सेविका समितीच्या वतीने आयोजित अहिल्यादेवी विशेषांकाच्या प्रकाशन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कर्वेनगर येथील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या सभागृहात हा प्रकाशन कार्यक्रम पार पडला. यावेळी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, विवेक समुहाचे प्रबंध संपादक दिलीपराव करंबळेकर, एकता फाउंडेशनचे अध्यक्ष दत्तात्रेय अंबुलकर, राष्ट्र सेविका समितीच्या क्षेत्र कार्यवाहिका सुनंदा जोशी, एकताच्या संपादिका रुपाली भुसारी उपस्थित होत्या. सती प्रथा शास्त्रसंमत नसल्याचे अहिल्याबाईंना माहित होते. म्हणूनच त्यांनी समाजाच्या समोर ते ठेवले. ज्याचा मोठ्या प्रमाणावर स्विकार झाला, असे मत शांताक्का यांनी मांडले. त्या म्हणाल्या, अहिल्याबाईंच्या जीवनाचा उद्देश्य हा रामराज्याची स्थापना असाच होता. म्हणूनच त्यांनी समाज आणि धर्महिताचे असाधारण निर्णय घेतले. समाजाच्या हितासाठी तत्कालीन कायद्यांमध्ये संशोधन करत नवे कायदे अंमलात आणले. माहेश्वरी साडी आणि स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देत




अहिल्याबाईंनी आत्मनिर्भरता आणि व्होकल फॉर लोकल हे आजचे विचार तेंव्हाच पूर्णत्वास नेले, असेही शांताक्का म्हणाल्या. एकताच्या या अहिल्या देवी अंकाने इतिहास समोर ठेवत आपली मुल्ये समाजापुढे मांडली. नव्या पिढीसाठी अहिल्ये सारखे आदर्श प्रस्थापित केले आहेत. राम शिंदे म्हणाले, आजचा काळ हा स्त्री शक्तीच्या जागरणाचा काळ आहे, असे मत दिलीपराव करंबळेकर यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, सध्या पाश्चात्य जगतातील फेमिनीजमचा बोलबाला आहे. मात्र, फेमिनिजम हा आत्मकेंद्रीत असून, भारतीय विचारांतील स्त्री जागरण व्यापक आहे. स्त्री जागरण हा या समाजाचा आणि राष्ट्राचा आधार होत कर्तृत्व फुलविणारा विचार आहे. गेल्या १०० वर्षांत स्त्री शिक्षणाचा आणि कर्तृत्त्वाचा सर्व क्षेत्रात विकास झाला आहे. मात्र आज कुटुंब आणि समाजव्यवस्था उध्वस्त होण्याचे विचार मांडले जात आहे. अशा काळात स्त्री शक्तीला सकारात्मक पद्धतीने जागृत करणाऱ्या प्रसारमाध्यमाची समाजाला गरज आहे. सूत्रसंचालन डॉ. अनुजा कुलकर्णी यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्यावर आधारित विशेषांकाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. लोकसभेच्या माजी सभापती सुमित्रा महाजन या अंकाच्या अतिथी संपादिका आहेत. कार्यक्रमात शांतक्का यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचा त्रिशताब्दी महोत्सव साजरा करण्यात येत आहे.

स्त्री ही शक्तीहीन नाही तर शक्तीस्वरूपीनी आहे. त्यामुळे महिलांनी कोणाकडे काही मागू नये तर प्राप्त करावे. पुण्यश्लोक अहिल्याबाईंचे जीवन हाच आदर्श शिकवते.

**- व्ही. शांताक्का,**
प्रमुख संचालिका,
राष्ट्र सेविका समिती

**एकता निबंध स्पर्धा निकाल**
प्रथम क्रमांक : गार्गी जोशी,
द्वितीय क्रमांक : कुंदा कुलकर्णी
तृतीय क्रमांक : स्वाती रानडे
चौथा क्रमांक : प्रिया वैद्य
पाचवा क्रमाक : शुभांगी निंबोळे

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# दहावी पास, डॉक्टरची डिग्री नाही, तरीही उपचार

## पंढरपुरात आरोग्य विभागाची धाड; विनापरवाना उपचार करणाऱ्यावर कारवाई, नागरिकांतून खळबळ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१९ जानेवारी-**

दहावी पास असलेल्या अन् आरोग्य विभागाकडून कसलीच परवानगी न घेता वैद्यकीय उपचार करणाऱ्यावर धाड टाकून आरोग्य विभागाने पोलिसांच्या मदतीने पंचनामा केल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ महेश सुडके यांनी दिली.

शहरातील जुना अकलूज रस्ता येथील चंद्रभागा बस स्थानकामागे नारायण देव बाबा भक्तनिवास येथे पोलिस व आरोग्य विभागाने धाड टाकली. त्यावेळी दत्तात्रय सदाशिव पवार (रा. जालना) हे शुगर व हाडासंदर्भात त्रस्त असलेल्या रुग्णांवर उपचार करत असल्याचे मिळून आले. त्यावेळी एका व्यक्तीला ५०० फी आकरल्याची माहिती उपस्थित रुग्णांकडून मिळून आली. एका दिवसात अंदाजे ७५ ते ८० रुग्ण उपचारासाठी येत असल्याचे पवार यांनी सांगितले.

अधिकाऱ्यांनी पवार यांना विचारल्या नंतर त्यांनी शेगाव दुमाला व पंढरपुरात तीन वर्षापासून उपचार करीत आहे. रुग्णांवर उपचार करण्याबाबत कोणते ही अधिकृत शिक्षण घेतले नाही. इंडीयन मेडिकल कॉन्सील क्ट १९५६ महाराष्ट्र मेडीकल प्रॅक्टिशनर क्ट १९६१ चे सर्टीफिकेट नाही. तसेच सातारा येथील एका संस्थेत चार दिवस उपचार करण्याबाबत प्रशिक्षण घेतल्याचं त्यांनी सांगितले.

ही कारवाई उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ महेश सुडके, तालुका आरोग्य अधिकारी डॉ एकनाथ बोधले, आरोग्य विस्तार अधिकारी पी आर जावळे, नगरपरिषद आरोग्य निरीक्षक नागनाथ तोडकर, पोउपनि भारत वाघे, पोलीस कर्मचारी धनंजय जाधव, प्रवीणकुमार सोनवले, राहुल कांबळे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.



**मला मिळणाऱ्या पैशातून अन्नदान करतो. गरीब मुलांच्या लग्नाला पैसे देतो. लग्नाच्या वेळी अन्नदान करतो. डीग्री असणारे डॉक्टरकडे जाऊन नीट न होणारे रुग्ण माझ्याकडे येतात. ते बरे होऊ आनंदाने जातात. याचा मला मिळणाऱ्या पैशापेक्षा जादा आनंद आहे. भविष्यात गोदान, वृक्षारोपण करणार आहे.**
**-दत्तात्रय पवार महाराज,**
**विनापरवाना उपचार करणारे डॉक्टर**

**आरोग्य विभागाकडून नागरिकांचे आरोग्य सुदरुढ राहावे, त्यांना कोणताही धोका होऊ नये. यासाठी बोगस डॉक्टर पकडण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. कारवाई करण्यात येत असलेल्या दत्तात्रेय सदाशिव पवार महाराज हे दहावी पास आहेत. त्यांच्याकडे वैद्यकीय शास्त्राची पदवी नाही. त्यांना वैद्यकीय व्यवसाय करू नका असे सांगितले आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे.**
**डॉ. महेश सुडके, वैद्यकीय अधीक्षक,**
**उपजिल्हा रुग्णालय, पंढरपूर**

## संक्षिप्त वृत्त



### उमरड प्राथमिक शाळेत माता मेळावा, हळदी-कुंकू समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १९ जानेवारी-**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उमरड या शाळेत निपूण भारत अंतर्गत व आनंददायी शनिवार उपक्रमांतर्गत माता मेळावा व हळदी-कुंकू समारंभ पार पडला. उद्घाटन सरपंच मनिषा प्रमोद बदे यांनी केले. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या अंजली श्रीवास्तव, मोमीन, गयाबाई सुभाष बदे, विजया नंदकिशोर वलटे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या प्रियांका पडवळे, सीमा बदे, भारती पाखरे, हिना पठाण, संजीवनी कोंडलकर उपस्थित होते. यावेळी स्नेहल सुभाष बदे, सुप्रिया शरद बदे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नायब तहसीलदार सुभाष बदे, माजी सरपंच प्रमोद बदे, मकाईचे संचालक बापूसाहेब चोरमले, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय कोठावळे, पोलीस पाटील अंकुश कोठावळे, माजी सरपंच संदीप मारकड, उपाध्यक्ष रवींद्र गिरी, जनार्दन मारकड, चांगदेव चौधरी, उपसरपंच समाधान वलटे, मेघना साळुंखे, मुख्याध्यापक अंकुश अमृळे, दिलीप भोसले, बापूसाहेब भोसले, संदीप ढाकणे, मुकुंद राऊत, अनिल यादव, गटशिक्षणाधिकारी जयवंत नलावडे, विस्तार अधिकारी मिनीनाथ टकले, केंद्रप्रमुख अमृत सोनवणे उपस्थित होते.

### निलेश उबाळे यांच्या संस्थेला पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. १९ जानेवारी-**



बार्शी तालुक्यातील यावलीचे पत्रकार निलेश उबाळे यांच्या नंदनवन बहुद्देशीय संस्थेला नगर जिल्ह्यातील काशिनाथ आव्हाड फिल्म्सचा राज्यस्तरीय आदर्श संस्था राष्ट्रीय महागौरव पुरस्कार मिळाला असून याचे वितरण २ फेब्रुवारी रोजी शिर्डी येथे होणार आहे. नंदनवन संस्थेचा अंतर्गत स्वयंरोजगार प्रशिक्षण प्रबोधिनी मार्फत निलेश उबाळे यांनी राज्यभरात ७ हजार पेक्षा जास्त युवक युवतीना व्यवसायाचा प्रवाहात आणले आहे तसेच मोफत गृहउद्योग प्रशिक्षण, गरजूना शालेय साहित्य वाटप, शेतकरी अभ्यास सहल, महिला उद्योग सहल, क्रीडा साहित्य वाटप, भूमिपुत्र सन्मान, आरोग्य व योग शिबीर, त्याच बरोबर मराठवाड्यातील ४००० विद्यार्थ्यांना मोफत डिजिटल साक्षरता प्रशिक्षण आदी उपक्रम राबवले आहेत. या अगोदर डॉ. कलाम राष्ट्रप्रेरणा पुरस्कार, शिवकार्य गौरव पुरस्कार आदी पुरस्कार मिळाले आहेत.



### इंटरमिजिएट परीक्षेत पंढरपुरातील द. ह. कवठेकर प्रशालेचे घवघवीत यश

**पंढरपूर, दि. १९ जानेवारी-**

शासकीय चित्रकला इंटरमिजिएट इंटरमिजिएट परीक्षेत येथील द. ह. कवठेकर प्रशालेतील विद्यार्थी अथर्व अमित वाडेकर याने राज्य गुणवत्ता यादीमध्ये २१ वे स्थान पटकावले. याच गुणवत्ता यादीत प्रशालेतील विद्यार्थिनी सान्वी सचिन कलढोणे हिने राज्यात २६ वा क्रमांक पटकाविला. १० विद्यार्थी ए ग्रेड प्राप्त असून ९ विद्यार्थी बी ग्रेड प्राप्त करून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांना अमित वाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल पंढरपूर एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव एस. आर. पटवर्धन, सु. त्रिं. अभ्यंकर, संस्थाध्यक्ष नानामालक कवठेकर, चेअरमन वीणाताई जोशी, मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी, उपमुख्याध्यापक सुनील रुपनर, र्यवेक्षक आर. एस. कुलकर्णी यांनी अभिनंदन केले. यावर्षी वाढीव गुण प्राप्त १९ विद्यार्थी असून त्यांचे प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी पुणे विभागीय बोर्डाकडे पाठविण्यात आल्याचे मुख्याध्यापक व्ही. एम. कुलकर्णी यांनी सांगितले.



### शिरगाव ते अनवली रस्त्याच्या कामाचा शुभारंभ; नागरिकांमधून समाधान

**पंढरपूर, दि. १९ जानेवारी-**

तालुक्यातील शिरगाव ते अनवली रस्त्याच्या कामाचा शुभारंभ पंचायत समितीचे माजी सभापती वसंतराव देशमुख यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आला. शिरगाव ते अनवली हा रस्ता जिल्ह्यापरीषद फंडातून करण्यात येणार आहे.हा रस्ता पाचशे मीटरचा असून त्याचे खडीकरण व मुरमीकरण करण्यात येणार आहे. या रस्त्याच्साया कामासाठी सुमारे पाच लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.या रस्त्यासाठी शिरगाव व अनवली येथील ग्रामस्थांनी वसंतराव देशमुख यांच्याकडे वारंवार मागणी केली होती. अखेर वसंतराव देशमुख यांच्या प्रयत्नातून या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाल्याबद्दल ग्रामस्थातून समाधान व्यक्त होत आहे. या कार्यक्रमास दोन्ही गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, आजी-माजी सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य, विविध का कार्यकारी सोसायटीचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. रस्त्याच्या कामाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल वसंतराव देशमुख यांचा सत्कार ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला.

### वळसंगच्या वाड्या-वस्त्यांवर पाणी टंचाई

**वळसंग, दि. १९ जानेवारी-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग, आचेगाव, दिंडूर, वडगाव, धोत्री, तीर्थ, दर्गनहळ्ळी या भागातील गावांसह वाड्या वस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी टंचाई जाणवत आहे. यंदा पाऊसमान कमी झाल्याने ओढे, नाले भरुन वाहिलेच नाहीत. यामुळे नागरिकांना पाण्यासाठी दाहीदिशा भटकंती करावी लागत आहे. जनावरांना पाण्यासाठी टँकर, उपलब्ध पाणीसाठा असलेल्या ठिकाणांचा शोध घ्यावा लागत आहे. पिण्याच्या पाण्यासाठी तात्काळ सोय करण्याची मागणी शेतकरी व नागरिकांमधून जोर धरला जात आहे.

# जिजाऊ, सावित्रीमाईंमुळेच नारीशक्तीचा सन्मान

### सोनिया गोरे : दहिगाव येथे बक्षिस वितरण, विद्यार्थ्यांना सायकल वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १९ जानेवारी-**

आज राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्यामुळेच स्त्रियांना मान सन्मान मिळत आहे. नारी शक्तीचा सन्मान त्यांच्यामुळेच होत आहे असे प्रतिपादन सोनियाताई गोरे यांनी केले.

दहिगाव (ता. माळशिरस) येथे राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त श्री श्री ज्ञान मंदिर येथे झालेल्या विविध गुणदर्शन स्पर्धांचे प्रशस्तीपत्र व सायकल वाटपप्रसंगी त्या बोलत होत्या. सरकारने आज लाडकी बहीण योजना आणली. प्रत्येक कुटुंबातील बहिणीला स्वावलंबी बनवायचा मानस सरकारचा आहे. श्री श्री ज्ञान मंदिर संस्थने अध्यात्मावर जास्तीत जास्त भर दिला. माझ्या



लेकींवर कुणी अन्याय करण्याचा प्रयत्न जरी केला तरी माझ्या लेकी नक्कीच त्याला सडेतोड असे उत्तर देतील हिवरकर-पाटील यांनी गोरगरीब मुलींना वाडी वस्तीवरून शाळेत येण्या-जाण्यासाठी मोफत सायकल देऊन त्यांना शैक्षणिक मार्ग सुखकर केला आहे, असे त्यांनी सांगितले. यावेळी सपोनि महारुद्र परजने, ऋतुजा मोरे, राजकुमार हिवरकर-पाटील, मनोज जाधव, भाजपचे तेजस गोरे, राष्ट्रवादीचे रियाज शेख, भीम राव फुले, डॉ. रणजीत फुले, मुख्याध्यापिका अनिता बनकर, सीमा एकतपुरे, शिक्षक स्टाफ पोपटराव शिंदे, चेअरमन रंजीत जठार, सनी बरडकर, सतीश बरडकर, सुनील बनकर, अभिजीत चांगण, निलेश ढोपे, संग्राम हिवरकर, उपस्थित होते.

# पिरळे येथे आज खासदार, आमदारांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. १९ जानेवारी-**

माढा लोकसभा मतदारसंघाचे खा. धैर्यशील मोहिते-पाटील व माळशिरसचे आ. उत्तमराव जानकर यांच्या नागरी सन्मान सोहळा पिरळे (ता. माळशिरस) येथे होणार आहे. याची जोरात तयारी करण्यात येत असल्याचे दादासाहेब शिंदे, प्रा. अशोक दडस, प्रा. प्रगती भोसले यांनी दिली.

माळशिरस तालुक्यातील पिरळे येथील समता प्रशाला क्रीडांगणाच्या मैदानावर सोमवारी २० जानेवारी रोजी सायंकाळी पाच वाजता नागरी सन्मान सोहळा व वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला विविध मान्यवरांची उपस्थित लाभणार आहे. कार्यक्रमाचे सत्कारमूर्ती म्हणून खा. धैर्यशील मोहिते-पाटील व आ. उत्तमराव जानकर यांचा गौरव करण्यात येणार आहे. याशिवाय दलित पँथरचे प्रदेशाध्यक्ष डॉ. घनश्याम भोसले यांचा विशेष सन्मान होणार आहे. यावेळी समता माध्यमिक व श्री भिवाई देवी कनिष्ठ





महाविद्यालय पिल्ले, एस. एम. एस. इंग्लिश मीडियम स्कूल परळे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे अभ्यास केंद्र पिरळे यांच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागताची जबाबदारी चक्रेश्वर हलगी ग्रुप चाकुरे, बिरुदेव गजी मंडळ पांगरी व टाकेवाडी, मावळा ग्रुप पळसमंडळ, सतोबा गजी मंडळ बांगार्डे, नाथा गजी मंडळ गिरवी, धुळदेव गजी मंडळ मारकडवाडी यांच्यावर आहे. आयोजनामध्ये आबारत्न शिक्षण संस्था पिरळे, ग्रामपंचायत पिरळे व ग्रामस्थांचा सहभाग असणार आहे.

# नळदुर्ग-नंदगाव-लोहगाव रस्त्याचा वनवास संपणार

### दै. तरुण भारतच्या वृत्ताची दखल

### लोहगावच्या ग्रामस्थांनी मानले दै. तरुण भारतचे आभार

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १९ जानेवारी-**

अनेक खड्डयांनी भरलेला व रखडलेला नळदुर्ग ते नंदगाव व्हाया लोहगाव रोडच्या कामाची सुरुवात करण्यात आली असून हा रस्ता बनलाय मृत्यूचा सापळा अशी बातमी नुकतीच सोलापूर तरुण भारतने छापली होती. त्या बातमीचा परिणाम प्रशासनावर झाल्याचे दिसून आले. यामुळे या रस्त्यांचा वनवास संपणार आहे.



आता संपूर्ण रोड होईपर्यंत थांबू नये अशी रास्त मागणी लोहगाव ग्रामस्थांनी केली आहे. तीन ठिकाणी पुलाचे काम प्रगतीपथावर असून, रामतीर्थ तांड्याच्या पुढे उकरलेला रस्ता मजबुतीकरण करण्यात आला आहे. याच मार्गावर प्रसिध्द रामतीर्थ देवस्थान असून हजारो भक्त-भाविक या मार्गाने दररोज ये-जा करीत असतात. या रस्त्याची बातमी नुकतीच सोलापूर तरुण भारतने प्रकाशित केली होती. त्यामुळे प्रशासन खडबडून जागे झाले आहे तर लवकरच या १० किमी रस्त्याचे डांबरीकरण होणार असल्याचे सांगितले जाते आहे. अनेक दुचाकीस्वारांना तारेवरची कसरत करीत जावे लागत होते. त्यांना पाठदुखी व कंबर दुखीचा त्रास होत होता. त्याची दखल घेऊन तरुण भारतने या रस्त्याची बातमी छापली होती, त्याचा परिणाम होऊन हा रस्ता आता लवकरच तयार होण्याची चिन्हे दिसत आहे. त्यामुळे लोहगाव ग्रामस्थांनी तरुण भारतचे आभार मानले आहेत. अजूनही जर रस्ता त्वरित पूर्ण नाही, झाल्यास पुन्हा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

# अक्कलकोटच्या खेडगी कॉलेजचे दहिटणे येथे विशेष श्रमसंस्कार शिबीर



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व सी. बी. खेडगी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालय विभाग राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे दहिटणे येथे शनिवारी ते शुक्रवारी २४ जानेवारीपर्यंत सात दिवस युवकांचा ध्यास ग्राम-शहर विकास हे ब्रीदवाक्य असलेल्या विशेष श्रमसंस्कारा सुरुवात झाल्याचे प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोट यांनी सांगितले.

उद्घाटन गटविकास अधिकारी शंकर कवितके, संस्थेचे सचिव सुभाष धरणे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी माजी नगराध्यक्षा शोभाताई खेडगी होत्या. यावेळी संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, व्हाईस चेअरमन अशोक हारकुड, संचालक अॅड. अनिल मंगरुळे, विद्यापीठाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, जिल्हा समन्वयक लक्ष्मण राख, सरपंच नितीन मोरे, उपसरपंच विकी चौधरी, उपप्राचार्य वैदेही वैद्य, पर्यवेक्षक संजय कलशेट्टी, ग्रामसेवक पी. एल. पवार, तलाठी पूजा सरोटे, पोनि राजेंद्र टाकणे आदी उपस्थित होते. या शिबिरादरम्यान नागेश कोकरे, डॉ. अमोगसिध्द चेंडके, शिक्षण विस्तार अधिकारी गुरुबाळ सनके, डॉ. प्रकाश ढगे, डॉ. दिनेश मुरुमकर, कृषी सहायक रामपुरे, राजश्री थळंगे, डॉ. शिवलिला माळी, पवित्राताई खेडगी, संचालिका ज्योती धरणे, सिद्धम्मा कलशेट्टी, माजी प्राचार्य डॉ. किसन झिपरे, रामचंद्र धर्मसाले, प्रा. सुनील पवार, प्रा. प्रिती चव्हाण यांचे व्याख्यान होणार आहे. तसेच सायंकाळी ६ वाजता सांस्कृतिक व समाज प्रबोधनपर कार्यक्रम होणार आहे. शुक्रवारी दि.२४ सकाळी ८ वाजता दहिटणे गावातून शोभा यात्रा निघणार आहे. त्यानंतर सकाळी दहा वाजता शिबिराचा समारोप होणार आहे. यावेळी तहसीलदार विनायक मगर, चेअरमन बसलिंगप्पा खेडगी, संचालक चंद्रकांत स्वामी, श्रीशैल भरमशेट्टी, विद्यापीठाचे डॉ. विरभद्र दंडे, विभागीय समन्वयक डॉ. धनंजय मोगले उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी डॉ. गुरुसिध्दय्या स्वामी, प्रा. सिध्दाराम पाटील, प्रा. प्रकाश सुरवसे परिश्रम घेत आहेत.

# मधमाशीपालन व्यवसाय शाश्वत विकासासाठी आवश्यक

### ध्रुवकुमार बनसोडे; पंढरपुरात मधमाशीपालन कार्यशाळेत प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१९ जानेवारी-**

शाश्वत विकासासाठी मधमाशीपालन व्यवसाय अत्यंत आवश्यक आहे. शेती क्षेत्रातून भरगोस उत्पादन मिळविण्यासाठी परागीभवन गरजेचे असते ते काम मधमाशा सहजपणे करतात. म्हणूनच या व्यवसायासाठीची आवश्यक कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करावी, असे मत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, सोलापूर येथील जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी ध्रुवकुमार बनसोडे यांनी व्यक्त केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या, कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) योजनेंतर्गत 'महाविद्यालयीन प्राध्यापकासाठी व विद्यार्थ्यांसाठी' आयोजित 'मधमाशीपालन' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्घाटक म्हणून ध्रुवकुमार बनसोडे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, रुसा समन्वयक प्रा. योगेश पाठक, डॉ. चंद्रकांत काळे, प्रा. रेश्मा माने, डॉ. अमर कांबळे, डॉ. अमोल मामलाय्या, डॉ. शिल्पा पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

ध्रुवकुमार बनसोडे यांनी यावेळी महाबळेश्वर येथे असलेल्या केंद्राविषयी माहिती दिली. तसेच शासनाकडून सुरु असलेल्या



विविध योजनाची माहिती दिली. त्यामध्ये मधकेंद्र योजनेवर विस्तृत प्रकाश टाकला. सदर केंद्राकडून मोफत प्रशिक्षण, आवश्यक साहित्य व विद्यावेतन देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले, विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी केले. प्रथम सत्रामध्ये मधुक्षेत्रिक महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, सोलापूर, प्रभाकर पलवेंचा यांनी मधमाशीच्या जाती, त्यांची पोळ्याची रचना, मध तयार होण्याची प्रक्रिया, परागीभवनाचा कोणत्या पिकांना फायदा होतो यावर मार्गदर्शन केले. द्वितीय सत्रामध्ये चाकूर येथील व्यावसायिक दिनकर पाटील यांनी मधमाशीपालन व्यवसाय मोठ्या प्रमाणावर कसा करावा व यामध्ये समाविष्ट असलेल्या शास्त्रीय बाबींवर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. अमोल मामलाय्या यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. एस. एस. काळे व प्रा. एस. आर. वाघमारे यांनी केले तर आभार प्रा. हर्षदा चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमासाठी केतन अल्लापुरकर, प्रा. दिव्या गायकवाड, प्रा. कविता कुलकर्णी, प्रा. एस. ए. भोसले यांनी परिश्रम घेतले.

CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कुसमोड-लक्ष्मीनगर जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १९ जानेवारी-**

माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथील जि. प. प्राथमिक शाळा लक्ष्मीनगर याठिकाणी बाल आनंद मेळाव्यांतर्गत बाल बाजार दिवस पार पडला.



यावेळी पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या भाज्या, किराणा माल, खेळाचे साहित्य, मकेची भाजलेली, शिजवलेली कणसे, बोरे, नारळ, सुकी भेळ, लिंबू यासह वेगवेगळ्या वस्तू, भाजीपाला, शेवग्याच्या शेंगा, अंडी अशा वस्तू तसेच बाजारात विकल्या. मेळाव्याचे उद्घाटन माजी उपसरपंच व शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष संजय पाटील, अध्यक्ष शशिकांत घड्याळे, उपाध्यक्ष स्वाती गारुळे, नंदकिशोर पाटील, ज्ञानेश्वर मदने, सुशिला मदने, विनायक मदने, सतिश गोंजारी, नानासो पवार, दादासो पवार, अक्षय गोंजारी, बाबुराव पवार, सुनिल वाघमोडे, बाबुराव बोडरे, मुख्याध्यापक सुहास कोल्हे, सहशिक्षक सुनिल डुरे, अंगणवाडी सेविका सरगर उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...



## अनंत चैतन्य महाविद्यालयाला जिल्हास्तरीय कृतीशिल शाळा पुरस्कार

**अक्कलकोट, दि. १९ जानेवारी-**

यंदाचा मानाचा जिल्हास्तरीय कृतीशील शाळा पुरस्कार महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूरला प्राप्त झाला. सिंहगड इन्स्टिटय़ूट, सोलापूर येथे पार पडलेल्या कृतीशील पुरस्कार सोहळा दरम्यान महाराष्ट्र राज्य कृती समितीचे संस्थापक व माजी शिक्षक आ. दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते शाल, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रशालेचे मुख्याध्यापक अशोक साखरे यांना गौरवण्यात आले. यावेळी पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, शहाजी माने, अप्पासाहेब काळे, धनंजय जोजन, सुरेश जाधव, शशी अंकलगे, प्रा.काशीनाथ पाटील, रमेश शिंदे, अब्दुल अजीज मुल्ला, शिक्षिका मृदुलादेवी स्वामी, प्रयोगशाळा सहायक स्वामीनाथ कोरे, ग्रंथपाल काशीनाथ हताळे, सेवक शिवप्पा घोडके उपस्थित होते. मुख्याध्यापक अशोक साखरे यांनी या सोहळ्याप्रसंगी प्रशालेला कृतीशील शाळा पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत, समितीचे जिल्हा अध्यक्ष गुरुनाथ वांगीकर व समन्वयक श्री. परमेश्वर होसूरे यांचे आभार मानले. या पुरस्काराबद्दल मुख्याध्यापक, पर्यवेक्षक व समस्त शिक्षक, आ. सचिनदादा कल्याणशेट्टी, संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, माजी प्राचार्य सिध्देश्वर कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, शिक्षण विभाग प्रमुख रूपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पुनम कोकळगी यांनी अभिनंदन केले.



## प्राचार्य बसवराज कुमठेकर यांना कृतिशील मुख्याध्यापक पुरस्कार

**मंद्रुप, दि. १९ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीकडून मंद्रुप येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोकसेवा विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक बसवराज भीमाशंकर कुमठेकर यांना शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्षेत्रातील प्रशंसनीय जनसेवेच्या गौरवार्थ कृतीशील मुख्याद्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सोलापूर विद्यापीठ समोरील केगाव येथील सिंहगड इंन्स्टिटय़ूटमध्ये पुणे विभागाचे माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते जिल्हास्तरीय कृतिशील मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी शिक्षक सोसायटीचे माजी चेअरमन समाधान घाडगे, जिल्हाध्यक्ष गुरुनाथ वांगीकर, संचालक सुभाष भीमणवरु, शिवराया नेल्लुरे, पर्यवेक्षक मदगोंडा मलकारी आदी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष शिवशरण पाटील, सचिव गुरुसिद्ध म्हेत्रे, सहसचिव आप्पासाहेब म्हेत्रे, संचालक शरणप्पा बडगे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दयानंद घाटे यांनी अभिनंदन केले.



## कमलाभवानी मंदिरास कुंभार परिवाराकडून देणगी

**करमाळा, दि. १९ जानेवारी-**

श्रीकमलादेवी मंदिर जतन व संवर्धन कामास गेल्या एक वर्षापासून कामास सुरुवात करण्यात आली आहे. मंदिर जतन संवर्धनाचे काम प्रगतीपथावर असून ट्रस्टचे अध्यक्ष सोमनाथ चिवटे सचिव अनिल पाटील व सर्व विश्वस्त यांनी मदतीचे आवाहन भक्तांकडे केले होते. या आव्हानास प्रतिसाद म्हणून रेवती गोकुळ कुंभार हिच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त आई कमलादेवी महापूजा (भोगी) करून तसेच इतर खर्चाला फाटा देऊन श्री जगदंबा कमलादेवी मंदिर जतन संवर्धन कामास देणगी देऊन आगळ्यावेगळ्या प्रकारे वाढदिवस साजरा केला. गोकुळ कुंभार यांच्याकडून देणगी ५,५५५ देणगी दिली. यानिमित्त त्यांचा सत्कार श्री जगदंबा कमलादेवी देवस्थान ट्रस्टकडून कन्हैयालाल पुराणिक, पद्माकर सूर्यपुजारी यांनी केला. या निमित्ताने श्रीकमलाभवानी मंदिर जतन, संवर्धन कामासाठी भाविकांनी सढळ हाताने मदत करण्याचे आवाहनदेखील मंदिर समितीच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने श्रोते आचंबित

### सहकार महर्षी गणपतराव साठे जयंतीनिमित्त विविध गुणदर्शन कार्यक्रम; माढ्यासह परिसरातील विद्यार्थ्यांनी घडविले कलेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १९ जानेवारी-**

सोलापूर जिल्ह्याचे पाहिले सहकार महर्षी गणपतराव साठे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित माढा महोत्सव २०२५ अंतर्गत शहर आणि परिसरातील शालेय विद्यार्थ्यांचा विविध गुणदर्शन सोहळ्याप्रसंगी सादर केलेल्या कलाविष्काराने श्रोते मंत्रमुग्ध आणि आचंबित झाले.

प्रारंभी सहकार महर्षी साठे यांच्या प्रतिमेचे पूजन सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी नगराध्यक्ष ॲड. मीनलताई साठे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते दादासाहेब साठे, उपनगराध्यक्ष कल्पनाताई जगदाळे, नगरसेवक आदिनाथ माळी, सभापती नितीन साठे, विकास साठे, शिवाजी जगदाळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे, सदस्य प्रवीण पवार, किरण पवार, मुख्याध्यापक नागेश खेडकर, विजय साठे, शैलेंद्र कांबळे, केंद्रप्रमुख विजय काळे, सुरेश माळी, नगरसेविका सुनिता राऊत, रेश्मा लंकेश्वर, रेणुका थोरात, मोहिनी नेटके, नितीन साठे, युवक नेते वेदांत साठे, चंद्रकांत कांबळे आदींसह सहकार महर्षी गणपतराव साठे प्रतिष्ठान, क्रांती क्रीडा मंडळ आणि शहर व परिसरातील शाळांचे शिक्षक, मुख्याध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




दादासाहेब साठे यांनी सहकार महर्षींनी शिक्षणासह जिल्ह्यामध्ये सहकार चळवळ रुजवली. यामुळेच जिल्ह्यात अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या. शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांच्या कार्यामुळे अनेक घरे स्वाभिमानाने उभी राहिली. त्यांनी केलेल्या या कार्याची आठवण राहावी यासाठी त्यांच्या जयंतीनिमित्त माढा शहर आणि परिसरातील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी माढा महोत्सव आपण भरवत असल्याचे सांगितले. उपनगराध्यक्ष कल्पना जगदाळे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन लक्ष्मण राऊत यांनी केले.आभार प्रदर्शन भरत डुचाळ आणि प्रकाश जाधव यांनी केले.

#### दूरदृष्टीचा माढ्याला फायदा

सहकार महर्षी गणपतराव साठे यांनी तत्कालीन काळामध्ये दूरदृष्टी ठेवत माढा शहरात माध्यमिक विद्यालयासह महाविद्यालयाच्या शिक्षणाची सुरुवात करून तमाम सर्वसामान्य जनतेच्या घरात शिक्षणरुपी प्रकाश निर्माण केला. यामुळे या परिसरातील अनेक व्यक्ती जिल्ह्यासह राज्यात विविध मोठमोठ्या पदावर पदावर कार्यरत आहेत. याचे सर्व श्रेय सहकार महर्षी साठे यांना द्यावे लागते, असे गौरवोद्गार मान्यवरांनी काढले.

#### श्रोत्यांकडून दाद

अनेक देशभक्तीपर, प्रबोधनात्मक गाणी, लावणी अनेक रिमिक्स गीतांवर शालेय विद्यार्थ्यांनी ठेका धरला. सादर झालेल्या सुंदर कलाविष्काराने उपस्थित सर्व श्रोत्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना भरभरून दाद दिली.

## मोबाईल, पिकअप चोरणाऱ्या तीन आरोपींना अटक

### ११ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जानेवारी-**

पंढरपूर तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४५ /२०२५ बी एन एस कलम ३०९(६) या रॉबरीच्या गुन्ह्यात तीन आरोपींनी मध्य प्रदेश पासिंगची पिकप गाडी क्रमांक (एमपी ०९ एस ३०१०) या गाडीच्या चालकाला चाकूचा धाक दाखवून चालकाला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून पिकपगाडी जबरदस्तीने चोरून पिकप गाडी घेऊन पळून गेल्याची फिर्याद दाखल करण्यात आलेली होती.



या गुन्ह्यामध्ये आरोपीच्या वर्णनावरून एकूण तीन आरोपी ताब्यात घेण्यात आलेले असून त्यांनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिलेली आहे. आरोपींची नावे गोविंद लिंबा पवार (वय २३ वर्ष राहणार अंकोली तालुका मोहोळ), निबालअहमद शेख (वय २१ वर्ष रा. चिंचोली तालुका पंढरपूर) आणि संच्या मिटकरी (वय ३२ रा.आंबेचिंचोली तालुका पंढरपूर) असे तीन आरोपी ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून फिर्यादीचे दोन मोबाईल फोन एक पिकप गाडी ( क्रमांक मप ०९ एस ३०१०) असा एकूण किंमत रुपये ११ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल पंढरपूर तालुका पोलिसांनी जप्त करून आरोपींना अटक केलेली आहे. गुन्हा घडल्यापासून काही तासात आरोपींना अटक करून गुन्हा उघडकीस आणण्याची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर, पीएसआय भोसले, गजानन माळी, रोकडे पोलीस कॉन्स्टेबल सागर गवळी, आवटी यांच्या पथकाने केली.



## सोलापूरच्या भाविकांकडून श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरास देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जानेवारी-**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीस चंद्रकांत भीमाशंकर फत्तेपुरकर राहणार सोलापूर या भाविकांने धनादेश स्वरूपात एक लक्ष रुपयाची देणगी दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

त्याबद्दल दानशूर भाविकाचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे विभाग प्रमुख राजेश पिटले यांच्या हस्ते उपरणे व श्रीची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांची कुटुंब व विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार उपस्थित होते.

## राज्यस्तरीय भाकरी बनवण्याच्या स्पर्धेत मंदाकिनी जमादार प्रथम

### दोन तासात बनवल्या पातळ, गोल ८२ भाकरी

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १९ जानेवारी-**

सोलापूर येथील ड्रीम फाऊंडेशन जिजाऊ भाकरी केंद्र उद्योग समूहाच्या वतीने प्रथमच आयोजित केलेल्या राज्यस्तरीय भाकरी बनवण्याच्या स्पर्धेत मंदाकिनी संतोष जमादार यांनी प्रथम क्रमांक पटकावल्याने नागणसूर मठाचे मठाधिपती श्रीकंठ शिवाचार्य महास्वामी यांच्या हस्ते फेटा बांधून सन्मानपत्र, पूर्ण आहेर, पुष्पहार, धनादेश देऊन सन्मान सत्कार करण्यात आला.

सोलापूर येथील सुरभी हॉलमध्ये आयोजित केलेल्या राज्यस्तरीय भाकरी बनवणे स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभामध्ये, तीर्थ सोमेश्वर मठाचे बसवराज शास्त्री, मनोरमा मल्टि सोसायटीच्या चेअरमन शोभा मोरे, सामाजिक कार्यकर्ते तानाजी पाटील, उद्योजक कुमार करजगी, किरण पुजारी, संगीता जाधव, शाम धुरी, नितीश वेदपाठक, उल्हास बागेवाडीकर, ड्रीम फाऊंडेशनच्या संयोजिका संगीता भतगुणकी, संस्थापक काशिनाथ भतगुणकी आदी उपस्थित होते. राज्यस्तरीय भाकरी बनवण्याच्या स्पर्धेत दोन तासात चांगल्या रितीने पातळ आणि जास्तीत जास्त भाकरी बनवण्यामध्ये मंदाकिनी जमादार यांनी ८२ भाकरी बनवून सर्वात अव्वल ठरल्या तर त्यांच्या जाऊ अनिता अविनाश जमादार यांनी ६६ भाकऱ्या बनवून उतेजनार्थ बक्षीस पैठणी साडी पटकावल्या आहेत. स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी रेखा सदरखेड व लक्ष्मण सदरखेड यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



## रुग्णांना वेळीच उपचार द्या अन्यथा कारवाई अटळ : आ. कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १९ जानेवारी-**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट ग्रामीण रुग्णालयास अचानक भेट दिली. ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णाची विचारपूस करून सोयी सुविधांची माहिती घेतली.

जनतेच्या आरोग्याची पुरेपूर काळजी घेण्यासाठी अधिकाऱ्यांनी वेळेवर रुग्णांवर उपचार करणे सुविधा देणे गरजेचे असल्याचे सांगितले. वैद्यकीय अधिकारी कर्मचाऱ्यांना सूचना केल्या. रुग्णावर त्वरीत उपचार उपलब्ध होण्याबाबत हयगय झाल्यास हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर त्वरीत कारवाई करण्याचा इशारा आमदार सचिन कल्याणशेट्टी योनी यावेळी दिला. लवकरच दोन-तीन दिवसांमध्ये स्वतंत्र बैठक लावणार असल्याचे आमदार कल्याणशेट्टी यांनी सांगितले. ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक अशोक राठोड, डॉ. निखिल क्षीरसागर, डॉ. सुनिल बिराजदार, भाजपा तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, आरपीएफ तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे, पदाधिकारी व ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी उपस्थित होते.



## अवैध वाळू वाहतुकीवर सहा ठिकाणी कारवाई; साडेचार लाखांचा दंड वसूल

### पंढरपूर महसूल विभागाची धडक मोहीम; एक जेसीबी जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १९ जानेवारी-**

अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. महसूल पथकाने चिंचोली भोसे (ता. पंढरपूर) येथील भीमा नदीपात्रात अवैध वाळू उपसा करण्यासाठी येणारा एक जेसीबी क्रमांक (क्र. एम. एच. १०/ एस. ७५२२) आज जप्त करण्यात आला आहे. तसेच ३ ते १९ जानेवारी या कालावधीत महसूल पथकाने तालुक्यात विविध ठिकाणी अवैध वाळू वाहतूकीवर कारवाई करुन चार लाख ५१ हजार ७०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील अवैध वाळू उपसा रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार सचिन लंगुटे यांनी विविध पथकांची नेमणूक केली आहे. चिंचोली भोसे (ता. पंढरपूर) येथे भीमा नदी पात्रात अवैध वाळू उत्खनन करून पळून जाताना आज एक जेसीबी जप्त करण्यात आला असून सदर वाहन शासकीय धान्य गोदाम येथे ठेवण्यात आले आहे. तसेच ३ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत तालुक्यात अनवली, रोपळे, गुरसाळे, ओझेवाडी, चिंचोली तसेच पंढरपूर शहरातील जुना दगडी पुल या ठिकाणी अवैध वाळू उत्खनन व वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दोन जेसेबी, चार वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच मौजे ओझेवाडी येथील २.५० ब्रास वाळूसाठा नष्ट करण्यात आला आहे.



#### कारवाईतील अधिकारी

चिंचोली भोसे येथील कारवाईमध्ये पथक प्रमुख मंडळाधिकारी रवींद्र शिंदे, विजय शिवशरण, ग्राम महसूल अधिकारी संजय खंडागळे, सुमित जाधव, संदीप शिंगारे, महेशकुमार सावंत, गणेश पिसे, महसूल सेवक कुंडलिक शिंदे सहभागी होते.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आलियाबाद ग्रा पं.ला दिल्लीच्या प्रजासत्ताक दिनाचे विशेष निमंत्रण

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१९ जानेवारी -**
तुळजापूर तालुक्यातील विविध पुरस्कार प्राप्त असलेल्या आलियाबाद ग्रामपंचायत कार्यालयाच्या सरपंच व कुटुंबाला नवी दिल्ली येथे पार पडणाऱ्या भारतीय प्रजासत्ताक दिन व परेडसाठी उपस्थित राहण्याचे निमंत्रण आले आहे. धाराशिव जिल्ह्यातून आलियाबाद ग्रामपंचायतला पहिल्यांदाच हा मान मिळाला आहे.

आलियाबाद ग्रामपंचायतने नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी अनेक योजना राबवल्या आहेत. या ग्रामपंचायतचे सरपंच म्हणून सलग ५० वर्ष दलितमित्र स्व. मोतीराम नंदू चव्हाण यांनी काम केले होते. स्व. मोतीराम चव्हाण यांच्या कार्यामुळे आलियाबादचे नाव चर्चेत होते. त्याच पद्धतीने जिल्हा परिषद माजी सदस्य प्रकाश चव्हाण यांनी व त्यांच्या माजी सरपंच ज्योतिका चव्हाण यांच्या कार्यकाळात आलियाबादचे नाव ग्रामपंचायत सदस्य व गावकऱ्यांच्या सहकार्याने राष्ट्रीय पातळीवर नेले. सध्या या ग्रामपंचायतवर प्रकाश चव्हाण यांचे बंधू सूर्यकांत चव्हाण हे सरपंच म्हणून कार्यरत आहेत. विद्यमान सरपंच सूर्यकांत चव्हाण व त्यांच्या कुटुंबीयांना भारतीय प्रजासत्ताक दिनाला व परेड साठी दिल्ली येथे उपस्थित राहण्याचे निमंत्रण आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### बाबासाहेबांचा पुतळा जयंतीपूर्वी उभारा

**तुळजापूर, दि.१९ जानेवारी -**
शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम आ. राणाजगजीतसिंह पाटील यांच्या पुढाकारामुळे चालू झालेले आहे. तरी सदरील डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे काम हे त्यांच्या जयंती पूर्वी पूर्णकरावे जेणेकरून जयंती उत्सव उत्साहात साजरा करण्यात येईल अशा प्रकारचे निवेदन समस्त भीमनगरवासीय यांनी दि.१८ जानेवारी रोजी आ. पाटील यांना दिले. सदरील पूर्णाकृती पुतळ्याचे व शुभेकरणाचे काम हे जयंतीपूर्वी पूर्ण करून घेण्याचे आश्वासन दिले. यावेळी राजरत्न कदम, सागर कदम, अभिजीत कदम, अक्षय कदम, सोनू कदम, दर्शन कदम व सचिन रोचकरी, शांताराम पेंदे, संदीप गंगणे, धैर्यशील दरेकर व नागरिक उपस्थित होते.



### नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार

**उमरगा, दि.१९ जानेवारी -**
जिजाऊ ब्रिगेड धाराशिव जिल्हा नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल युवती सेना मराठवाडा निरीक्षक ॲड. आकांक्षा ज्ञानराज चौगुले यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. विभागीय कार्याध्यक्ष शिवमती सुनंदा माने, धाराशिव जिल्हाध्यक्ष शिवमती रेखा पवार, जिल्हा कार्याध्यक्ष शिवमती संध्या शिंदे, विभागीय सचिव शिवमती मंजुषा चव्हाण या नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

### धाराशिवात आज लोकशाही दिन

**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**
धाराशिव तहसील कार्यालय येथे तिसऱ्या सोमवारी म्हणजे २० जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी तालुक्यातील नागरिकांनी आपल्या तक्रारी निकाली काढण्यासाठी अर्ज केल्याप्रमाणे आपल्या लेखी तक्रारीसह उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार, धाराशिव यांनी केले आहे.



### वेदप्रकाश यांना आदरांजली


**उमरगा, दि.१९ जानेवारी -**
उमरगा येथील आयटीआय महाविद्यालयास महाराष्ट्र शासनातर्फे मराठवाडा मुक्तीसंग्रामातील पहिले बलिदानी हुतात्मा वेदप्रकाश यांचे नाव देण्यात आले आहे. या विशेष प्रसंगी आज आर्य समाज सभागृह, गुंजोटी येथे एकत्र येऊन आनंद साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभात हुतात्मा वेदप्रकाश यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी माननीय डॉ. राजाराम निगडे यांनी हुतात्मा वेदप्रकाश यांच्या मुक्तिसंग्रामातील अमूल्य योगदानावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमात विश्वनाथ कदेरे, महाळप्पा दूधभाते, विष्णू खंडागळे, संजीवन कुंभार, डॉ. राजाराम निगडे, संतोष वकारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# तुळजाभवानी मंदिरातील पीआरओ कक्ष कायमच कुलूपबंद

**जनसंपर्क कक्षात असलेल्या रिकाम्या खुर्चीसमोर जनसंपर्क अधिकारी कर्मचाऱ्यांची वाट पाहत भाविक त्रस्त...**

### नवीन भरती झालेल्या कर्मचारी, अधिकारी यांचा कामात असणारा हलगर्जीपणा चव्हाट्यावर...



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ जानेवारी -**
महाराष्ट्राची कुल कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने तुळजाभवानी देवीच्या मंदिरात येतात. तुळजाभवानी प्रशासकीय कार्यालयामध्ये भाविकांच्या सोयीसाठी असलेले जनसंपर्क कक्ष नेहमीच बंद असतो. या कक्षाचा दरवाजा नेहमीच लॉक केलेला असतो. भाविक मंदिरातील दर्शनाच्या संदर्भात चौकशीसाठी जेव्हा जनसंपर्क अधिकारी यांना भेटण्यासाठी येतात तेव्हा नेहमीच जनसंपर्क कार्यालयाचा कक्ष लॉक केलेला असतो.

तर या ठिकाणी कुठलाही अधिकारी कर्मचारी उपलब्ध नसतो. काचातून आत पाहिले असता रिकाम्या टेबल खुर्च्या दिसतात. भाविक जनसंपर्क कार्यालयाच्या समोर हा कक्ष उघडण्याची वाट बघतात.

तुळजाभवानी मंदिर संस्थांनी नुकतेच नवीन कर्मचारी भरती केली असून नवीन नियुक्त झालेले कर्मचारी अधिकारी काम करताना हलगर्जीपणा करतात.

हे नेहमीच बंद असलेल्या जनसंपर्क कक्षावरून नागरिकांच्या लक्षात येते आहे. नवीन कर्मचारी भरती झाल्यानंतर मंदिरातील भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधेत वाढ होणे अपेक्षित आहे. पण तसं होत नसल्याचे चित्र समोर येत आहे.

भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी या कार्यालयात नेहमी कर्मचारी, अधिकारी उपस्थित राहावेत आणि जनसंपर्कासाठी असलेला कक्ष देखील नेहमीच भाविकांच्या सोयीसाठी उघडा ठेवण्यात यावा. जेणेकरून भाविकांची गैरसोय होणार नाही, अशी मागणी भाविकांमधून होत आहे.

रविवारी सकाळी साडेअकरा बाराच्या दरम्यान तुळजाभवानी मंदिर प्रशासकीय कार्यालयातील जनसंपर्क कक्षात कुठलाही अधिकारी कर्मचारी उपलब्ध नसून हा कक्ष बंद असल्याचे दिसत आहे.

## मालट्रक-मोटारसायकलची धडक; एकजण जागीच ठार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ जानेवारी -**
सोलापुर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर नळदुर्ग जवळ काली मस्जिद ते जुना नाका परीसरात महामार्गावार दि.१९ जानेवारी रोजी सकाळी साडेसात ते आठ वाजण्याच्या सुमारास मालवाहतुक मालट्रक आणि मोटार सायकल यांच्यात धडक होऊन झालेल्या अपघातामध्ये नळदुर्ग येथील युवक अमित खंडेराव नागणे (वय ३५) हा गांभीर जखमी होऊन जागीच ठार झाला तर त्याचा बंधु शिवराम नागणे हा जखमी झाला आहे. या अपघातानंतर संतप्त झालेल्या नागणे कुटुंब व नागरीकांच्या वतीने जवळपास तीन तास राष्ट्रीय महामार्गावार ठिय्या मारून महामार्ग बंद केला होता. त्यामुळे चार किलोमीटर पेक्षा जास्त लांब महामार्गावार वाहनांची रांग लागली होती.

सकाळी साडेसात ते आठच्या दरम्यान नळदुर्ग येथील शिवराम खंडेराव नागणे व अमित खंडेराव नागणे हे दोन सख्खे भाऊ आपली मोटार सायकल क्र. एम. एच. २५/ए ४६८५ वरून नेहमीप्रमाणे आपलं घर जवळ असणाऱ्या शेताकडे चालले होते.

शहरातुन राष्ट्रीय महामार्गावार आल्यानंतर नळदुर्गकडुन उमरग्याकडे जाणारा मालवाहतुक मालट्रक क्र. जी.जे. ३६ व्ही. ८२६८ या मालट्रकने पाठीमागुन नागणे यांच्या मोटार सायकलला जोराची धडक दिली या धडकेनंतर मोटार सायकल खाली पडली यावेळी अमित नागणे (वय ३५) हा महामार्गावर पडल्यानंतर तो मालट्रकमध्ये अडकला मालट्रक चालकाने यावेळी गाडी न थांबवता बेदकारपणे चालवीत तसेच पुढे घेऊन गेला.

यावेळी तब्बल २०० फुट लांब फरफटत मालट्रकने अमितला नेले यामध्ये गंभीर जखमी होऊन अमित जागीच ठार झाला. तर दैव बलवत्तर म्हणुन अमितचा भाऊ शिवराम नागणे हा जो मोटार सायकल चालवीत होता तो महामार्गावर न पडता पलीकडच्या बाजुला पडला म्हणुन तो बचावला यामध्ये तो किरकोळ जखमी झाला आहे.

तीन तासानंतर नळदुर्ग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे व त्यांच्या सहकाऱ्यांनी आंदोलन कर्त्यांची समजुत काढुन ३० जानेवारीच्या आता राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक नळदुर्ग बायपास मार्गे सुरु करण्याबरोबरच या अपघातास कारणीभुत असणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलनकर्त्यांनी आपले आंदोलन मागे घेतले.

## तेरणा पब्लिक स्कूलचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**
शहरातील तेरणा पब्लिक स्कूलचे (सीबीएसई) दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. याप्रसंगी पहिल्या दिवशी समाज प्रबोधनकार व्याख्याते वसंत हंकारे यांचे तर दुसऱ्या दिवशी जिल्हा परिषद शाळेचे आदर्श शिक्षक, वक्ते बालाजी जाधव यांचे व्याख्यान झाले. या दोन दिवसीय वार्षिक स्नेह संमेलनात शाळेतील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध गीतावर नृत्य करून उपस्थितांनी मने जिंकली.

तेरणा पब्लिक स्कूलचे यंदाचे ५२ वे वार्षिक स्नेहसंमेलन होते. संस्थेचे अध्यक्ष पद्माकर फंड, उपाध्यक्ष नितीन भोसले, सचिव रत्नदीप वाकुरे, कोषाध्यक्ष संजय पाटील, सहसचिव पृथ्वीराज फंड, व्याख्याते वसंत हंकारे, बालाजी जाधव, प्राचार्य विलास मोरे, प्राचार्य विलास बचाटे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन शिक्षक संतोष राऊत यांनी केले. आभार आनंद सांगुळे यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामविकास अधिकाऱ्याची माणुसकी; घोगरेंनी वाढदिनी दिले धान्याचे किट



**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१९ जानेवारी -**
ज्या गावात ग्रामसेवक किंवा ग्रामविकास अधिकारी म्हणून काम करतात. अशा ग्रामसेवकांचा वाढदिवस सहसा साजरा होत नाही. तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथील ग्राम विकास अधिकारी यांनी ज्या गावची सेवा आपल्या हातून होत आहे. त्या गावचे ऋण आपल्यावर असतात. अशा स्नेह बंधनातून खुदावाडी गावचे ग्राम विकास अधिकारी संजय घोगरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त खुदावाडी गावातील गरजू महिलांना साडी, चोळी व धान्याचे कीट वाटप करून आपल्या स्नेहबंधनाचे स्नेह अधिक दृढ केले.

संजय घोगरे हे बऱ्याच वर्षापासून खुदावाडी ग्रा.पं. कार्यालयाचे ग्राम विकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. गावातील गरजू महिलांना व कुटुंबांना साडी, चोळी व धान्याचे कीट देऊन त्यांनी सर्वसामान्य नागरिक यांच्यात वाढदिवस साजरा करुन हे स्नेहबंध अधिक दृढ केले आहे.

याप्रसंगी ग्रा.प.च्यावतीने सरपंच सरोजिनी रेवणसिद्ध कबाडे, शरणाप्पा कबाडे, सावंत पवार, ताराबाई पवार, ग्रा.पं. सदस्यांनी त्यांचा सत्कार केला.

## युवकांनी डिजीटल साक्षर होणे ही काळाची गरज आहे : प्रा. मुल्ला

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१९ जानेवारी -**
युवकांनी इतर कौशल्यासोबतच डिजिटल साक्षर असणे ही आज काळाची गरज असुन त्यासाठी शासन सुद्धा अनेक योजना विद्यार्थ्यांसाठी राबवत आहे. विद्यार्थ्यांनी अशा योजनाचा लाभ घेऊन स्वतः साक्षर होणे हि काळाची गरज़ असल्याचे मत मायक्रोकॉमचे संचालक प्रा. युसुफ मुल्ला यांनी व्यक्त केले.



श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष निवासी शिबिर जकेकुरवाडी येथे चालू असून या गुरूवारी (ता.१६) शिबिराच्या दुसऱ्या दिवशी प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. युसुफ मुल्ला यांनी डिजिटल लिटरसी ही काळाची गरज या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. तंटामुक्त समितीचे सदस्य तानाजी पाटील अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणुन रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. गिरीधर सोमवंशी, डॉ. भरत शेळके, प्रा. मुरलीधर जाधव, प्रा.डी.डी पांढरे, प्रा.एम.डी.गायकवाड डॉ.व्ही.एम गायकवाड, डॉ. एस.एल राठोड, डॉ.आर.एम. सूर्यवंशी प्रा.एस.आर. चव्हान, प्रा. विजय पवार उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा. मुल्ला म्हणाले की,

आज संगणकाने माणसाचे सारे जीवनच व्यापून टाकले आहे. पोस्ट सेवा, बँका, आणि विविध कार्यालयांतील सर्व कामे आत्ता संगणकाद्वारेच केली जातात.

ग्राहकांच्या खात्यामध्ये किती ठेव शिल्लक आहे हे आत्ता एका क्लिकवर समजते. रेल्वे, विमाने, चित्रपट यांसारख्या तिकिटांचे आरक्षण संगणकाद्वारेच घरबसल्या करता येते. आजकाल सर्व महत्वाच्या परीक्षा या संगणकाद्वारेच घेतल्या जातात संगणकाद्वारे नोकरीबरोबरच कार्यालयातील कामे सुद्धा काही जन घरीच बसून करतात आणि इंटरनेटच्या मदतीने कार्यालयात पाठवतात असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भरत शेळके यांनी केले. सूत्रसंचालन शेखर सूर्यवंशी यांनी केले तर उपस्थित आमचे आभार अभिषेक मिसाळ यांनी मांडले.

## स्मशानभूमीच्या नोंदसाठी मार्डीतील ग्रामस्थांनी दिला आत्मदहनाचा इशारा



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१९ जानेवारी -**
लोहारा तालुक्यातील मार्डी येथील पारंपारिक बौद्ध (महार) समाजाच्या स्मशानभूमीची नोंद कागदपत्रे कोठेही करण्यात आली नसून ही नोंद तात्काळ ग्राम पंचायत कार्यालयातील आठ अ व तहसील कार्यालयातील सातबारा आठ अ वर व इतर कागदपत्रावर तात्काळ घेण्यात यावी याबदल मार्डी येथील ग्रामस्थांच्या वतीने तहसीलदार यांना निवेदनाद्वारे आत्मदहन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

दि.७ नोव्हेंबर २०२४ रोजी कांताबाई शंकर भालेराव या मयत झाल्यानंतर सध्याचे गट क्रमांक १०२ सातबारा वरील मालक प्रफुल्ल देवकर यांनी कांताबाई भालेराव यांचा अंत्यविधी अडवला होता. त्यानंतर प्रफुल्ल उमाजी देवकर (पाटील) यांनी राजेंद्र भिवा बंडगर यांच्याकडून सण २०१९ ते २०२० मध्ये खरेदी केलेला आहे, परंतु निजाम काळापासून या १०२ गटांमध्येच बौद्ध समाजाचे लोक पारंपारिक पद्धतीने अंत्यविधी करत होते. २०२४ पर्यंत या ठिकाणी अंत्यविधी करण्यासाठी कसल्याही प्रकारचा कोणीही कसलाही अडथळा केलेला नव्हता. परंतु राजेंद्र भिवा बंडगर यांनी त्यांच्या काही अडचणीमुळे जमीन विक्रीला काढली आणि स्मशानभूमीच्या जागेसह संपूर्ण गट हा प्रफुल्ल उमाजी देवकर (पाटील) व देवकन्या प्रफुल्ल देवकर (पाटील) यांना विक्री केली आणि यांनी फेर एप्रिल २०२० मध्ये करून घेतला आणि या चार वर्षांमध्ये दोन व्यक्तीची मयत झाली. त्यावेळी देखील या गट क्रमांक १०२ मध्येच मयत व्यक्तीचा अंत्यविधी करण्यात आला. परंतु नोव्हेंबर २०२४ मध्ये कांताबाई भालेराव यांचा ज्यावेळी मृत्यू झाला.

त्यावेळी प्रफुल्ल उमाजी देवकर (पाटील) यांनी व त्यांचे बंधू यांनी अंत्यविधी रोखून प्रफुल्ल देवकर यांच्या भावांनी समाजातील लोकांना अर्वाचे भाषेत शिवीगाळ केली व हायवाच्या टायर खाली चिरडून मारण्याची धमकी दिली. यानंतर मार्डी येथील सर्व बौद्ध समाजाच्या लोकांनी स्वाक्षरीनीशी तहसिल कार्यालयात याबाबत स्मशानभूमीची नोंद करण्यात यावी म्हणून तहसीलदार यांना निवेदन दिलेले होते. तहसिल कार्यालयाने एक ते दोन महिने झाले. तरी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार नकरता व स्मशानभूमीच्या बाबत केलेला नाही. यावरून तहसिल कार्यालयाकडून स्मशानभूमीची नोंद घेण्यासाठी टाळाटाळ होत असल्याचे दिसून येते.

तरी आपण येत्या प्रजासत्ताक दिनी दि.२६ जानेवारी रोजी पर्यंत याबाबत काहीतरी ठोस निर्णय घेण्यात घ्यावा अन्यथा याबाबत आपल्या कार्यालयाने कोणताही निर्णय न घेतल्यास दि.२६ जानेवारी रोजी आपल्या कार्यालयासमोर ध्वजारोहणाच्या वेळी सामूहिक आत्मदहन करण्यात येईल याची खबरदारी घ्यावी व होणाऱ्या परिणामास आपले संपूर्ण तहसील प्रशासन पंचायत समिती प्रशासन जबाबदार राहील याची दखल घ्यावी असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या दिवेदनावर उत्तम भालेराव, शंकर भालेराव, कलाप्पा दुपारगुडे, संजय भालेराव, सतिष भालेराव, प्रल्हाद मस्के, दिगंबर कांबळे आदींच्या सह्या आहेत.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण करावे : प्रा. महेंद्र चंदनशिवे



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ जानेवारी -**
येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात प्रा.महेंद्र चंदनशिवे बोलत होते.

सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. प्रा. महेंद्र चंदनशिवे म्हणाले की, जगातील सर्वात बुद्धिमान विद्यार्थी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे पाहिले जाते.

त्याचबरोबर जगातील बुद्धिमान व्यक्तीमधील पहिली व्यक्ती म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होते.

त्यांनी अनेक प्रकारच्या पदव्या अभ्यासाच्या जोरावर प्राप्त केल्या. एक विद्यार्थी म्हणून जीवनामध्ये पुढे जात असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा असे ते यावेळी म्हणाले.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य तथा श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मराठवाडा विभाग प्रमुख डॉ. जयसिंगराव देशमुख हे होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र अभ्यास करून देशाला जगातील सर्वात मोठी राज्यघटना दिली. आणि सर्व देशातील लोकांना समान अधिकार प्राप्त करुन दिले, असे ते म्हणाले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरविंद हंगरगेकर, प्रस्ताविक डॉ. शिवाजी गायकवाड तर आभार प्रा. माधव उगले यांनी मानले. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयसिंगराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# बस- मोटारसायकलच्या धडकेत बाप- लेकीचा करुण अंत

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १९ जानेवारी**

साप चावलेल्या आपल्या पत्नीला मोटारसायकलवर डबा घेऊन उमरी ग्रामीण रुग्णालय कडे येत असलेल्या मोटर सायकलला उमरीकडुन येणाऱ्या नांदेड -धर्माबाद बसने जबर धडक दिल्याने या अपघातात चिंचाळा येथील मोटारसायक स्वार जागीच ठार झाला. मोटारसायकल वर बसलेली मुलगी गंभीर जखमी झाल्याने उपचारा दरम्यान तिचा मत्यू झाला तर मुलगा गंभीर जखमी झाल्याची घटना सायंकाळी सात वाजता कारेगाव रस्त्यावरील चिंचाळा शिवारात घटना घडली. उमरी तालुक्यातील चिचांळी बाप-लेकीवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

चिचांळा येथिल रहिवाशी संभाजी विठ्ठल कंधारे वय ४५ मुलगा विकास संभाजी कंधारे वय १२ वर्ष , व मुलगी विद्या संभाजी कंधारे वय सहा वर्ष हे तिघे चिंचाळयाहुन आपल्या आजारी आईला उमरी ग्रामीण रुग्णालयात जेवनाचा डब्बा घेऊन येत असताना समोरुन येणाऱ्या नांदेड धर्माबाद बस क्रमांक एम. एच. २० बी.एल १९८० ने जोरदार धडक दिल्याने मोटर सायकल संभाजी कधारे हे जागीच ठार झाले. तर मुलगा विकास संभाजी कंधारे मुलगी विद्या संभाजी कंधारे गंभीर जखमी झाल्याने सदर घटनेची माहिती मिळताच जखमींना उमरी ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. असता वैद्यकीय अधिकारी डॉ. एम. एम. टोम्पे यांनी जखमीनवर प्राथमिक उपचार करून जबर मार असल्याने पुढील उपचारासाठी नांदेडला पाठविण्यात आले. सदर घटनेची माहिती मिळताच उमरी पोलीस ठाण्याचे सपोनि अंकुश माने यांनी व पोलीस जमादार अब्दुल रियाज यांनी घटनास्थळी दाखल होत घटनेची माहिती घेवून संबंधीत चालकाविरुद्ध गन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक अंकुश माने हे वरिष्टाच्या सल्यानुसार जोमाने तपास करीत आहेत .




# ग्रामपंचायत कार्यालय संगमवाडी येथे हळदी-कुंकू समारंभ



**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. १९ जानेवारी**

दरवर्षीप्रमाणे संगमवाडी व काशीराम तांडा ग्रामपंचायत कार्यालयातर्फे दिनांक १८ जानेवारी रोजी घेण्यात आलेल्या हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

हळदी-कुंकूवा मागील धारणा अशी आहे की प्रत्येक सुवासिनी ही साक्षात आदिशक्तीचे प्रतीक आहे. त्यांना हळद-कुंकू लावताना आपण त्यांच्या माध्यमातून देवीचे तत्त्व जागृत करतो. यामुळे केवळ आध्यात्मिकच नाही, तर आपल्या घरात सकारात्मक ऊर्जा देखील निर्माण होते. या सोहळ्यामध्ये सुवासिनींना वाण देणे, उखाणे, गाणी, खेळ आणि गोडधोड पदार्थांचा आनंद घेतात .

हळदी कुंकू समारंभ हा हिंदू संस्कृतीचे जपणूक करणारा समारंभ आहे. या समारंभाच्या माध्यमातून महिला एकत्र येतात, हळदी कुंकू करतात, वाण लुटतात त्यामुळे त्यांची एकमेकींशी ओळख होते आणि स्नेह वाढतो. माणूसच माणसाच्या मदतीला धावून येतो. या झालेल्या ओळखीतून महिला एकमेकींना अडचणीत मदत करून पुढे जाऊ शकतात. आपणास काही अडचण जाणवली, समस्या जाणवली तर आवाज द्या मी नक्की तुमच्या अडचणी समस्या सोडवण्याचा प्रयत्न करेल असे संगमवाडी च्या सरपंच सौ सुरेखा चक्रधर घुगे म्हणाल्या .

ग्रामपंचायत कार्यालय संगमवाडी आयोजीत 'सौभाग्याचे लेणं' हळदीकुंकू समारंभ मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले . यावेळी सरपंच सौ. सुरेखा चक्रधर घुगे ,उपसरपंच सौ अंजना कोंडीबा करेवाड , सदस्य सौ चांगुना ज्ञानोबा घुगे, सदस्य कविता उत्तम चव्हाण यांच्यासह गावातील महिलावर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होत्या .

## संक्षिप्त वृत्त

### सप्तरंगी साहित्य मंडळाचे चौथे जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन

**मुदखेड-** प्रज्ञादर्शन शिक्षण संस्था मुदखेड व सप्तरंगी साहित्य मंडळ, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील रणछोडदास मंगल कार्यालय येथे दि. २७ जानेवारी रोजी सप्तरंगी साहित्य मंडळाच्या चौथ्या जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेत सप्तरंगी साहित्य मंडळानी चौथ्या जनसंवाद ग्रामिण साहित्य संमेलनच्या स्वागताध्यक्षपदी प्रविण गायकवाड यांची निवड करण्यात आली. या संमेलनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खा. अशोक चव्हाण यांच्या हस्ते होणार असून संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम यांची निवड करण्यात आली आहे. या संमेलनासाठी आ. ॲड. श्रीजया चव्हाण, माजी संमेलनाध्यक्ष कवी अनंत राऊत, पाणी चित्रपट फेम अभिनेत्री माधुरी लोकरे, आंतरराष्ट्रीय ख्यातकीर्त लावणी बालकलाकार डॉ. विद्याश्री येमचे यांच्यासह उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टे, तहसीलदार आनंद देऊळगावकर, पोलिस निरिक्षक वसंत सप्रे, नपचे मुख्य कार्यकारी अधिकारी शैलेश फडसे, गटशिक्षणाधिकारी रुस्तुम आडे, माजी गटशिक्षणाधिकारी दिलिप सुपे, ओबीसी चळवळीतील राष्ट्रीय नेते एस. जी. माचनवार यांची उपस्थिती राहणार आहे. दिवसभरात ग्रंथदिंडी, चित्र व नाणी प्रदर्शन, पुरस्कार वितरण, परिसंवाद, प्रकाशने, कथाकथन, गझलसंध्या, कविसंमेलन अशा विविध स्तरांतून साहित्य संमेलन संपन्न होणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष प्रविण गायकवाड निमंत्रक प्रा.प्रल्हाद इंगोले, सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर यांनी शासकिय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत दिली आहे.

### येरगीचे सरपंच प्रजासत्ताक दिनी जाणार दिल्लीला

**देगलूर-** नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिना दिवशी लाल किल्ल्यात होणाऱ्या परेडमध्ये विशेष अतिथी म्हणून नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगीच्या येथील सरपंच सौ.संगीता



मठवाले पाटील व त्यांचे सुपुत्र ग्रामपंचायत सदस्य,भाजपा जिल्हाउपाध्यक्ष तथा संजय गांधी निराधार योजना देगलूर चे अध्यक्ष संतोष पाटील यांना आमंत्रित करण्यात आले आहे. या संदर्भात नुकतेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र प्राप्त झाले आहे.या वर्षीच्या दिल्ली येथे संपन्न होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडकरिता जिल्ह्यातून येरगी ग्रामपंचायत ची निवड झाली आहे. तर येरगीमुळे देगलूर तालुक्याला हा बहुमान प्रथमच मिळाला आहे. नवी दिल्ली येथे भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये उपस्थित राहण्यासाठी राज्यातून प्रत्येक जिल्ह्यातून ग्रामपंचायत सरपंचांची नावे (त्यांच्या कुटुंबासह) केंद्रशासनाच्या सूचनांनुसार निवड करण्यात आली आहे. या संदर्भात डॉ. प्र. सु. गांगुर्डे कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचे पत्र संबंधित विभागाला प्राप्त झाले. तालुक्यातील महिला सरपंचाला प्रथमच हा बहुमान मिळाल्याने त्यांचे जिल्हा व तालुका प्रशासन,सरपंच संघटना, ग्रामसेवक संघटना,तसेच गावकरी व पंचायत समितीचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

### शासकीय चित्रकला परिक्षेत भाऊसाहेब देशमुख विद्यालयचे १०० टक्के निकाल

**मुक्रमाबाद-** प्रति वर्षाप्रमाणे कला संचालनालय मुंबई, महाराष्ट्र शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परिक्षा घेतले जातात.मुक्रमाबाद



येथील भाऊसाहेब देशमुख विद्यालयचे मागील २५ वर्षा पासून विद्यालयाचा निकाल १०० टक्के असतो . निकालाची परंपरा याही वर्षी राखली आहे. दोनही परिक्षेचा निकाल १००% लागला आहे. एलीमेंटीला एकूण १०१ विद्यार्थी A ग्रेड ६, B ग्रेड २८,C ग्रेड ६७, विद्यार्थी पास झाले व इंटरमिजीएटला एकुण ९० विद्यार्थी बसले होते. ग्रेड ४ ,B ग्रेड १५ ,C ग्रेड ७१ विद्यार्थी पास झाले आहेत. कु. शटकार आरती व कु.बोधने अमृता इंटरमिजीएट ग्रेड मध्ये ग्रेड मध्ये पास झाले आहेत.वरिल विद्यार्थ्यांना कलाशिक्षक बनवा सर व काळे सर यांचे मार्गदर्शन लाभले.उत्तिर्ण सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक बी.मोरे व सचिव रामराव भोसले.व अध्यक्ष आशुतोष पाटील व सर्व शिक्षकांनी कौतुक व अभिनंदन केले आहे.

### आदमपूर ग्रामीण शेत शिवार परिसरात आंबा मोहरला

**बिलोली-** बिलोली तालुक्यातील आदमपूर परिसरातील काही भागात,शेत शिवारात किंवा बांधावर तुरळक असणाऱ्या आंब्याच्या झाडांना मागच्या कडाक्याच्या थंडीत तुडुंब मोहोर लगडलेला दिसून आला आहे. आंब्याला आलेला मोहोर पाहता यंदा गावरानी आंब्याची रसाळी चव शेतकरी तथा सर्वसामान्य नागरिकांना चाखायला मिळेल असे दिसते आहे.

# जनक्रांती वाचनालयातील वाचन संकल्प महाराष्ट्राचा अभियानाला विद्यार्थी व वाचकांचा मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**बिलोली,दि. १९ जानेवारी**

वाचन संस्कृतीचा विकासाव्हावा तसेच तरुण पिढीला प्रत्यक्ष ग्रंथ वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी शासनाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतर्गत बिलोली शहरातील जनक्रांती वाचनालयाच्या वतीने आयोजित या उपक्रमात शहरातील विविध शाळेच्या विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक व वाचकांनी मोठा सहभाग नोंदवला होता.

यावेळी जिल्हा ग्रंथ अधिकारी अनिल सुर्यवंशी, वाचनालयाचे अध्यक्ष माजी आमदार गंगाधर पटने, मनोज जाधव, सिद्धार्थ पवार,जनक्रांती वाचनालयाचे ग्रंथपाल सुभाष पाटील, कलावती चौधरी, दिगंबर बिलोलीकर यांच्यासह वाचकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भोकर सा.बां.विभागात झालेल्या विविध कामाची चौकशी करा : अमोल पवार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ जानेवारी**

भोकर येथील सा.बा.विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या मागील चार वर्षाच्या कार्यकाळात अनेक बोगस कामे झाली असून आपल्या मर्जितल्या गूत्तेदारांना हाताशी धरुन इंटरनल टेन्डर प्रक्रियेत मॅनेज करुन बोगस पध्दतीने अत्यंत हलक्या दर्जाची कामे करण्यात आली२०२१-२०२४ या कार्यकाळात झालेल्या विविध कामाची चौकशी करण्याची मागणी शिवसेनेचे भोकर तालूका प्रमूख अमोल धनराज पवार यांनी राज्याचे मूख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद केले की,मागील चार वर्षाच्या कार्यकाळात भोकर सार्वजनिक विभागात कूठल्याही शासन नियमाचे पालन न करता सि.सि.रोड बांधकाम ड्रेनेज बांधकाम खड्डे बूजविणे हि कामे अंदाजपत्रकानूसार कामे न करता थातूर मातूर कामे करण्यात आली व बिले उचलण्यात आले दहा लाखाच्या आतील अनेक कामे कागदोपत्री दाखवून प्रत्यक्ष कोणतेही काम न करता बिले मंजूर करुन ती उचलण्यात आल्याचे नमूद करण्यात आले सर्व कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निवेदनात नमूद केले आहे. अधिकारी व गूत्तेदार यांच्या सहमतीने शासनाच्या कोट्यावधी चा निधीची विल्हेवाट लावण्यात आली सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी याकडे लक्ष घालून झालेल्या सर्व कामाची उच्चस्तरीय चौकशी करुन संबधित गूत्तेदारांचे नाव काळ्या यादीत टाकण्यात यावे भोकर सा.बां.वि.चे कार्यकारी अभियंता चार वर्षापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याने मर्जीतील गूत्तेदारांना हाताशी धरुन बोगस कामे करण्यात आली दरम्यानच्या कार्यकाळात सा.बां.वि.भोकर मध्ये किती कामे करण्यात आली व ती किती रक्कमेची होती याची चौकशी व्हावी व कामाचा दर्जा तपासण्यात यावा चार वर्ष एकाच ठिकाणी कार्यकारी अभियंता कसे राहू शकतात याची देखील चौकशी करण्याची मागणी शिवसेनेचे भोकर तालूका प्रमूख अमोल धनराज पवार यांनी राज्याचे मूख्यमंत्री देवेंद्र फडणविस उपमूख्यमंत्री एकनाथराव शिंदे बांधकाम मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# सेवानिवृत्त शिक्षकाचे थकित वेतनाचे हप्ते तात्काळ मिळणार

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. १९ जानेवारी**

नायगांव पंचायत समितीच्या प्रांगणात सेवानिवृत्त शिक्षकांनी सातव्या वेतन आयोगातील तिस-या व चौथा हाप्त्याचे बजेट असून.चिरीमिरीच्या लालसपोटी बिल देयके काढण्यासाठी टाळाटाळीच्या विरोधात आमरण उपोषणाची हत्यार उपसले होते.ही बातमी दैनिक तरुण भारत वृतपत्रात प्रकाशित होताच गट विकास अधिकारी लक्ष्मण वाजे नी थकित बिलदेयके काढण्याच्या कार्यवाहीला तात्काळ सुरुवात केली अशी माहिती उपोषणकर्ते अशोक पवळे व गंगाधर प्रभू देशमुख यांनी दिली.

तालुक्यातील नरसी येथील सेवानिवृत्त शिक्षक तथा गट शिक्षणाधिकारी अशोक गंगाधर पवळे व सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी प्रभू गंगाधर देशमुख यांचे वर्षभरापासून थकलेल्या सातव्या वेतन आयोगाच्या तिसऱ्या व चौथ्या हप्त्याच्या व देयकाची दैनिक तरुण च्या माध्यमातून नायगाव पंचायत समितीच्या अजब कारभारा बद्दल दि.१५ जानेवारी रोजी बातमी प्रकाशित झाली होती.

त्या अनुषंगाने थकीत वेतन धारक अशोक पवळे व प्रभू देशमुख यांनी नायगांव पंचायत समितीच्या प्रांगणात टेन्ट टाकून.पंचयत समितीचे गट विकास अधिकारी लक्ष्मण वाजे यांच्या कारभाराच्या विरोधात आमरण उपोषणा आंदोलनाचे हत्यार उपसले होते.त्यात पहिल्याच दिवशी दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रांत प्रकाशित होताच.त्या दरम्यान संबंधित विभागाने तात्काळ आता महिन्यात थकित वेतनाचे हप्ते जमा करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. नांदेड यांचे पत्रानुसार ३१ मार्च २०२४ रोजी सातव्या वेतन आयोगाचा तिसरा व चौथा हप्ता तसेच देशमुख जी.पी सेवानिवृत्त मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प. नांदेड यांचे पत्रान्वये ३१ मार्च २०२४ रोजी आपल्या सातव्या वेतन आयोगाचा तिसरा व चौथा हप्ता तसेच देशमुख जी.पी. सेवानिवृत्त (शि.वि.अ.) यांचे वित्त प्रेषण या कार्यालयास प्राप्त झाले आहे.


पंचायत समिती समोर सेवानिवृत्त कर्मचार्याचे आमरण उपोषण

सातव्या वेतन आयोगातील थकित रक्कम देण्याची मागणी

सदर देयके पारित करण्यासाठी प्रणालीद्वारे अग्रेषित करणे अडचणीमुळे सदर देयक प्रणालीवर लेखाशीर्ष देयक ऑनलाईन ऑनलाईन करता आले नाही. त्यामुळे सदर निधी अखर्चित असल्याने व्यपगत झाला आहे. यांचे वित्त प्रेषण या कार्यालयास प्राप्त झाले होते. सदर देयके पारित करण्यासाठी प्रणालीद्वारे अग्रेषित करणे अनिवार्य होते.परंतू तांत्रिक अडचणीमुळे सदर देयक, लेखाशीर्षवर देयक ऑन लाईन करता आले नाही. त्यामुळे सदर निधी अखर्चित असल्याने व्यपगत झाल्याची ही कबुली दिली आहे.आपल्या मागणीच्या अनुषंगाने पुनश्चय सदर देयकासाठी बेमुदत उपोषण करण्याचा इशारा सातव्या वेतन आयोगाचे हप्ते देण्यास वर्षभरा पासून टाळटाळी च्या विरोधात नायगांव पंचायत समिती च्या प्रांगणात आमरण उपोषणाचा तंबू लागताच गटशिक्षणाधिकारी ,मार्केटकमिटीचे सभापती श्रीनिवास चव्हाण यांच्या मध्यास्थिने महिन्याच्या आत थकीत वेतनाची हप्ते वेतनासाठी लागणाऱ्या पाठ पुराव्यासह जमा करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने उपोषण तूर्तास मागे घेण्यात आले.

# लोहा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस वीर माधवराव नळगे यांचे नाव

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. १९ जानेवारी**

राज्याच्या कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राज्यातील शासकीय १३२ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.) चे शासनस्तरावरून नुकतेच नामकरण करण्यात आले आहे. त्यामध्ये लोहा शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नाव स्वातंत्र्य सेनानी वीर माधवराव नळगे असे करण्यात आले आहे.



लोहा येथे मागील अनेक वर्षांपासून प्रारंभी भाड्याच्या जागेत तर मागील दोन ते तीन वर्षांपासून स्वतःच्या जागेत शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची इमारत उभी आहे. सदरील आय. टी.आय चे नामकरण करण्याचे राज्य सरकारने यापूर्वीच जाहीर केले होते. त्यानुसार राज्यातील १३२ आयटीआय नविन नावे घोषित करण्यात आले आहे. त्यामध्ये लोहा शहरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) चे नाव वीर माधवराव नळगे असे करण्यात आले आहे.

भारत देश इंग्रजांच्या पारतंत्र्यातून मुक्त झाला परंतु मराठवाडा हा निजामी राजवटीत होता. मराठवाड्याला निजामी राजवटीतून स्वातंत्र्य करण्यासाठी लोहा शहरातील तत्कालीन स्वातंत्र्य सेनानी वीर माधवराव नळगे यांनी सहकरी स्वातंत्र्य सैनिकासोबत निजामाशी अनेक काळ संघर्ष करून मराठवाड्याला जुलमी निजामी राजवटीतून स्वातंत्र्य केले. त्यांचे नाव इतिहासात अजरामर झाले. त्यांच्या वीर पराक्रमाची यशोगाथा स्मरणात राहावी या उद्देशाने राज्य सरकारकडून लोहा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस (आयटीआय) यास वीर माधवराव नळगे यांचे नाव जाहीर केले. त्या बद्दल लोहा शहरातील अनेकांनी आनंद व्यक्त केला.

आजघडीला सदरील आयटीआय मध्ये एकूण सहा ट्रेड होते मात्र यापूर्वीच दोन ट्रेड बंद पडले आहेत. सध्या आयटीआय मध्ये चार ट्रेड कोर्स सुरू आहेत. त्यामध्ये यांत्रिकी डिझेल मेकॅनिक, वेल्डर, फिटर आणि ईलेक्ट्रिशियन असे चार कोर्स आहेत. तर एकूण १४० विद्यार्थी संख्या आहे. संस्थेत प्राचार्य सह नऊ कर्मचारी कर्तव्यावर आहेत. नवीन ट्रेड वाढवून घेण्यासाठी तसा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे संस्थेकडून पाठविण्यात आल्याची माहिती आयटीआय संस्थेतील कर्मचाऱ्यांकडून देण्यात आली.

# बंद असलेल्या किनवट एमआयडीसीमध्ये उद्योग-धंदे आणावेत

## उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांना भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ॲड. अविनाश राठोड यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**माहुर,दि. १९ जानेवारी**

किनवट/ माहूर विधानसभा-८३ क्षेत्रात दोन्ही तालुक्यातील बेरोजगार युवकांना तालुक्यातच रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी बंद असलेल्या किनवट एमआयडीसीत

उद्योग-धंदे आणण्यासाठी आपण आपल्या परीने स्वतः लक्ष घालून प्रयत्न करावेत यासाठी आज गुरुवार दिनांक १६ रोजी भाजपाचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष ड.अविनाश गोविंद राठोड यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांची मुंबई येथे प्रत्यक्ष भेट भेटून लेखी निवेदन दिले.समाधानाची बाब म्हणजे मंत्री नाईक यांनीही या मागणीसंदर्भात स्वतः लक्ष घालण्याची हमी देऊन लवकरच उचित उपाययोजना आखण्याचे आश्वासन दिले.

ॲड.अविनाश राठोड हे मुळ माहूर तालुक्यातील तर उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल



नाईक हे किनवट,माहूर लगतच्या पुसदचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार नुकतीच मंत्री इंद्रनिल नाईक यांचा किनवट तालुक्यातील दहेली तांडा येथे दिवंगत माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या कुटुंबीयांची सांत्वन भेट घेण्यासाठी दौरा झाला होता. माहूर किनवट तालुक्यातील औद्योगिक मागासलेपणाची त्यांना चांगल्याप्रकारे जाण आहे.याच अनुषंगाने भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष ड.राठोड यांनी मंत्री नाईक यांची मुंबई येथे आज १६ रोजी भेट घेऊन येथील रोजगाराच्या अभावाविषयी अवगत करून दोन्ही तालुक्यातील बेरोजगार तरुणांसाठी याठिकाणी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग धंद्यांची निर्मिती करण्यावर चर्चा केली.

किनवट माहूर विधानसभा क्षेत्र हे बंजारा आदिवासी बहुल मतदार संघ असून महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात असल्यामुळे व दूरदृष्टिहीन नेतृत्वामुळे विकासापासून वंचित राहीलेला आहे. किनवट तालुक्यातील एम आय डी सी मध्ये पायाभूत सुविधांचा विकास झालेला असूनही मात्र अद्ययावत असे कुठलेही उद्योग याठिकाणी अद्यापही सुरू झालेले नाहीत.ही येथील आदिवासी व बंजारा बहुल तालुक्यातील मागासलेल्या नागरीकांच्या दृष्टीने फार मोठी शोकांतिका असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

किनवट - माहूर तालुक्यात मोठ्या प्रमाणात निसर्गनिर्मित संसाधने उपलब्ध आहेत. या भागात मोठ्या प्रमाणात शिक्षित तरुण वर्ग सुशिक्षित बेकार आहे, मोल मजूरी करणारा वर्ग कामा-अभावी लगतच्या तेलंगाणा राज्यात जातो. तसेच किनवट एम आय डी सी हे येथील रेल्वे स्टेशन मुळे महाराष्ट्रातील मोठ्या शहरांशी जोडलेला असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नाने साकार झालेला समृद्धी महामार्गही अगदी जवळ आहे. किनवट तालुक्याला तेलंगाणा मधील आदिलाबाद हि मोठी बाजारपेठ अगदी लागून आहे. या सर्व बाबींचा विचार केला तर किनवट एम आय डी सी मध्ये उद्योग-धंद्यासाठी अत्यंत पोषक वातावरण आहे.

त्यामुळे किनवट - माहूरच्या तरुणांना रोजगाराची संधि तालुक्यातच उपलब्ध होण्यासाठी आपल्या मार्फत किनवट एम आय डी सी मध्ये राज्य शासनाच्या मदतीने उद्योग धंदे आणण्यास प्रशासनाने अग्रेसर भूमिका घेत योग्य उपाययोजना करण्याचे आदेश देऊन या संदर्भात आपल्या दालनात प्रशासनाची बैठक बोलावण्यात यावी अशी नम्र विनंती करत आपल्या मागणीचे निवेदन भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष ड अविनाश राठोड यांनी उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांना दिले आहे.या मागणीसंदर्भात लवकरच बैठक बोलावण्यात येईल असे आश्वासन मंत्री नाईक यांनी दिले असल्याने मंत्री इंद्रनिल नाईक यांचे किनवट- माहूरच्या जनतेच्या वतीने ॲड. अविनाश राठोड यांनी आभार व्यक्त करत उद्योग राज्यमंत्री इंद्रनिल नाईक यांना माहूर गडावरील श्री रेणुकादेवी चे दर्शन घेण्यासाठी यावे असे निमंत्रण यावेळी दिले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## ‘प्रजापिता’चे संस्थापक ब्रह्मबाबा यांचा स्मृतीदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
प्रजापिता ब्रहमकुमारी इश्वरीय संस्थेचे संस्थापक ब्रहमाबाबा यांचा ५६ वा स्मृतीदिन आणि विश्व शांती दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहून प्रजापती ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयच्या मुख्यसंचालिका ब्रम्हाकुमारी नंदा दिदी, उपसंचालिका पुण्या यांचे आध्यात्मिक मार्गदर्शन ऐकले.

प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय संस्थेचे संस्थापक ब्रह्मबाबा यांचास्मृतिदिन आणि विश्व शांती दिवस राजयोग केंद्र, जुना औसा रोड, लातूर येथे साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचे उद्घाटन केले. या कार्यक्रमात विलास सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमन वैशाली देशमुख यांचे प्रजापती ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयच्या मुख्यसंचालिका ब्रम्हाकुमारी नंदा दिदी, उपसंचालिका पुण्या दिदी यांनी स्वागत केले. यावेळी व्यासपीठावर ब्रम्हाकुमारी नंदा दिदी, उपसंचालिका पुण्या दिदी, सौ. प्रतिभा पाटील कव्हेकर, डॉ. सारीका देशमुख, भुवनेश्वर महाराज, राजेंद्रप्रसाद माने आदीची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलतांना ब्रहमकुमारी नंदा बहेन म्हणाल्या, प्रत्येक मानावातून देवमानव तयार झाला पाहीजे, श्रेष्ठ आणि आदर्श जीवन तयार करण्यासाठी सर्वशक्तीमान शक्तीशी आपण जोडलो गेलो पाहिजे. आपण कोण आहोत आणि आपला काय परीचय आहे, हे ओळखण्यासाठी अध्यात्मिक शक्तीच अनुकरण करायला हवं. या कार्यक्रमाला लातूर शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## नवोदय विद्यालय परीक्षेला ५७१ विद्यार्थ्यांची गैरहजेरी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
जवाहर नवोदय विद्यालय येथील प्रवेशासाठी शनिवारी प्रवेश परीक्षा जिल्ह्यातील ३६ परीक्षा केंद्रांवर पार पडली. यामध्ये ५७१ विद्यार्थी अनुपस्थित होते. जिल्ह्यातील सर्वच केंद्रावर शांततेत परीक्षा पार पडली. जिल्ह्यात नवोदय विद्यालयाच्या प्रवेशासाठी ११ हजार २०८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यात प्रत्यक्ष १० हजार ६३७ विद्यार्थी उपस्थित राहिले. तर ५७१ विद्यार्थ्यांची अनुपस्थिती होती. सरासरी ९४.९० टक्के विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली असल्याचे शिक्षण विभागातून सांगण्यात आले.
जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवारी ३६ केंद्रांवर परीक्षा पार पडली. सर्वच केंद्रावर पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. जिल्ह्यात कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही. लातूर तालुक्यात गटशिक्षणाधिकारी निवृत्ती जाधव यांनी विविध केंद्रांनी भेटी दिल्या.

## जिल्हा बँकेतून वेतन देण्याच्या निर्णयास शिक्षक संघटनांचा विरोध

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
सध्या शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीयकृत बँकेद्वारे अदा केले जात असताना शासनाने मंगळवारी निर्णय काढून वेतन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत करण्याचा घाट घातला आहे. या निर्णयाला शिक्षक सेना व कास्ट्राईब शिक्षक संघटनेने विरोध केला आहे.

राज्यातील १५ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेद्वारे शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन करण्याबाबत शासनाने गेल्या मंगळवारी शासन निर्णय काढला. त्यात लातूर जिल्हा बँकेचा समावेश आहे. काही अपवाद वगळता जिल्हा बँकांकडून सेवा, सुविधा मिळत नाहीत. कर्मचाऱ्यांचा तसा अनुभव आहे. राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्मचाऱ्यांना सेवा, सुविधा दिल्या जातात.

कोणताही कर्मचारी जिल्हा बँकेद्वारे वेतन करण्याचे समर्थन करणार नाही. शासन जिल्हा बँकेकडून वेतन घेण्याबाबत जबरदस्ती करणार असेल तर ते कर्मचाऱ्यांच्या इच्छेविरूद्ध होईल. समजा सक्ती केली तर कास्ट्राईब शिक्षक संघटना आंदोलन छेडेल, असा इशारा कास्ट्राईबचे जिल्हाध्यक्ष सुभाष मस्के यांनी दिला.

## अतुल कणगुळे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
लातूर शहरातील रहिवाशी अतुल नारायण कणगुळे यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले आहे. मृत्यूसमयी त्यांचे वय ६० वर्षे होते. त्यांच्या पार्थीव देहावर लातूर शहरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.

## लॉजवर गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
पैशाच्या देवणा-घेवाणीवरून दिलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून शहरातील लॉजवर एकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. याबाबत गांधी चौक पोलीस ठाण्यात सहा जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेशमा फेरोज शेख (वय ४४, रा. खोरी गल्ली, लातूर) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे, पती फेरोज शेख (वय ४८) यांना पैशाच्या देवाण-घेवाणीवरून सतत मानसिक त्रास दिला जात होता. या त्रासाला कंटाळून शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोर असलेल्या एका लॉजमध्ये फेरोज शेख यांनी बेडशीटच्या सहाय्याने पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी जहागीर चाऊस, हणमंत ममदे, शहानवाज जहीर अहमद शेख, शहनाज खय्युम पटेल, सुरेश सौने व सवद मलीक यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास गांधी चौक पोलीस करीत असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## पावणेसात लाखांचे दागिने जप्त

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
जिल्ह्यात चारचाकी वाहनांना अडवून प्रवाशांना धमकावत जबरदस्तीने सोन्याचे दागिने लुटणाऱ्या तीन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली आहे. त्यांच्याकडून ६ लाख ७६ हजार रुपयांचे ९.४ तोळ्यांचे सोन्याचे दागिन जप्त केले आहेत.

काही दिवसांपूर्वी रेणापूर पोलीस ठाणे हद्दीमध्ये लातूर ते रेणापूर रोडवरील बोरवटी गावाजवळ अज्ञातांनी कारमधून जाणाऱ्या दाम्पत्यांना अडवून धमकावत त्यांच्याकडील सोन्याचे दागिने चोरून नेल्याच्या दोन घटना घडल्या होत्या. त्यावरून रेणापूर पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले होते.

सदर गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करून मार्गदर्शन करण्यात आले होते. सदर पथकाकडून बातमीदार नेमून तसेच तांत्रिक माहितीचे विश्लेषण करून तपास सुरू होता.

दरम्यान, दुचाकीवर येऊन कार चालकांना अडवून धाक दाखवत जबरदस्तीने सोन्या-चांदीचे दागिने लुटणाऱ्या आरोपींची माहिती मिळाली. पथकाने अमोल सुभाष राठोड (वय २७), अभय ऊर्फ राहुल संतोष चव्हाण (वय २१, दोघेही रा. नेहरूनगर तांडा, ता. रेणापूर) आणि कृष्णा राजूभाऊ ढमाले (वय २५, रा. बोरवटी, ता. लातूर) या तीन आरोपींना त्यांच्या राहत्या घरातून अटक करण्यात आली.

त्यांच्याकडून नमूद गुन्ह्यात चोरलेले ६ लाख ७६ हजार रुपयांचे ९.४ तोळ्यांचे सोन्याचे दागिन जप्त



केले आहेत. पुढील तपासासाठी त्यांना रेणापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अंमलदार सूर्यकांत कलमे, योगेश गायकवाड, राजेश कंचे, तुळशीराम बरुरे, प्रदीप चोपणे यांनी ही सेवा बजावली.

## विरोधात तक्रार दिल्याने मारहाण; चौघांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
मागील भांडणाची कुरापत काढत, तसेच आमच्या विरोधात पोलिसांत तक्रार का केलीस, असे म्हणत दोघांना दगडाने मारहाण केल्याची घटना हासेगाववाडी परिसरात घडली.

फिर्यादी परमेश्वर उद्धवराव हे आपल्या सहकाऱ्यांसमवेत चारचाकी गाडीतून निघाले होते. यावेळी दोन मोटारसायकलवरुन आलेल्या चौघांनी त्यांचे वाहन थांबवून आमच्या विरोधात तक्रार का दिली, म्हणून परमेश्वर उद्धवराव व त्यांच्या भावास मारहाण केली.

## पालकमंत्रीपदी शिवेंद्र राजे भोसले यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
लातूरच्या पालकमंत्रीपदी शिवेंद्र राजे भोसले यांची निवड जाहीर करण्यात आली.

भोसले यांच्या निवडीमुळे लातूरच्या विकासाला अधिक गती मिळेल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## जिल्हा परिषद : १२४ शाळा अंधारात

### ईमारतीच्या छतावर सोलार बसविण्याच्या हालचाली सुरू

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
जिल्ह्यातील १२४ जिल्हा परिषद शाळांमध्ये वीज पुरवठाच नाही. विद्यार्थ्यांना संगणक हाताळणीची संधी मिळणे कठीणच असून, आता प्राथमिक शिक्षण विभागाने जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडीसी) तरतूदीतून शाळांच्या छतावर सोलार बसविण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत.

लातूर जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण १२७३ शाळा आहेत. यातील १२४ शाळांमध्ये वीज पुरवठाच नाही. वीजबिल कोण भरावे म्हणून वीज पुरवठा सुरू असल्याचे दिसत नाही. दरम्यान, ग्रामपंचायतीने शाळांचे वीजबिल भरावे, असा फतवा सरकार पातळीवरून काढण्यात आला होता. परंतु, हा फतवा यशस्वी झाला नाही. शासन शाळांतील वीजबिलासाठी विशेष तरतूद करीत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना संगणक हाताळणी करणे शक्य होत नाही. तसेच उन्हाळ्यात शाळेत किमान फॅन असावेत, असे वाटत असले तरी वीजबिलाचा प्रश्न मोठा आहे. शासनानेच वीजबिलासाठी आर्थिक तरतूद करून शाळांना वीज पुरवठा केला पाहिजे. १२४ शाळांमध्ये संगणक फक्त शोभेसाठी ठेवले असावेत. शाळांमध्ये वीजच नसेल तर संगणक ठेवून उपयोग काय? असा प्रश्न आहे. १२४ शाळांच्या यू डायसवरच वीज नसल्याचा उल्लेख केला आहे. जिल्हा नियोजन समितीकडून (डीपीडीसी) आर्थिक तरतूद घेऊन शाळांच्या छतावर सोलार बसविण्याची सोय केली जात असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. मात्र, डीपीडीसीतूनही एवढ्या १२४ शाळांना सोलारसाठी पैसे मिळतील, असे वाटत नाही. यासाठी राजकीय आणि प्रशासकीय इच्छाशक्तीची अत्यंत आवश्यकता आहे. या दोन्ही यंत्रणेने ठरविल्यास काहीही होऊ शकते. मात्र, ते करायला पाहिजे. यात जिल्हाधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ‘सायबर क्राईम अँड सेफ्टी मेजर्स’ या विषयावर रियाज यांचे व्याख्यान




**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
दयानंद मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी सायबर क्राईम अँड सेफ्टी मेजर्स या विषयावर पोलिस उपनिरीक्षक रियाज शेख यांचे मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य. डॉ.क्रांती सातपुते , प्राचार्य.डॉ. पुनम नाथानी, प्रा.मेघा पंडित, प्रा.डॉ.सुनीता संगोले यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी पोलिस उपनिरीक्षक रियाज शेख यांनी आपल्या मार्गदर्शनात सायबर क्राईम अँड सेफ्टी मेजर्स या विषयावर सखोल मार्गर्शन केले. यामध्ये त्यांनी सायबर क्राईम म्हणजे काय,सायबर फ्रॉड चे प्रकार आणि विविध सायबर फसवणुकीच्या गुन्ह्यांपासून स्वतःला सुरक्षित ठेवण्यासाठी काय दक्षता घ्यावी या बाबत सांगताना मोबाईलवरून कोणतेही देऊ नये, तसेच फसवे कॉल्स आणि मेसेजेस यावरून तत्काळ लाभ मिळवून देण्याचे अषिम दाखवून जे कॉल्स येतात यांना बळी न पडता अशा कॉल्स ना प्रतिसाद देऊ नये याबाबत मार्गर्शन करण्यात आले.

तसेच सध्याच्या काळातील महिला आणि मुलींच्या बाबतीत घडणारे सायबर गुन्हे जसे की, मॅट्रीमोनियल फ्रॉड , डिजिटल अस्टेट, ऑनलाईन होणारी पिळवणूक ईत्यादि गुन्हे कसे घडतात,या बाबतीमध्ये काय काळजी घ्यावी आणि सोशल मीडिया तसेच इंटरनेटचा वापर करताना घ्यावयाची दक्षता याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली .

दयानंद विधी महाविद्यालय प्राचार्य. डॉ. पुनम नाथानी यांनी आभार मानले.श्रीमती. रेवती जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले .

सदरील कार्यक्रमासाठी वसतिगृह अधीक्षक माने रेखा, चिकले वैशाली, पर्यवेक्षिका वराडे प्रभा, यमपुरे वनिता, वैद्यकीय अधिकारी डॉ.सुनीता बजाज यांची तसेच सर्व सेविका कर्मचारी अदिंसह मोठ्या संख्येत विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## सोमवारपासून वंचित बहुजन आघाडीचे धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
ग्राम परिसर विकास शिक्षण संस्था,भोसा.जि.लातूर अंतर्गत लातुरात चालणाऱ्या साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विद्यालय आणि कै.ग्यानदेव रामचंद्र शिंदे विद्यार्थी वसतीगृहातील अनागोंदी, भ्रष्ट कारभार आणि अनियमितता प्रकरणी चौकशी करुन दोषींवर जबाबदारी निश्चित करावी आदी ११ मागण्यांसंदर्भात वंचित बहुजन आघाडी लातूरच्यावतीने दि.२० जानेवारी २०२५ पासून जिल्हा परिषदेसमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे लातूर शहर वंचित बहुजन आघाडीचे लातूर शहराध्यक्ष सचिन गायकवाड व महासचिव आकाश इंगळे यांनी दि.१६ जानेवारीला जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

या निवेदनामध्ये शासनाच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीमध्ये डी. एस.नरसिंगे यांना शाळेत प्रवेश देऊन ,सेवामुक्त शिक्षिका तेलंगे यांचा संभाव्य आरोप व हल्ला यापासून बचाव होण्याकरिता सेवामुक्त सहशिक्षिका तेलंगे यांना पाबंद करुन शाळेत येण्यापासून रोखण्यात यावे, सेवामुक्त कर्मचारी तेलंगे यांचे वेतन काढल्याबद्दल व सदर शाळेत अनेकांना चुकीच्या प्रभारी मान्यता देऊन नियमित मुख्याध्यापकाचे आर्थिक, प्रशासकीय अधिकार जाणीवपूर्वक काढल्याबद्दल संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांवर खात्याअंतर्गत चौकशीचे आदेश देऊन शासकीय रकमेचा अपहार संगनमताने केल्या प्रकरणी गुन्हे दाखल करण्याचे आदेश द्यावेत, संबंधित सेवामुक्त सहशिक्षिकेने तिचे पती लक्ष्मण मस्के यांना बनावटी शिक्षक दाखवून शिक्षक मतदार म्हणून नोंद केल्या प्रकरणी दोघांवरही गुन्हे दाखल करावेत,तसेंच या प्रकरणी जिल्हाधिकारी स्तरावरुन झालेल्या सुनावणीचा निर्णय देण्यात यावा,संबंधित सेवामुक्त सहशिक्षिकेने तत्कालीन मुख्याध्यापक व शिक्षक कर्मचाऱ्यांच्या बनावटी सह्या करुन ८ लाख रुपये वसंतराव काळे पतसंस्थेकडून लोन उचलल्या प्रकरणी गुन्हे नोंद करण्याचे आदेश द्यावेत असे निवेदनात म्हटले आहे. सदरील निवेदनाच्या प्रति राज्याचे शालेय शिक्षण मंत्री,शिक्षण संचालक, शिक्षण आयुक्त, लातूर जिल्हाधिकारी यांच्यासह इतरांना देण्यात आल्या आहेत.

## शहरात जागोजागी दिसताहेत भाजीपाला विक्रेते

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
शहरातील मुख्य बाजारपेठ म्हणून ओळख असलेली गंजगोलाई, दयानंद गेट ते संविधान चौकापर्यंतच्या जुने रेल्वे लाईनच्या रस्त्यावरील भाजीपाला, फळे व इतर छोट्या-छोट्या व्यवसायिकांनी आपली दैनंदिन उपजिवीका भागवण्यासाठी आपली दुकाने थाटली होती. मागील काही दिवसात मनपा प्रशासन व वाहतूक शाखा प्रशासनाने शहरातील अतिक्रमनाच्या नावाखाली किरकोळ व्यवसायकांना उठवले आहे.
त्यानंतर किरकोळ व्यवसायकांनी शहरातील गल्ली- बोळात आपली दुकानी थाटली असल्याचे दिसून येत आहे.



शहरातील गजबजलेली गंजगोलाईतील सर्व हातगाडे, भाजीपाला विक्रेत्यांना मागील कांही दिवसात गंजगोलाईतून हटविण्यात आले आहे. गंजगोलाईले गेल्या कांही दिवसापासून मोकळा श्वास घेतला असला तरी कांही किरकोळ व्यापा-यांची दैनंदिन उपजिवीका आता भागवणे सुद्धा कठिन झाली आहे. महापालीकाकडून व्यापाऱ्यांना पुनर्वसन करण्यासाठी जागा देण्यात आली असली तरी कांही व्यापारी त्या जागेवर जात नाहित. त्यामुळे कांही व्यापाऱ्यांनी आपल्या परीने आपले दुकाने जागा असेल त्याठिकाणी गल्ली- बोळात थाटली आहेत.

शहरातील दयानंद गेट ते सविधान चौक या समानंतर रस्त्यावर गेल्या कांही दिवसापासून किरकोळ व्यापाऱ्यासह शेतकरी रस्त्यावर भाजीपाला फळ, शहाळे, फुले, क्रॉकरी, राईस, वडापाव, भेळ, पाणीपुरी आर्दीसोबतच इतरही छोटे-छोटे व्यवसाय करून आपली उपजिवीका भागवणा-या व्यवसायकांना हटवले. या परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून या रस्त्यावर भाजीपाला, फळे विकले जात होते. दररोज सकाळी आणि संध्याकाळी या परिसरात मोठी गर्दी होत असे. हा संपूर्ण परिसर भाजीपाला विक्रेत्यांनी व्यापून टाकला होता. मात्र मनपा प्रशासन व वाहतूक शाखेच्या वतिने या भागातीलही व्यापाऱ्यांना हटवून देण्यात आले आहे. त्यामुळे या परिसरातीलही व्यापाऱ्यांनी आपले दुकाने प्रकाश नगर रोडवर थाटली आहे. त्यामुळे या परिसरात आता मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याचे दिसून येत आहे. तर कांही व्यवसयाकांनी आपली दुकाने गल्ली- बोळात थाटली असल्याचे दिसून आले.

## प्रधानमंत्री मोदी यांच्या हस्ते स्वामित्व योजनेंतर्गत स्वामित्व सनदचे ई-वितरण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१९ जानेवारी -**
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते स्वामित्व योजनेतंर्गत देशातील ५० हजार गावांमधील मालमत्ताधारकांना स्वामित्व सनदचे ई-वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे थेट प्रसारण जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय कार्यक्रमामध्ये दाखविण्यात आले. यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते मोगरगा गावातील मालमत्ताधारकांना प्रातिनिधिक स्वरुपात मालमत्ता पत्रक व सनद वितरीत करण्यात आल्या. तसेच जिल्ह्यात एकाच दिवशी ३० गावांमधील ८ हजार ५११ लाभार्थ्यांना सनद वितरीत करण्यात आली.

उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख एन.एन. पटेल, उपअधीक्षक वैशाली गवई, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बालासाहेब वाघ यांच्यासह नागरिक यावेळी उपस्थित होते.



गावठाणातील जमिनींचे जीआयएसद्वारे सर्वेक्षण व भूमापन करून मिळकतधारकांना स्वामित्व सनद वितरीत करण्यासाठी स्वामित्व योजना हाती घेण्यात आली आहे. यासाठी ड्रोन तंत्रज्ञान आणि प्रगत नकाशांकन तंत्राचा उपयोग केला जात आहे.

या योजनेंतर्गत तयार करण्यात झालेल्या स्वामित्व सनदचे ई-वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज झाले. यावेळी त्यांनी देशातील काही लाभार्थ्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधून या योजनेमुळे त्यांना झालेल्या लाभाची माहिती घेतली. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे या कार्यक्रमाला उपस्थितांना संबोधित केले.

स्वामित्व योजनेतून गावठाणातील सर्व मिळकतींचे आधुनिक ड्रोनच्या सहाय्याने सर्वेक्षण करून प्रत्येक मिळकतीचे स्वामित्व सनद तयार करण्यात आली आहे. मिळकतीचा नकाशाही या सनदीमध्ये देण्यात आला असल्याने प्रत्येक मिळकतधारकाला आपल्या मिळकतीच्या सीमांची अचूक माहिती मिळणार आहे. त्यामुळे मालकी हक्क, मिळकतीच्या हद्दीमुळे होणारे वाद थांबतील, असा विश्वास आमदार श्री. पवार यांनी यावेळी व्यक्त केला.

स्वामित्व योजनेतंर्गत लातूर जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ५०२ गावांतील ६९ हजार ३०४ मिळकतींच्या स्वामित्व सनद प्राप्त झाल्या आहेत. २३३ गावांमधील २२ हजार ६६१ मालमत्ताधारकांना सनद वाटप पूर्ण झाले आहे. तसेच आज एकाच दिवशी ३० गावांमधील ८ हजार ५११ लाभार्थ्यांना स्वामित्व सनद वाटप होत असल्याचे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख एन.एन. पटेल यांनी सांगितले.

लातूर

# जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'महाराष्ट्र फार्मसी'त विद्यार्थ्यांसाठी इंडक्शन प्रोग्राम साजरा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१९ जानेवारी -**

महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा येथे महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष विजय पाटील निलंगेकर याच्या मार्गदर्शनाखाली प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी दि.१८ जानेवारी रोजी फ्रेशर्स पार्टी व इंडक्शन प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते.

प्रथम वर्ष बी.फार्मसी, एम.फार्मसी व डायरेक्ट सेकंड इयर बी.फार्मसी या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभासाठी सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.एस. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र

पॉलिटेक्निक डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.बी.एन. पौळ, आय.क्यू.ए.सी. सम न्वयक डॉ.एस.व्ही. उसनाळे, डॉ. एस व्ही. गरड, डॉ.सी.व्ही पांचाळ व पालक प्रतिनिधी म्हणून प्रशांत राघो हे मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थि तसेच ४२ पालक या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नंदा भालके व प्रा. सानुली पोळकर तथा आभार प्रदर्शन प्रा. प्रीती माकने यांनी केले.



### दारूबंदी अधिकारी फरार...

# देवणी तालुक्यातून अवैध दारूची विक्री जोरात

**तभा वृत्तसेवा / प्रताप कोयले**
**देवणी, दि.१९ जानेवारी -**

तालुक्यातील अवैध दारू विकृत्याचे दारूबंदी अधिकारी यांना घरपोच हप्ते जात असल्याने देवणी तालुक्याकडे संबंधित दारूबंदी अधिकाऱ्यांनी देवणीकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्याने सदर अधिकारी एकवर्षापासून एकही अवैध दारू विक्रत्यावर कारवाई केली नाही. अवैध दारू विक्री देवणी शहरासह देवणी तालुक्यात घरारातून होत आहे.

तालुक्यात अनेक गावातील महिलांनी ग्राम सभा घेऊन ग्राम सभेत दारूबंदी करण्याचा ठराव घेऊनही दारूबंदी अधिकारी व पोलीस प्रशासन यांच्यात आर्थिक संगनमत असल्याने कोणत्याच गावची अवैध दारु विक्री बंद झाली नसल्याने अनेक लोकांची घरे देशोधडीला लागले आहेत.

संबंधित दारूबंदी अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी महिला व जनतेतून होत आहे. दारू विक्री करणाऱ्या अधिकृत दुकानदारांना काही नियम घालून दिले आहेत. त्या नियमाचे उल्लंघन करून सर्रास सकाळ पासून संध्याकाळ पर्यंत वेळेची मर्यादा न ठेवता सर्व नियम धाब्यावर बसवून सकाळी चार ते संध्याकाळी एक दोनपर्यंत देशी दारू दुकान व शहरातील बार चालू आहेत यांच्याकडून वेळो वेळी चिरीमिरी घेऊन अर्थपूर्ण व्यवहार केले जात आहे.

दारू बंदी अधिकारी कोठे आहेत? कळवा हजार रुपये मि ळवा असे लोकांना म्हणावे लागत आहेत. दारूबंदी अधिकारी यांचे नेमके अधिकार व काम काय? आहेत. हे येथील नागरिकांना पडला आहे. दारू बंदी अधिकाऱ्यांनी अनधिकृत दारू विकणाऱ्यावर कारवाई केली आहे. याचा लेखा जोख देवणी तालुक्यातील जनतेला दारूबंदी अधिकारी यांना द्यावा लागणार आहे. म्हणून देवणी तालुक्यातून दारूबंदी अधिकारी एक वर्षापासून फरार, अवैध दारू विक्री होते दारोदार, दारू बंदीसाठी महिला ग्रामसभा घेतात.




अनेक बार पोलिस प्रशासन म्हणते हम क्या करेंगे यार आणि दारू बंदी अधिकारी हप्ते घेतो. वारंवार अनेकांचे संसार बरबाद, अशी अवस्था देवणी तालुक्यातील झालेली आहे.

## वाहकास दोन भावांची बेदम मारहाण; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१९ जानेवारी -**

औसा आगाराची रात्री मुक्कामी जाणारी औसा-बिरवली बस (क्र.एमएच.१४/बीटी १४९८) सायंकाळी आठ वाजता औशाहुन निघाली आणि कोरंगळा गावाजवळ आली. या बसमध्ये प्रवासी असलेले शिखरे व वाहक व यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाला. आरोपीने आपल्या भावास बोलवून घेऊन वाहक युवराज कांबळे यांना बसमधुन खाली खेचून जबर मारहाण करून जखमी केल्याचे घटना गुरुवार दि.१६ रोजी रात्री घडली आहे. या प्रकरणी भादा पोलिसात दोन भावाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तालुक्यातील कोरंगळा गावाजवळ आल्यावर बसच्या वाहकाने आरोपीस नीट बस म्हटल्यावर आरोपीने वाद घालण्यास सुरुवात केली आणि आपल्या सख्खा भावास बोलावून घेतले. भाऊ आल्यानंतर या वादांचे रूपांतर हाणामारीत होऊन वाहकास जब्बर जखमी केले आहे.

याप्रकरणी भादा पोलिसात चालक रमाकांत विश्वनाथ जेवळीकर यांच्या फिर्यादीवरून करण बाबुराव शिखरे व अर्जुन बाबुराव शिखरे कोरंगळा यांच्या विरोधात भादा पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## रक्तदान महायज्ञाचे आमदारांच्या हस्ते उद्घाटन

### रक्तदान करुन सुरुवात; २०० जणांनी केले रक्तदान...



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१९ जानेवारी -**

जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने १ लक्ष रक्त बॉटल्स संकलित केल्या जात आहे. या स्तुत्य उपक्रमाअंतर्गत औसा ग्रामीण रुग्णालयात रक्तदान महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी आमदार अभिमन्यू पवार यांनी रक्तदान करून रक्तदान महायज्ञाचे उदघाटन केले. यावेळी २०० हून अधिक लोकांनी रक्तदान केले.

राज्यातील रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन जगद्गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या संस्थानने रक्तदान महायज्ञाच्या माध्यमातून रक्तदात्यांकडून १ लक्ष बॉटल्स रक्त संकलित करण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाअंतर्गत ८३ हजार बॉटल्स रक्त संकलित करण्यात आले. याच उपक्रमाचा भाग म्हणून औसा ग्रामीण रुग्णालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष सुनील उटगे, रोहयो तालुका अध्यक्ष सदाशिव जोगदंड, बाजार समितीचे संचालक विकास नरहरे, तुकाराम गुडले, बल्लाळनाथ शिंदे, कृष्णा पांचाळ, कण्टेआण्णा मुळे, प्रा. शिवरुद्र मुर्गे, ॲड. योगेश शिंदे, सागर भंडारी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

शिबीर यशस्वीतेसाठी संजय उजळंबे, गणेश बिराजदार, साधना पवार, तुलशीदास मलवाड, रत्नाकर पोतदार, साधु चाफेकर, मदार शहा, किरण शालगर, संतोष वर्मा, पांडूरंग वैजवाडे, सुभाष जाधव, साळुंके, शुभम शालगर, अक्षय झिरमिरे, मानसिंग जमादार, रोहित वैजवाडे यांनी पुढाकार घेतला. यावेळी पहिले रक्तदान आ. पवार केले यानंतर सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांनी रक्तदान केले.

## विमा व अतिवृष्टी अनुदान तात्काळ द्यावे अन्यथा तीव्र आंदोलन : प्रा. मिरगाळे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१९ जानेवारी -**

स्टेट बँक ऑफ इंडिया एग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनीच्या माध्यमातून मागील वर्षापासून विमा कंपनी शेतकऱ्याचा विमा भरून घेते व अतिवृष्टी झाली तर ७२ तासाच्या आत नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना पिकविमा कंपनीस कळवणे बंधनकारक आहे. परंतु सदरील विमा अद्यापही प्राप्त झाला नाही. विमा अतिवृष्टी अनुदान तात्काळ द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा प्रा. मिरगाळे यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांनी वेळेत कंपनीला कळवल्यानंतर कंपनी पंधरा दिवसांच्या आत पंचनामा करणे आवश्यक आहे व पंचनामा केल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत शेतकऱ्यांना पिकविमा देणे बंधनकारक असताना सुद्धा खरीप २०२३ चा आग्रीम २५ टक्के विमा ८० टक्के शेतकऱ्यांना आजतागायत मिळालेला नाही व खरीप २०२४ चे विमा पंचनामे होऊन दोन महिने झाले असताना सुद्धा विमा कंपनी शेतकऱ्यांना विमा देत नाही याचे नेमके कारण काय? प्रशासनाचे विमा कंपनीवर अंकुश नाही काय? विमा कंपनी व शासन यांच्यामध्ये करार झालेल्या अटी व शर्तीनुसार विमा कंपनी पालन का करत नाही? यावर प्रशासनाने कंपनीवर आजतागायत कार्यवाही का करत नाही? विमा कंपनी मनमानी कारभार करत असून शेतकऱ्यांना जसे ७२ तासाच्या




आत पिकविमा कंपनीला नुकसान कळवणे बंधनकारक आहे तसे पंचनामा झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे का पडत नाहीत? किंवा पिक विमा कंपनी पैसे का देत नाही याचे कारण अद्याप पर्यंत कळायला तयार नाही. पिक विमा कंपनीचे कोणाशी संगणमत आहे का? अशा बेजबाबदार वागणाऱ्या कंपनीवर प्रशासनाने कायदेशीर कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. शासनाने तात्काळ अनुदानाचे पैसे शेतकऱ्याच्या खात्यात वर्ग करावे अन्यथा शिवसेना व युवासनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाद्वारे युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी तहसीलदारांना दिला आहे.

यावेळी पांडुरंग लादे, तुकाराम यादव, बालाजी मिरगाळे, मनोज बेलकुंदे, धोंडदेव उपस्थित होते.

## अ.भा. मराठी नाट्य परिषद उदगीर शाखेची कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ जानेवारी -**

येथील अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा उदगीरच्या कार्यकारणीची घोषणा झाली आहे.

यामध्ये अध्यक्ष बसवराज पाटील नागराळकर, उपाध्यक्ष (प्रशासन) प्रा. महेश बसपुरे, उपाध्यक्ष (उपक्रम) अश्विनी निवर्गी, प्रमुख कार्यवाह प्रा.डॉ. गौरव जेवळीकर, कोषाध्यक्ष अमित आग्रे, सहकार्यवाह डॉ. संजय कुलकर्णी, शिवकुमार डोईजोडे, रसूल पठाण यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून प्रा. रामकिशन सोनकांबळे, धनंजय गुडसूरकर, रामदास केदार, रमेश पवार, प्रा.डॉ. किरण गुट्टे, ॲड. बालाजी वलांडीकर, डॉ. कालिदास बिरादार, डॉ. स्मिता लखोटिया, प्रा. वंदना बांसवाडकर, दीपिका पाटील, हर्षदा भारती यांची निवड करण्यात आली. सल्लागार समिती सदस्य म्हणून प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, प्रा. महादेव गंदीगुडे, राम मोतीपवळे, डॉ. भाग्यश्री घाळे, गोपाळ जोशी, ड. व्यंकट मोरे, ईश्वरप्रसाद बाहेती, सुरेश देबडवार, बालाजी मुस्कावाड, विजयकुमार चवळे,





ॲड. महेश मळगे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

## रौप्य महोत्सवी सोहळयानिमित्त भागवत ज्ञानयज्ञ सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर, दि.१९ जानेवारी -**

रेणापुर तालुक्यातील दर्जी बोरगाव येथे श्री. सदगुरु चिन्मयानंद स्वामी महाराज यांच्या समाधी १०१ रौप्य महोत्सवी सोहळ्याचे आयोजित सोहळयानिम्मीत दि.२३ ते ३० जानेवारीपर्यंत भागवत कथा ज्ञानयज्ञ आणि अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी दर्जी बोरगाव येथे श्री सदगुरु चिन्मयानंद स्वामी समाधी सोहळा साजरा होत आहे. दि.२३ जानेवारीपासून कथा प्रवक्ता हभप. भागवताचार्य श्री पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा) यांची भागवत कथा होणार आहे. दैनंदीन कार्यक्रमात विष्णु सहस्त्रनाम, हभप. माऊली महाराज इके व दामोदर महाराज यांचे चिन्मयानंद स्वामी यांचे जीवन चरित्र पारायण सोहळा, दुपारी भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ, किर्तन, जागर, काकडा भजन, असे धार्मीक कार्यक्रम होतील.

दि.२३ जानेवारीपासून अनुक्रमे हभप. प्रकाश महाराज साठे, हभप. उमेश महाराज दशरथे, हभप. नामदेव महाराज लबडे, हभप. पुरुषोत्तम महाराज पाटील, हभप. ज्ञानेश्वर महाराज पठाडे, हभप. अनिल महाराज पाटील, हभप. अक्रुर महाराज साखरे यांचे दररोज रात्री ८ ते १० पर्यंत किर्तन सेवा होणार आहे.

तर दररोज रात्री १० ते १ या वेळेत संगीत भजन होणार आहे. गुरुवार ३० जानेवारी रोजी सकाळी कै. लिंम्मनआप्पा हलकुडे स्मरणार्थ श्रींचा अभिषेक सकाळी १० ते १२ हभप. जयवंत महाराज बोधले पंढरपूर यांचे काल्याचे किर्तन तर समस्त ग्रामस्थ मंडळीच्या वतीने महाप्रसादाने सांगता श्रींच्या समाधी सोहळयानिम्मीत आयोजित सर्व कार्यक्रमास सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा, असे देवस्थान समिती व गावकरी मंडळाच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

## तोंडार येथे रस्ता सुरक्षा अभियान

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ जानेवारी -**

राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०२५ अंतर्गत प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण व सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी आशिष कुमार अय्यर यांच्या मार्गदर्शनाखाली माऊली होमिओपॅथी कॉलेज व संशोधन संस्था, तोंडार उदगीर येथे केंद्रीय रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा विषयी जागृतीपर मार्गदर्शन करण्यात आले.

## व्यापाऱ्यांनी दुकानासमोर कॅमेरे बसवावेत : सपोउ. रेड्डी

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१९ जानेवारी -**

चाकूर पोलीस स्टेशन येथे शहरातील व्यापारी यांची पोलीस प्रशासनाच्या वतीने दि.१८ जानेवारी रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यापाऱ्यांच्या विविध समस्या जाणून घेण्यात आल्या. त्यानंतर सहायक पोलीस उपअधीक्षक बि.चंद्रकांत रेड्डी यांनी व्यापारी यांना एक कॅमेरा पोलिसांसाठी बसवावा, असे अहवान करण्यात आले. व्यापारी आणि पोलीस यांच्यात बैठकीत घेण्यात आली. व्यापारी यांनी विविध समस्या मांडल्या.

सदर बैठकीमध्ये व्यापाऱ्यांकडून आठवडी बाजारातील बेशिस्त, वाहनांची पार्किंग व्यवस्था, शहरातील बंद बडलेले सि.सि.टी.व्ही., शहरात रात्री पोलिसांनी पेट्रोलिंग वाढवावी, महाविद्यालयीन विद्यार्थीनींना रोड रोमीओचा व टवळखोरांचा त्रास, आठवडी बाजारातील हातगाडेवाल्यांचा त्रास, भाजीपाला बाजार मुख्यकमानीच्या आत भरवावा, मोबाईल चोरी, बोथी चौकातील ट्रॉफीकची व्यवस्था करावा आदी समस्यांच्या बाबतीत चर्चा केली. त्यामूळे एक कॅमेरा पोलिसांसाठी बसवण्यात यावा, असे आवाहन सहायक पोलिस उपअधीक्षक बि.चंद्रकांत रेड्डी यांनी केले. आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत व्यापाऱ्यांनी कॅमेरे बसवण्याचे मान्य केले.

बैठकीस पोनि. दत्तात्रय निकम, पोउपनि. राजेश घाडगे, पंकज निळकंठे, शहरातील प्रतिष्ठित व्यापारी उपस्थित होते.

# वलांडी बाजारपेठेतील मुख्य रस्ताच बनला पार्किंग झोन





### सतत रहदारीची कोंडी; पोलीस यंत्रणेची डोळेझाक...

**तभा वृत्तसेवा / रियाज मोमीन**
**वलांडी, दि.१९ जानेवारी -**

वलांडी (ता. देवणी) येथील मुख्य बाजारपेठेतील रस्त्यावर अतिक्रमण वाढल्याने मुख्य रस्त्याच पार्कींग झोन, आठवडी बाजारा दिवशी चारचाकी वहानांसह महिला व वृद्धांना कसत करावी लागते. अतिक्रमणासह मोबाईल चोरीच्या घटना व महिलांना त्रास होत असून बेशिस्त पार्कींग मात्र पोलीस प्रशासन या प्रश्नाकडे जाणीवपुर्वक डोळेझाक करीत असल्याने बाजारात खरेदी-विक्रीसाठी येणाऱ्या महिला, वृध्द ग्राहकांना अडचणीला सामोरे जावे लागत आहे. अनेकदा रस्त्यावर चारचाकी गाड्यांची रहदारीत रस्ता नसल्याने आमोरा समोर कोंडी होत आहे.

वलांडी ही तालुक्यातील सर्वाधीक मोठी बाजारपेठ असून परीसरातील तीस ते चाळीस गावांचा दैनंदिन व्यापारी संबंध असतो.

त्यातच आठवडी बाजारासह सणानिमीत्य खरेदीची मोठी झूंबड झाल्याने सतत वर्दळ वाढली आहे. मात्र गर्दीवर नियंत्रन ठेवणारी यंत्रना बेफीकीर झाल्याने सर्व सामान्याची चालतांनाही कोंडी होत आहे.

येथील बाजारपेठेतील मुख्य रस्त्यावरील रहदारीची कोंडीचा प्रश्न नेहमी उद्भवत आहे. शुक्रवारचा आठवडी बाजार, मुख्य रस्त्यावरील बेशिस्त रस्ता दुभाजक व्यापाऱ्यांची मुख्य रस्त्यावरच मांडलेली दुकाने यामुळे आठवडी बाजाराच्या दिवशी नागरीकांना चारचाकी वहाने गावात घेऊन येणे अत्यंत अडचणीचे झाले असून एखादी आपत्कालीन घटना घडल्यास जाण्यासाठी रस्ताही नसतो त्या मुळे भविष्यात होणारे आपत्कालीन धोके टाळण्यासाठी रहदारीस कठोर पायबंद पोलीस यंत्रनेने घालावे, अशी वलांडीकर करीत आहेत.

दैनंदिन व आठवडी बाजारातील समस्या नागरीकांसह महिला वर्गाची गर्दीतील कुचूंबना मोठ्या होत असून चारचाकी वहातूकीस अडथळा, मोबाईल चोरीच्या घटना घडूनही पोलीस प्रशासन या बाबीकडे जाणीपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप येथील नागरीक करीत आहेत.

### एकेरी मार्गावरच दुकाने लावावीत...

शुक्रवार हा आठवडी बाजाराचा दिवस असतो बाजारा दिवशी रस्त्याच्या दोन्ही बाजूला व्यापारी आपले दुकाने थाटतात. तर लहान सहान भाजीपाला व इतर विक्रेतेही आपली दुकाने याच मार्गावर लावतात. परिणामी आठवडी बाजारा दिवशी गावातून एखादी दुचाकी चालवणेही कठीण होत आहे. दरम्यानच्या काळात एखादी अंत्ययात्रा किंवा एखादा गंभीर रूग्न उपचारासाठी नेण्यास मोठा अडथळा होत आहे. त्यामुळे आठवडी बाजारात एकेरी मार्गावरच दुकाने लावण्याची व्यवस्था, करावी अशी नागरीकांची मागणी आहे.

**जाहिर नामा**
**तालुका दंडाधिकारी**
**तथा तहसीलदार चाकूर, यांचे कार्यालय**
**(दंडणीय विभाग)**

**जा.क्र.२०२४/एम.ए.जी./कावि-** **दिनांक १७/०१/२०२५**
**अर्जदार : श्री. झांबरे दत्तात्र्य विश्वनाथ रा. चाकूर, ता. चाकूर**
**विरुध्द**
**गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चाकूर, ता. चाकूर**
**अर्ज : कलम १३ (३) जन्म-मृत्यु नोंदणी कायदा.**

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **श्री. झांबरे दत्तात्र्य विश्वनाथ रा. चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर** यांनी १३ (३) जन्म-मृत्यु कायदा अंतर्गत अर्जदार त्यांचा स्वताः **कु. झांबरे दत्तात्र्य विश्वनाथ** जन्म **दिनांक १०/०५/१९७४** रोजी राहत्या घरी झाला असून मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्रामसेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर येथे जन्म नोंद नसल्याने त्यांच्या जन्म तारखेची नोंदणी मुख्याधिकारी नगर पंचायत/ग्राम सेवक, ग्रामपंचायत, कार्यालय चाकूर, ता. चाकूर, जि. लातूर येथे करणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म तारखेच्या नोंदणीसाठी कोणच्याही कुठल्याही प्रकारचे आक्षेप अथवा हरकती असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. सदर कार्यालयामध्ये कोणाच्याही आक्षेप अथवा हरकती प्राप्त न झाल्यास हे न्यायालय योग्य तो आदेश पारीत करेल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा अथवा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही.

दि. १७/०१/२०२५ **पुढील तारीख** ०५/०२/२०२५

**स्वाक्षरित /-**
**तालुका दंडाधिकारी, तथा तहसिलदार**
**तहसील कार्यालय, चाकूर**